सं. ठाणें १५६९
REFBK-0011515

इंद्रधनूचा पूल

पिरोज आनंदकर
बी.अे.,बी.टी.,डी.डी.

अिंद्रधनूचा पूल

लेखिका

पिरोज आनंदकर

बी. अे, बी. टी., टी. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११५१५

किर्लोस्कर प्रेस प्रकाशन

REFBK-0011515

किंमत ४ रुपये

* सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

* नोव्हेंबर १९६१
* प्रती २०००

* मुद्रक :
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

* प्रकाशक :
मु. शं. किर्लोस्कर
किर्लोस्कर प्रेस,
(प्रोप्रा. – किर्लोस्कर ब्रदर्स, लि.)
स्वारगेट, पुणें २

अनुक्रम... ३१९४३ निबंध
नोंद... १३५१ ५।११६२

प्रिय किशोरींनो,
तुम्हांलाच
समर्पण

प्रकाशकाचे चार शब्द

यौवनांत पदार्पण करणाऱ्या अल्लड किशोरींच्या जीवन-विकासाची कुंडली मांडणें आजकाल फार अवघड होऊन बसलें आहे. शिक्षक व पालक यांच्यापेक्षाहि किशोरींच्या जीवनावर 'बाह्य परिस्थितींतील आंदोलनाचा व वातावरणाचा' अपेक्षेपेक्षा अधिक प्रभावी परिणाम होत आहे हें सत्य कटु असलें तरी तें यापुढे दृष्टीआड करून चालणार नाही

या दृष्टीनेच "अिंद्रधनूचा पूल" ही खास लेखमाला श्रीमती पिरोज आनंदकर यांच्याकडून आम्हीं 'स्त्री' मासिकासाठी लिहून घेतली होती. सदर लेखमाला फारच गाजली आणि पुस्तकरूपाने तिचें पुनर्मुद्रण करावें अशा सूचना अनेकांकडून येअूं लागल्या. त्यानुसार आज हें पुस्तक वाचकांच्या हातीं देत आहोंत.

श्रीमती पिरोजबाअी आनंदकर यांनी किशोरींसाठी आपल्या हयातभर कार्य केलें. मुंबअींतील अेका मोठ्या विद्यालयाच्या संचालिका म्हणून पंचवीस–तीस वर्षांचा दीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशीं होता. त्यामुळे किशोरींच्या जीवनांत अलिकडे कोणत्या विशिष्ट अडचणी निर्माण होतात याची त्यांना संपूर्ण जाणीव होती. किशोरींसाठी लिहिलेलें साहित्य मराठी भाषेंत फार कमी आहे. त्या दृष्टीने आपल्या परिपक्व अनुभवाचा लाभ किशोरींना देण्यासाठी श्रीमती आनंदकर आमच्या विनंतीनुसार पुढे आल्या व त्यांनी अेक अुत्कृष्ट लेखमाला लिहिली, याबद्दल आमच्या-प्रमाणेच वाचकहि त्यांचे सदैव ऋणि राहतील असा आम्हांला विश्वास वाटतो.

पण योगायोग असा विचित्र, की प्रस्तुत पुस्तकाची छपाअी चालू असतांनाच श्रीमती आनंदकर अल्पकालीन आजारानंतर ता. १६ ऑक्टोबर १९६१ रोजीं निधन पावल्या आणि त्यामुळे ह्या पुस्तकाला

मातृदर्शनाचा लाभ मिळाला नाही, याचें आम्हांला फार दुःख होतें. तथापि प्रस्तुत पुस्तक हें पिरोजबाऔंचें अुचित स्मारक आहे असें आम्हांला वाटतें. त्यांच्या लाडक्या किशोरींना तर हें पुस्तक ही पिरोजबाऔंची अमूल्य भेट आहे. या भेटीमुळे किशोरींचें जीवन मनोहारी व निरामय होअील अशी आशा आम्हीं व्यक्त करतों.

मु. शं. किर्लोस्कर

ता. ३ नोव्हेंबर १९६१

अ नु क्र म णि का

			पृष्ठ
प्रकरण १ लें ...	कौमार्य : स्त्रीजीवनाचा पाया	.. ...	१
२ रें ...	वयांत येतांना	.. ...	१०
३ रें ...	कशावरून ग मी मोठी झालें ?	.. ...	१७
४ थें ...	आता थोडं मुलांविषयी	.. ...	२८
५ वें ...	धोक्याचा कंदील	.. ...	३४
६ वें ...	तुमचीं दिवास्वप्नं	.. ...	४०
७ वें ...	अवेळीं केलेलें प्रियाराधन	.. ...	४६
८ वें ...	शीलसंपादनाचा सुवर्णकाल	.. ...	५१
९ वें ...	तुमचं शील	.. ...	५५
१० वें ...	वाढतें मित्रमंडळ	.. ...	६१
११ वें ...	मैत्री टिकली पाहिजे	.. ...	६७
१२ वें ...	घरींदारीं	.. ...	७३
१३ वें ...	तुमचं सौंदर्य-कपाट	.. ...	८०
१४ वें ...	तुम्ही कोणतं व्रत पाळणार ?	.. ...	८९
१५ वें ...	मिळकतीचा प्रश्न	.. ...	९८
१६ वें ...	मला मुळी लग्नच करायचं नाही !	.. ...	१०४
१७ वें ...	—आणि लग्न करायचंच झालं तर—	.. ...	१०८
१८ वें ...	अविवाहित म्हातारी	.. ...	११३
१९ वें ...	इंद्रधनूच्या टोकाशीं	.. ...	११९

मराठी ... अनुक्रम 37८५७३ वि. ... नों. दि. ...
क्रमांक ७३५७
दा. क्र. ११५१५

प्रकरण १ लें

कौमार्य : स्त्रीजीवनाचा पाया

अिंद्रधनुष्य पाहिलं आहे ना तुम्हीं? कसं सुंदर दिसतं! त्यांतील ते सप्तरंग अेकमेकांतून जणू निर्माण झालेले दिसतात! अेक रंग कुठं संपतो व दुसरा कुठं सुरू होतो याचा पत्ता लागत नाही; पण तें कळण्याची तुम्ही पर्वाहि करीत नाही. मधोमध दिसणाऱ्या रंगीबेरंगी भागानं तुम्ही आकर्षित होतां. अिंद्रधनुष्याचा कमानी पूल पाहिला की मग तुम्ही विचार करतां – कोणत्या नदीवर हा पूल बांधला आहे बरं? कसा बाकदार, डौलदार आहे हा पूल! अिंद्रधनूच्या सौंदर्यदर्शनानं तुमच्या अंगावर रोमांच अुठतात; पण तुमच्या आयुष्यांतहि असंच एक अिंद्रधनु आहे याची दखल असते का तुम्हाला?

तेरा ते अेकोणीस वर्षं हा तुमच्या आयुष्यांतला काळ म्हणजे एक सुरम्य, रोमांचकारी असं अिंद्रधनुष्यच आहे. तुमचं बाल्य आता संपलं आहे, कुमारी-अवस्थेंत तुम्हीं आता प्रवेश केलेला असतो; म्हणूनच तुम्हाला वाटतं – साड्या नेसाव्या, घडी-घडी पदर सावरण्याचा आव आणावा, आअी-ताअीची नक्कल करावी, लाजावं, मुरकावं – अगदी सर्व कांही मोठ्या वायकांसारखं करावं! म्हणजेच, तुमचं बाल्य संपून तुम्ही आता अिंद्रधनूच्या रम्य काळांत शिरतां आहांत. तरीहि आपण केव्हा या सीमेवर आलों याची तुम्हाला आठवणहि नसते. गत आयुष्य व भावी आयुष्य यांना जोडणारा हा एक तारुण्य-नदीवरचा पूल आहे. या पुलावरून जातांना अगदी अगदी अंतराळांत चालल्यासारखं तुम्हाला वाटेल. पण–

– पण या पुलाला कठडा नाही ! कळत न कळत जरी तुमचं अवधान चुकलं तरी खालून वाहणाऱ्या विनाशाच्या प्रवाहांत घसरून तुम्हाला गटांगळ्या खाव्या लागतील ! म्हणूनच या पुलावरून मोठ्या सावधगिरीनं व जपून पावलं टाकीत चालायला हवं अं !

तेरा ते अेकोणीस हीं सहा-सात वर्षं म्हणजे तुमच्या आयुष्यांतील अगदी रोमांचकारी काळ ! तुम्ही तुमचं बालपण कांही कमी सुखांत घालविलेलं नसतं; पण त्या काळांतला सगळाच कार्यक्रम घरीं तुमचीं मातापितरं व शाळेंत गुरुजन यांनीच आखलेला असतो; त्यांत तुमचं स्वतःचं असं व्यक्तिमत्व नसतं. आअी म्हणेल, असेच कपडे घाला – घातले; ताअी म्हणेल, अशीच वेणी घालायची – घातली; अिथंच जा, तिथं जाअू नकोस – बाबा आज्ञा करतील तें करायचं. झबल्याटोप-ड्याचा काळ झपाट्यानं मागं गेलेला असतो, फ्रॉकांतून परकर-चोळींत तुम्ही शिरतां; पण आअीचं तें मोठं भरदार लुगडं नेसून, नाकांत कागदाची कोरलेली नथ घालून तुम्ही लुटुपुटूच्या मोठ्या बायका बनतां, कडेवर बाहुल्या काय घेतां, तिला आंघोळ काय घालतां, कपडे काय घालतां, खाअू देतां, तिला चापट्या मारून झोपवितां काय, तिचं बारसं – वाढदिवस करतां व शेवटीं तिच्या लग्नाचें बँडहि वाजवितां ! अेकंदरींत तुम्हाला आअीची अैट आणावीशी वाटते, नाही ? आपण कधी मोठ्या होअू, स्वतंत्र-पणें केव्हा हिंडूंफिरूं, आपला स्वतःचा कार्यक्रम, आपल्या आशा-अुमेदी, आपले खेळ, आपले मित्र-मैत्रिणी आपणच ठरविण्याचा काळ केव्हा येअील – अशी जाणीव तुमच्यांत तीव्रतेनं निर्माण होते.

"कोण ग तूं होणार किशोरी ?" असं कुणीतरी विचारतं.

मग तुम्ही अुत्तर देतां– "मी बाअी मोठ्ठी होणार !"

"अग, पण मोठ्या तर सगळ्याच होणार ! पण तूं कोण होणार मोठी झाल्यावर ? आअी होणार ? ताअी होणार ? की बाअी होणार ?"

मग किशोरी म्हणेल, "मी बाअी, बाअीच होणार ! आमच्या विलासिनीबाअी आम्हाला फारच आवडतात ! मग मी चष्मा लावीन, चपू-चपू चपला वाजवीत वर्गांत शिरेन ! सगळ्या मुली ताठ अुभ्या राहतील नि म्हणतील, 'नमस्ते बाअी !' 'नमस्ते' मी म्हणेन, 'शिट् डाअून ! खाली बसा !'

सरिता म्हणेल – "मला नाही बाओी, बाओी व्हायला आवडणार! अभ्यास थोडा कमी केला की अेवढा डोळा करतात; मग आम्हाला खाली मान घालून बसावं लागतं! नको बाओी, मी तर समोरच्या पद्मलोचनाताओींसारखी डॉक्टरीण होणार! जाड भिंगाचा चष्मा लावणार! खडाखडा बूट वाजवीत जाणार दवाखान्यांत – अगदी स्वतःच्या मोटारींतून! मीच मोटार हाकणार अशी जोरानं – अशी जोरानं की आगगाडीच्या आवाजानं शेळ्या पळतात ना, तशी माझी मोटार धावूं लागली की रस्त्यांतील माणसं पळत सुटतील!"

स्वप्नाळू मेनका म्हणेल – "मी शाळेंतच जाणार नाही मुळी! आपल्या शेजारच्या द्वारकीसारखी नटी होओीन. हिरे जडवलेला चष्मा लावीन, हिरवी साडी नेसेन, पिवळी साडी नेसेन, काळी चोळी घालीन, लालचुटुक चोळी घालीन, लांब्या चोळ्या घालीन – काय वाटेल तें घालीन. रंगीत चपला घालीन, डोलणारे झूल घालीन, अेका हातांत अेकच घड्याळ, दुसऱ्या हातांत दोन डझन म्हणजे चोवीस बांगड्या घालीन, ओठाला रंग लावीन, तोंडाला, पोटाला पॉवडर लावीन, कारण दोन्ही दाखवायचीं असतात."

आणि शेवटीं मीरा म्हणेल – "मला बाओी यांतलं कांही व्हायला आवडणार नाही. मी आपली कारकून होओीन – टायपिंग शिकेन, टप्‌टप् टाअिप वाजवीन. मला नको बांगड्या. अक घड्याळ पुरे! मला नको कुंकू, भुंडे हात, भुंडं कपाळ! केसांचे शेपटे बांधीन, दोनदोन – नि जाओीन भिरकावीत! बसच्या रांगेंत उभं राहायची किती गंमत! दोन्ही बाजूंनी कोणी लागलंच रेटायला तर बैलाच्या शेपटीच्या तडाक्याप्रमाणं देओीन वेणीचा शेपटा तडकावून! कुणाला लागलाच तर म्हणेन – 'सॉरी हं! माशा फार त्रास देतात – त्यांना लागावलं, तुम्हाला नाही. पण लागलं का तुम्हाला? सॉरी, फार सॉरी, फार वाओीट वाटतं."

– असले सगळे मनोरथ तुम्ही याच वयांत रचतां. थोडंसं लिहितांवाचतां येओूं लागलं, की आजूबाजूच्या माणसांशीं कसं वागावं याचं थोडंसं ज्ञानहि तुम्हाला मिळालेलं असतं. या तयारीनिशीच तुम्ही कुमारी अवस्थेंत प्रवेश करीत असतां.

या काळांत तुमच्या व्यक्तिमत्त्वाची घडण होत असते. आपण पुढं काय करावं, आपलं भविष्यकालीन जीवन कसं असावं, सुख कसं मिळवावं, याची रूपरेखा आखायला तुम्हाला या काळांत थोडासा दर्जाहि प्राप्त झालेला असतो.

कुमारी अवस्था व तारुण्य यांच्या सीमेवर तुम्ही असतां. याच काळांत तुमच्यांत शारीरिक फरक होअून तुम्ही ‘मुलगी’ या संज्ञेतून ‘तरुणी’ या नांवाखाली ओळखल्या जातां. शारीरिक वाढीबरोबर तुमच्या मनाचीहि अशीच वाढ होते. मनाच्या कधी न अनुभविलेल्या हालचालींची जाणीव तुम्हाला होते. ह्या मनाच्या हालचालींना ‘मानसिक संवेदना’ म्हणतात. हा अेक नवीन ठेवा तुम्हाला निसर्गानं बहाल केलेला असतो. त्याचा आपल्या भावी सुखाकडे बरावाअीट अुपयोग करणं सर्वस्वीं तुमच्या हातीं असतं. आपण कोणत्या प्रकारची व्हावं हें तुम्हीच या शक्तीच्या मदतीनं ठरवायचं असतं. तुमच्या जीवनाचा विकास वा विनाश ह्या शक्तीच्या बऱ्यावाअीट वापरावरच अवलंबून असतो.

—म्हणजे या काळांत तुम्ही वयांत येणार आहांत हें सिद्धच होतं. अद्याप नवे-नवे मनोविकार, नव्या भावना व नवे अनुभव तुम्हाला घ्यायचे असतात. आपल्या भविष्याचं स्वप्न जरी तुमच्या नजरेपुढं तरळत असलं तरी भावी आयुष्यांत अंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या पाहूनहि आयुष्याविषयी तुम्हाला गंभीरता वाटते — भीति वाटते. पण मग थोड्याच दिवसांत कळून येतं, की ही भीति किती व्यर्थ असते. तुमचं तुम्हालाच मग हसूं येतं.

ह्या काळ बोलतांबोलतां निघून जाअील नि लवकरच म्हणजे विसाव्या-पंचविसाव्या वर्षीं नववधू, गृहिणी व माता होण्याचीं तुमचीं स्वप्नं साकार होतील. संसारांतील ह्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडीत असतांना व जीवनांतील सौख्याचा आनंद अुपभोगीत असतांनाच तुम्हाला संसारांतील अनेक कामं करावीं लागतील. तीं करीत असतांना त्यांच्या गर्दीत आपलं सुखस्वप्न साकार झालं आहे याची आठवणहि तुम्हाला पडणार नाही — अितक्या तुम्ही नित्याच्या व्यवसायांत गढून जाल, परिस्थितीच्या कोंडमाऱ्यांत सापडाल — कदाचित् अनेक विपत्तींना तोंड द्यावं लागेल, कर्तव्यसाधनेचं सुख-समाधान मिळेल, पण तारुण्याची रमणीयता त्यांत नसेल. यापुढील काळांत भविष्यकाळची चिंता करतांना गतस्मृतीचं माधुर्य तुम्हाला रमवील!

अेखादी नवीन सुंदर साडी आपल्याला मिळावी, आपल्याला ती फार शोभते, आपल्या सौंदर्यांत भर घालते असं तुम्हाला वाटत असतं, म्हणून ती वारंवार वापरण्याचे प्रसंग यावे असं तुम्हाला वाटत नाही का? हाच अनुभव कुमारी अवस्थेंत येत असतो. जीवनाच्या अेका नवीन काळखंडाचा तो आरंभ असतो. या काळांत

सौख्य व आनंद आपल्या मुठींत आहेसं तुम्हाला वाटतं आणि तें खरंहि असतं. या काळखंडांत तुमच्या शरीराची अधिक काळजी घेण्यासारखी परिस्थिति निर्माण झालेली असते. तुमच्या स्वभावाची व व्यक्तित्वाची घडण याच काळांत व्हायची असते. ह्या निसर्गदत्त सुवेळेचा जर तुम्हीं योग्य अुपयोग केला नाही, ह्या देणगीचं पावित्र्य जाणलं नाही, तिचं जतन केलं नाही, तर पुढील साऱ्या आयुष्यांत तुम्हाला निराशेला व अनेक आपत्तींना तोंड द्यावं लागणार आहे. तुमच्या भावी जीवनाची गुरुकिल्ली निसर्गानं तुमच्या हातांत दिलेलीच असते. तेव्हा भावी जीवनांतील ठळक आकांक्षांची रूपरेखा तुम्हाला याच काळांत करावयाची असते. भावी जीवनाचा मार्ग ह्या काळांत अेकदा ठरवून टाकला की त्या परिचित मार्गानं आपलं अुर्वरित आयुष्य घालविणं हें तुमचं मग कर्तव्य ठरतं.

ह्या काळांत तुम्हाला मिळालेली मानसिक व शारीरिक शक्ति कशी उपयोगांत आणावी याचा विचार करण्याअितपत तुमच्या मनाची जागरूकता झालेली असते. सारासार विचार करण्याची पात्रताहि तुमच्या अंगीं आलेली असते. आअीवडील व मैत्रिणी यांचा योग्य सल्ला तुम्हाला मिळण्याजोगा असतो. ह्याच मार्गानं पुढं गेलेल्या व्यक्तींचे अनुभव न्याहाळण्याअितकं सूक्ष्मावलोकन तुमच्यापाशी असतं. म्हणूनच अत्यंत सावध राहून आयुष्याच्या मार्गांतील निराशेचे खाचखळगे विचारपूर्वक तुम्हाला टाळतां येण्याजोगे असतात, अितरांच्या अनुभवाचे कंदील तुमच्या भावी जीवनपथावर प्रकाश टाकतात. या प्रकाशांतून तुम्हीं पुढं जायला शिकलं पाहिजे. अर्थात् या कुमारी-अवस्थेंत तुम्हाला तुमच्या भावी आयुष्याचे सूक्ष्म बारकावे दिसणार नाहीत. आपण मोठ्या हवेलींत जीवन कंठणार की अेखाद्या झोपडींत आपल्याला राहावं लागणार, किती मुलांची आपण माता होणार, हेंहि सांगतां येणार नाही. तसंच आपल्याला काश्मीरच्या डोंगर-पठारावर राहावं लागणार आहे की कोचीनच्या समुद्र-किनाऱ्यावर राहावं लागणार आहे याची थोडीशीहि कल्पना तुम्हाला या वयांत करतां येणार नाही.

पण, आपण कशा प्रकारची स्त्री होअूं हें मात्र निश्चित आज ठरवितां येण्यासारखं आहे. आपण अेक सुशिक्षित, सुसंस्कृत व आशावादी स्त्री होणार आहोंत की जगांतील सौंदर्याला पाठ देणाऱ्या निराशावादी स्त्रीची भूमिका घेणार आहोंत, भावी सुखी जीवनांत लागणारा प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा वगैरे गुणांची वाढ आपण ह्या काळांत करणार आहोंत की नाहीत हेंहि तुम्हांला ठरवितां येअील. याच काळांत

धर्मावद्दलच्या तुमच्या कल्पना स्थिरावतात व आयुष्याबद्दलचं निश्चित तत्त्वज्ञान तुम्हाला याच काळांत वनवितां येतं.

नीटनेटकेपणाची, स्वच्छतेची सवय याच काळांत केली पाहिजे, तरच भावी काळांत स्वतःच्या सौंदर्याबरोबरच गृहसौंदर्याचीहि आवड तुमच्यांत अुत्पन्न होअील. म्हणूनच आपलं भावी जीवन ज्यांत व्यवस्थित राहील, नव्हे – अगदी अुठून दिसेल अशी आपल्या संसारचित्राची चौकट तुम्हीं याच काळांत तयार करावयास पाहिजे. या काळांत ज्याप्रमाणं तुम्ही स्वतःचा स्वभावविशेष बनवाल, त्यावरच भावी सामाजिक व व्यावहारिक जीवनांत येणाऱ्या सुसंधीचा फायदा घेण्याचं सामर्थ्य तुमच्यांत निर्माण होअील. तुमचं व्यक्तिमत्व व स्वभाव ज्या नमुन्याचा असेल त्यावरच तुम्ही कोणत्या प्रकारच्या माणसाशीं विवाह कराल हेंहि अवलंबून राहील. तुमचा सामाजिक दर्जाहि त्यामुळंच ठरेल. तुम्ही सर्वस्वीं आपल्या कुटुंबापुरतंच स्वार्थी जीवन जगणार की मानवतेची सेवा करण्याचं व्रत पाळणार हेंहि हाच काळ ठरविणार. फ्लॉरेन्स नायटिंगेल-च्या जीवन-तत्त्वांनी तुम्ही भारून जातां तो काळ हाच. मॅडम क्यूरीचं संशोधन-कार्य तुम्हाला याच काळांत स्तिमित करतं. सरोजिनी नायडूंच्या काव्यसौंदर्यानं तुम्ही मोहून जातां व राणी लक्ष्मीबाअींच्या शौर्यानं दिपून जातां त्या याच काळांत. अशा तेजस्वी स्त्रियांची भूमिका आपल्याला पार पाडतां येअील तर – अशीं स्वप्नंहि तुम्हांला पडायला लागतात. जें जें अुच्च, दिव्य व भव्य, तें तें आपण पार पाडूं अशा अुच्च भावना या वयांत तुमच्यांत प्रबळ होतात. त्या भावनांचं योग्य पोषण तुमच्यांत होण्यास हाच काळ महत्त्वाचा आहे. तुमचे आअीबापहि तुम्हांला तुमच्या ध्येयसिद्धीच्या कामांत मदत करायला तयार असतात. तुम्ही मात्र त्यांच्याशीं मोकळेपणानं आपल्या भावी मार्गाची चर्चा केली पाहिजे.

कुमारी-अवस्थेंत पाअूल टाकतांच तुम्हांला कळून येअील, कीं आपल्यांत फार झपाट्यानं बदल होत आहे. आपण आता जें जें करणार त्या बाबतींत निश्चित असं धोरण आपणच आखलं पाहिजे असं दिसून येअील. त्याची जबाबदारी तुमच्यावरच राहील. तसंच अितरांच्या बाबतींतहि तुम्हाला आपलं धोरण आपणच ठरवावं लागेल. कुणी विचारतं – ' काय ग, काव्यगायनांत भाग घेणार आहेस ? –' ' वक्तृत्वाच्या चढाओढींत नांव देणार आहेस ? ' तर तुम्ही अुत्तर देतां–' घरीं आअीला-बाबांना विचारून सांगेन. ' पण या काळांत हें नाही हं

चालायचं ! पूर्वी हें काम तुमच्यासाठी तुमचे आओवडील व शिक्षक करीत. अेखाद्यानं तुमचा अपमान केला, मारहाण केली तर वडील माणसं त्या बाबतींत मन घालीत, मध्यस्थी करीत, अपराध्याला शिक्षा देत; पण आता हें सर्व तुम्हालाच करावं लागेल.

जर्मनीला युरोपपियन राष्ट्रांत थोर पद प्राप्त करून देणारा हेर हिटलर तुम्हाला माहीत आहे ना? त्याच्या बालपणांतील अेक गोष्ट सांगतात. तो लहान असतांना अेकदा आओीनं दिलेल्या पावाचा तुकडा खात घराच्या पायरीवर बसला होता. हिटलर शरीरानं वाळतुकडा व नेभळा होता. रस्त्यांतून जाणाऱ्या अेका गलेलठ्ठ व दांडगेश्वर मुलानं त्याच्या हातांतला पावाचा तुकडा हिसकावून घेतला आणि तो पळतच सुटला. हिटलर मुळूमुळू रडत आपल्या आओीपाशी गेला. त्याला वाटलं, आओी आपली बाजू घेओील, त्या मुलाला मारील. पण आओीनं सांगितलं तें अुलटंच! ती म्हणाली, "असाच जा, त्या मुलाला धर, तो जाड्या पळूनपळून कुठवर जाओील? आसपासच कुठंतरी पाव खात बसला असेल! त्याच्याकडून आपला पाव हिसकावून घे! वेळ पडल्यास चांगला बदड! तुझा पाव त्यानं जबरदस्तीनं घेतला आहे ना? तो तुझा तूंच परत मिळव. – जा पळ!" आओीनं असा धीर देतांच हिटलर पळतच सुटला वाऱ्यासारखा. अेका आडगल्लींत घराच्या पायरीवर बसून हे लठोबा पाव दोन हातांत धरून कुरतडत बसले होते. त्याला गाठून, त्याच्या मुसकटांत लगावून त्यानं आपला पाव परत मिळविला! ह्या लहानशा प्रसंगांत हिटलरच्या आयुष्याच्या श्रेष्ठत्वाचं बीज होतं. आपला न्याय आपणच करून घ्यायचा असतो. या वयांत अेखाद्या गोष्टीचा तत्काल निर्णय आपणच घ्यायचा असतो.

मनाच्या ह्या बदलत्या प्रवृत्ति समजण्याकरिता आपल्याला बाल्य व कौमार्य यांच्यांतील फरक कोणता हें प्रथम पाहिलं पाहिजे. लहानपणीं सर्वच मुलं सारखीं दिसतात. मुलगा व मुलगी यांच्या मनोवृत्तींत खरोखर फरक असा नसतोच. जो असतो तो शारीरिक. बाह्य रूप पाहिलं तरी काय! मुलाचे केस तोकडे असतात, तो तुमान नेसतो, तर मुलीचे केस लांब असतात व ती झगा घालते. दोघांचा स्वर अेकसारखाच असतो. दोघांचं सामर्थ्यहि सारखंच, आवडीनिवडी सारख्याच. पण जेव्हा वादाचा प्रसंग उत्पन्न होतो व कुणीतरी विचारतं – "तुम्हाला मुलगा व्हायला आवडेल की मुलगी?" तेव्हा मुली म्हणणार, "आम्हाला बाओी मुलींचाच जन्म आवडतो." तर मुलगे म्हणणार – "शीः, मुली कोण होतंय्! आम्हाला मुलाचाच जन्म आवडतो!"

मुली बाहुलीचं खेळणं पसंत करतील व मुलगे चेंडू, आगगाड्यांचा खेळ खेळतील. पण कुमारी अवस्थेंत जसजसं मुलींचं पाअूल पडायला सुरवात होते, तसतसं त्यांचा मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत जातो.

हें असं कां होतं ? पूर्वीची तुमची वृत्ति कां बदलते ? याचं कारण आतापासून तुमच्या शरिरांत अेक विवक्षित फरक पडत जातो. 'तरुणी' या सदराखाली यायची तुमची सुरवात होते. शरीरांतील हा फरक कांही बाबतींत अुघड दिसतो, तर कांही बाबतींत गुप्त असतो.

मुलांच्या सान्निध्यांत आपण अुठावदार दिसावं, असं तुम्हाला वाटूं लागतं. आपण मुलांच्या घोळक्यांत आहों याची जाणीव तुम्हाला या काळांतच प्रथम होअूं लागते. पदराकडे तुमचा चटकन् हात जातो. अर्थात् पूर्वीच्या पिढींत वाढलेल्या मुलींचा असा हात पदराकडे जात असे; नम्रता दाखविण्याचं तें अेक लक्षण मानलं जाअी. 'हा मुलगा, मी मुलगी' हा भेद प्रथमच तुम्हाला जाणवतो. मुलांच्या घोळक्यांत तुम्हाला कसंसंच होतं ! मुलांची संगत टाळण्याचाहि तुम्ही प्रयत्न करतां. लहानपणीं ज्या मुलांबरोबर तुम्ही खेळत होतां त्यांची संगति, साहचर्य टाळावं असं तुम्हांला वाटतं – खरं ना ? वर सांगतलेला फरक जो पडतो त्याची शारीरिक बाजू जर पाहिली, तर तुमचं बाह्यांग अधिक आकर्षक होत जातं. शरीरांतील कांही ग्रंथी वाढीला लागतात व प्रजनन अिंद्रियांची वाढ होत असतांना तुमच्या मानसिक वृत्तीहि बदलतात व याचा परिणाम तुमच्या वागणुकीवर होतो. पूर्वीप्रमाणं खेळांत तुम्ही रमत नाही. भावी संसाराच्या आशा-आकांक्षा, प्रेमाचीं सुखस्वप्नं तुम्ही अनुभवायला लागतां. आपल्या शरीरांत व मनांत होणाऱ्या घडामोडींबद्दल तुमचं कुतूहल जागृत होतं. आपल्यामधेच असा विलक्षण फरक झाला आहे की आपल्याबरोबरच्या अितर मुलींतहि अशाच प्रकारचे फरक झाले असतील याचा विचार तुमच्या मनांत येतो. या नव्या परिस्थितीनं तुम्ही अगदी गोंधळून जातां.

कुतूहल हें बेतांत असेल व त्याचं समाधानकारक अुत्तर मिळालं तर तें आवाक्यांत राहतं. नाहीतर न समजणाऱ्या गोष्टी अुमजून घेण्यासाठी तुम्ही मुलं कांहीतरी अनिष्ट असे प्रयोग करतां, नको तीं पुस्तकं वाचतां, नकोत त्या व्यक्तींकडून माहिती मिळवितां.

मानवी शरीर ही अीश्वराची सर्वांत अुत्कृष्ट अशी निर्मिति आहे. आपल्या जीवनाचा अर्थ, आपल्या शरीराची माहिती, तें निर्माण करण्याचा हेतु, यासंबंधी जे जे

प्रश्न आपल्याला विचारावेसे वाटतील, त्या त्या प्रश्नांची माहिती अगदी स्पष्टपणें, आपण ज्या व्यक्तीवर विश्वास ठेवतों अशा व्यक्तीला विचारणं यांत पाप नाही व कमीपणाहि नाही. असा अेक काळ होता, की ज्या वेळीं मुलांमुलींनी आपल्या शरीर-रचनेबद्दल प्रश्न विचारणं म्हणजे विनयाच्या मर्यादा सोडून वागणं समजलं जाअी – अगदी अश्लील समजलं जाअी. वडील माणसांकडून अुत्तरं देण्याची टाळाटाळहि होअी. कधीकधी गैरसमज करणारीं अुत्तरं मुलांना मिळत व त्यामुळं मुलं आपलं कुतूहल वाममार्गानं शोधण्याचा प्रयत्न करीत. ही स्थिति आता बदलली आहे.

सर्वांत तुमची जवळची मैत्रीण कोण वरं? तुमचं विश्वासस्थान कोण वरं? सहानुभूति दाखविणारी व्यक्ति कोण वरं? अगदी तुमच्या घरांतली व्यक्ति – वात्सल्याच्या पदरानं तुमचे दुःखाश्रू पुसणारी कोण वरं? तुमची आअी! होय, तीच माता तुमच्या किशोरसुलभ शंकांचं समाधान करील. तुमच्या जीवनांतील या महत्त्वाच्या कालखंडाची आखणी करायला मदत करील. भावी सुखी जीवनाचा पाया मजबूत कसा करावा याची माहिती देअील. कोणत्याहि अिमारतीचा पाया मजबूत असेल तरच ती अिमारत अधिक काळ टिकते; वारा, वादळ, अन् पावसाचे तडाके सोसते. बाह्यरंगाला भुलून आपण पुष्कळदा म्हणतों, की ही अिमारत सुंदर दिसते. पण तिचं तें खरं सौंदर्य नसतं. कौमार्य हें असंच आहे. जिचं कौमार्य मजबूत, निष्कलंक व निर्मळ, तिचं तारुण्यहि सुंदर! स्वभाव, संस्कार हे बालपणापासून बनत असतात. शिक्षण, शिस्त, आअीबापांचं वळण हें सर्व बालपणापासून कौमार्यावस्थेंत तयार व्हायचं असतं. कौमार्यांतून तारुण्याचा विकास होतो. आजा-आजी, आअी-बाप, बहीण-भावंडं, चुलते-मामे वगैरे अनेक माणसांच्या कुटुंबांत मुलीला अनेक विषयांचं शिक्षण मिळत असतं. कौमार्यांतच ह्या साऱ्या गोष्टींकडे लक्ष द्यायचं असतं. म्हणून कौमार्य हाच स्त्रीजीवनाचा पाया आहे असं समजलं जातं.

अत्यंत बहारीचा हा काळ अिंद्रधनुष्याप्रमाणं आपल्या जीवनांतील अत्यंत सुखाचा काळ असतो.

अशी अेक समजूत आहे, की अिंद्रधनूचं टोक जिथं स्पर्श करतं त्या ठिकाणीं धनाचा ठेवा असतो. कुमारावस्थेच्या अिंद्रधनूचं टोक असंच भावी जीवनांतील सुखाचं धन तुमच्या स्वाधीन करतं.

• • •

प्रकरण २ रें

वयांत येतांना–

किशोरी, तेराचवदा वर्षांचं हें तुमचं वय संस्कारक्षम म्हणूनच साऱ्या ह्यातींतला हाच कालखंड अत्यंत महत्त्वाचा असतो. या वयांत येतांना धाडसाचीं कामं करावीं, धाडसाच्या कथा वाचाव्या, अैकाव्या, असं तुम्हांला वाटतं. आपल्या शरीराची वाढ झपाट्यानं होत आहे, त्यांत कांही विलक्षण फेरफार होत आहेत, एक प्रकारचा नवा अुत्साह आपल्याला वाटत आहे, असं तुम्हाला वाटतं. कांहीतरी पराक्रम करावा अशी मनाला ओढ लागते. शाळेच्या संमेलनांतून, नाटकांतून, सभांतून प्रामुख्यानं भाग घ्यावा व कीर्ति मिळवावी असं तुम्हांला वाटतं. अमुक करूं नको, तमुक करूं नको, म्हणून वडील माणसं सांगतात; पण तुम्ही कुठं अैकायला कबूल असतां? वडील माणसं परिणामाकडे लक्ष देतात. ज्यांत संकटांना तोंड द्यायचं असतं, जोखीम, पत्करायची असते, अशीं कामं तुम्ही हौसेनं करण्याची अीर्षा दाखवितां. भीति हा शब्द तुमच्या कोशांत नसतो. परिणामाकडे लक्ष न देतां देहाचा पूल करणारे शिवाजी-महाराजांचे मावळे तरुणच होते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत तुमच्यासारख्या मुलांचा फार मोठा भाग होता. सत्याग्रहांत भाग घेण्यासाठी मुलांमुलींची चढाओढ लागे. पोलीसांनी रोखलेल्या बंदुकांच्या गोळ्यांना तरुण मुलं दाद देत नसत. तुरुंगाची भीति नष्ट झाली होती. हें झालं राजकारण. पण सामाजिक सुधारणेंतसुद्धा तुम्ही आघाडीवर असतां. जातीचीं, शिवाशिवीचीं, सोवळ्याओवळ्याचीं बंधनं तुम्हांला बांधूं शकत नाहीत. अुचनीच हे भेद तुमच्या आड येत नाहीत. कांही नवीन गोष्ट करायची असेल, तर

अनुक्रम 37543 दि:
क्रमांक .. नों. दि.

तिच्यासाठी त्यागाची, बलिदानाची तुमची तयारी असते. विरोध करणं, लढा देणं हीं कामं तरुण मुलंमुलीच करूं शकतात, हें मोठ्या लोकांनी ओळखलं आहे म्हणून आजचं युग हें तरुणांचं आहे असं म्हणतात.

कोणतेहि सामर्थ्यवान, तडफदार विचार तुमच्या हल्लीच्या वयांतच – मुलींच्या बाबतींत तेरा-चवदाव्या व मुलांच्या बाबतींत पंधरा-सोळाव्या वर्षांतच उद्भवतात व स्थिरावतात. भावी कार्याचे मनोदय या वयांतच रचले जातात. श्रीमंत, सत्ताधीश, कीर्तिमान पंडित होण्याचे मनोरथहि याच वयांत मुली बाळगतात. धनवान होऊं पण स्वार्थी होणार नाही – अनुदार होणार नाही, सत्ताधीश होऊं पण सत्तेचा दुरुपयोग करणार नाही, अशी महत्त्वाकांक्षाहि याच वयांत तुमच्यांत प्रबल होते. थोरांचीं चरित्रं पाहिलीं तर याच वयांत त्यांच्या थोरपणाचीं बीजं पेरलेलीं दिसून येतात.

जगांतील अन्याय, जुलूम व खोटेपणा, ढोंगीपणा पाहून लहान मुलंच अधिक संतापतात, भडकतात, तडातडा बोलतात. गरीब–श्रीमंत, अुच्च–नीच, लहान–मोठं, तुझं–माझं हे भेदभाव लहान मुलांच्या सृष्टींत नसतात म्हणूनच अशा निष्कलंकित काळांत तुम्हांला आपलीं निर्मळ ध्येयं ठरवितां येतात. जें जें अुच्च, दिव्य व भव्य तें तें आपण पार पाडूं अशा अुच्च भावनेचा प्रादुर्भाव या वयांत तुमच्यांत होतो. म्हणूनच थोर स्त्री-पुरुषांचीं चरित्रं वाचण्याला हा योग्य काळ आहे. भारतीय थोर स्त्रियांची परंपरा अेवढी मोठी आहे, की तुम्हांला त्यांच्या चरित्रांतूनच आपल्या ध्येयसिद्धीचं मार्गदर्शन होअूं शकेल. वेदकालीन विश्ववारा, अपाला, घोषा, नाहीतर गार्गी, मैत्रेयी तुम्हांला बुद्धिजीवि जीवनाची ओढ लावतील. रामायणांतील अनसूया, सीता, सुमित्रा, स्वयंप्रभा; महाभारतांतील गांधारी, कुंती, द्रौपदी, लोपामुद्रा, सावित्री, सुलभा या स्त्रिया पतिनिष्ठेचं ध्येय सादर करतील; तर पुराणांतल्या मदालसा, देवहुती ह्या मातेचा आदर्श तुमच्या पुढं ठेवतील. अितिहासकालांतील राणी लक्ष्मीबाअी, श्रीजिजामाता यांतील अेकेक नांवसुद्धा त्या त्या कालाला प्रकाशमान करणारीं आहेत. पण चालू काळाला व देशाच्या प्रगतीला अनुसरून ज्या ज्या क्षेत्रांत तुम्हांला काम करावंसं वाटेल त्याची तयारी याच कालांत करावयाची आहे अेवढं लक्षांत ठेवलं पाहिजे.

सर्वच मुलींना वरीलसारख्या स्त्रियांप्रमाणं थोर होण्याची परिस्थिति लाभतेच असं नाही. कित्येक मुली श्रीमंत, कीर्तिमान, विद्वान व सौंदर्यवती होण्याचे मनोरथ

बाळगतात. मुलींना श्रीमंत नवरा मिळविण्याचीं सुखस्वप्नं पडत असतात. त्यागाचे, अुदारतेचे मनोरथ, अन्याय-प्रतिकाराचे, तसेच सुधारणा करण्याचे, सेवाव्रतपालनाचे मनोरथ तुम्ही याच वयांत रचीत असतां. पण ते सर्वच मनोरथ परिपूर्ण होतात असं नाही. जगाच्या सामान्य चाकोरींतून मग तुम्हांला जावं लागतं व लाखांतीलच आपण अेक आहों अशा समाधानांत अुभं आयुष्य कंठावं लागतं. तुम्ही विचाराल, आम्हीं बाळगलेल्या आशा अशा व्यर्थ कां होतात? त्याचं कारण, नुसती आशा बाळगून कार्यसिद्धि होत नसते. त्या आशा साकार करण्यासाठी हुषारी, मेहनत व चिकाटी लागते. अंगीं धाडस असावं लागतं. हे गुण कमवावे लागतात, तरच कार्यक्षमता वाढते. हें वय जसं मनोरथ बांधण्याचं असतं, तसंच त्या मनोरथांना मूर्त स्वरूप देण्यासाठी आवश्यक लागणाऱ्या शक्ति कमावण्याचाहि हाच काळ असतो. व्यायामानं शरीर कणखर करणं ही पहिली आवश्यक गोष्ट असते. अभ्यासानं बुद्धि कमवावयाची असते. सत्यानं व न्यायमार्गानं जातां येअील असं चारित्र्यबल तयार करावं लागतं. शरीरासाठी व्यायाम, बुद्धिविकासासाठी अुद्योग व अभ्यास, निष्कलंक चारित्र्यासाठी सदाचारी व चारित्र्यसंपन्न माणसांचा सहवास ह्या गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते.

या वयांतील मुलांमुलींत जशी पराक्रमाची व धाडसाची आवड अुत्पन्न होते तशीच अेक दुसरी वासना अुत्पन्न होते. ही भावना म्हणजे अेक सुखावह ओढ असते. ही ओढ कोणाबद्दल व कशासाठी असते हें जाणण्याची तुम्हांला अिच्छा असते. पण लज्जेमुळं तुम्ही तें कोणाला विचारूं शकत नाही. पण किशोरी, मी त्याबद्दल तुला अगदी अुघडअुघड सांगणार आहें. मी तुझी आअी – माझ्यापेक्षा तुला अधिक जवळची मैत्रीण कोण बरं?

या वयांत जी अेक सुखावह ओढ अुत्पन्न होते, ती मुलींच्या बाबतींत तरुण मुलांबद्दल असते व मुलांच्या बाबतींत मुलींविषयी असते. अशी ती ओढ कां लागते याविषयी आम्हीं वडील माणसांनी वास्तविक तुम्हांला आगाअू सूचना द्यायला पाहिजे; पण आम्हीच चुकतों. आम्हीच अुडवाअुडवीचीं अुत्तरं देतों. आम्ही समजतों त्यापेक्षा मुलांमुलींना कितीतरी अधिक माहिती असते; पण ती खऱ्याखोट्या कल्पनांनी मिश्रित असते. तिचं सत्य ज्ञान योग्य भाषेंत देणं हें आम्हां मातापितरांचं कर्तव्य असतं. पण किशोरी, मी तुला तें अगदी मोकळ्या मनानं सांगणार आहे. मीं तुला मघा सांगितल्याप्रमाणं तरुण मुलांविषयी वाटणारं आकर्षण या वयांत जाणवतं.

जगांतल्या सर्व वस्तुजाताच्या– प्राणिमात्राच्या निर्मितीचं कारणच मुळी या आकर्षणावर अवलंबून आहे. नर व मादी हे दोन भेद सर्व प्राणिमात्रांच्या व वनस्पतींच्याहि ठिकाणीं आहेत, असं आता शास्त्रज्ञांनी सिद्ध केलं आहे. स्त्रीकेसर व पुंकेसर हें नर-मादीचं तत्त्व वनस्पतीच्या जननाचं कार्य करतात. नर व मादींतील आकर्षण हें अेक फार मोठं सामर्थ्य आहे. या आकर्षणामुळंच नर व मादी यांचा संबंध घेडून येतो आणि अशा संबंधांतून मग नवीन पिढी निर्माण होतो. पक्ष्यांचीं पिलं, जनावरांचे बच्चे, माणसांचीं बालकं म्हणजेच नवीन पिढीचे अंकुर होत.

किशोरी, सामान्य-विज्ञानाच्या पुस्तकांत वनस्पति, पशुपक्षी यांच्या जीवनाबद्दल तूं वाचलंच आहेस. वनस्पतीमधेहि नर व मादी असे भेद असतात. त्यांना जीवहि असतो. आपण धान्य पेरतों तें अंकुरित होतं. पेरलेल्या अेका दाण्याचे असंख्य दाणे होतात. आंब्याची कोय लावली तर तिचा वृक्ष होतो. वृक्षाला असंख्य फळं येतात. अेकेका फळांत पुन्हा अेकेक कोय. गायीला कालवडी होतात, गोऱ्हे होतात. कोंबडीला पिलं होतात. कुत्र्यामांजरांना पिलं होतात. हीं सर्व सजीव असतात म्हणून त्यांची वाढ होते. आपण जर दगड, भांडीं, रुपये, सोनं पेरलं तर त्यांची वाढ होअील काय? त्यांना जिवंत राहायला अन्न लागत नाही. आपण होअून त्या वाढतहि नाहीत व म्हाताऱ्या होअून मरतहि नाहीत. पण क्षुद्र गवतापासून प्रचंड वृक्षवेली अुगवतात, वहरतात व कोमेजून नाहीतर वठून जातात, विनाश पावतात; तरीहि त्यांच्या जातीचा नाश होत नाही. कारण आपली जात–वंश कायम राखण्यासाठी तीं आपलं बीज ठेवून जातात. फळाफळांतून बी असतं, तें जमिनींत पेरलं की त्याच्याचसारखं फळाचं झाड अुगवतं. स्वतःच्या जातीच्या अितर जिवाला जन्म देण्याची जी शक्ति असते तिला जननशक्ति म्हणतात. ह्या शक्तीमुळंच सृष्टिचक्र अखंड फिरत राहतं. या शक्तीच्या अभावानं झाडंझुडुपं अेकदा वाळून जर गेलीं तर फळं मिळणारच नाहीत; फुलं कोमेजलीं की बगीचे फुलणार नाहीत. माणसांचंहि तसंच. पृथ्वीवर दिसणारे पशुपक्षी, वृक्षवेली, माणसं–हीं सर्व मृत्यूनं नाहीशीं झालीं तर सजीव सृष्टीचा अंत होअील. पण तसं होअूं शकत नाही. कारण निसर्गाची योजना वेगळी आहे. जितके सजीव प्राणी मरतात त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक प्राणी जन्मावे अशी निसर्गाची योजना आहे.

—पण हें धोत्र्याचं फूल कुठून आणलंस? दे अिकडे तें! फार गंमतीदार फूल आहे हें! ह्याच्याच जन्मकथेवरून सुरवात करूं. तूं विज्ञानाच्या पुस्तकांत पुष्कळ वाचलं आहेस यासंबंधी. सजीव सृष्टींत मुख्य जाति कोणत्या बरं?

“वनस्पति, मासे, पक्षी व सस्तन प्राणी.”

“बरोबर! पण सस्तन प्राणी म्हणजे?”

“आअीच्या दुधावर ज्यांचं संगोपन होतं ते प्राणी—कुत्रा, मांजर, गाय——”

—आणि आपण माणसं या शेवटच्या जातींतीलच आहोंत. वरील सर्व जातींचे नियम आपल्याला लागू आहेत. सृष्टींतील सर्वच प्राणी जन्मतात, वाढतात व मरतात; पण मरण्यापूर्वी नवीन जिवाला जन्म देतात. हा सृष्टीचा क्रम सर्व जातींना सारखाच लागू आहे. नर व मादी यांच्या साहाय्यानं नवीन जन्म संभवतो. वनस्पतींना जननेंद्रियं असतात हें अैकून तुला आश्चर्य वाटलेलं दिसतं. पण ह्या धोत्र्याच्या फुलावरून तुला तें स्पष्ट दिसेल.



फुलाचीं जननेंद्रियें

वनस्पतींचीं जननेंद्रियं फुलांत असतात. झाड तयार व्हायला बी लागतं. हें बी फळांतून येतं व फळ फुलांतून निर्माण होतं. म्हणजे बी फुलांतूनच निर्माण होतं. फुलांत पुकेसर व स्त्रीकेसर असतात. हे पाहा लिलीचे पुकेसर—स्त्रीकेसर. यांचा संयोग झाला की अेक चिकट धागा तयार होतो. ह्या परागवाहिनीच्या नळींतून तो ह्या बीजकोशांत जातो. बीजकोशांत लहान अंडीं असलेला अेक बीजांड नांवाचा भाग असतो. परागवाहिनींत आलेल्या चिकट धाग्याचा या बीजांडांतील अंड्याशीं संयोग झाला म्हणजे बीजधारणा होते. बीजधारणा झाली म्हणजे पाकळ्या सुकतात व गळून पडतात. बीजकोश वाढत जातो. त्यांत

रस अुत्पन्न होतो — गर तयार होतो. हा रसाळ गर म्हणजेच फळ. त्यांतील बीजांडांत जीं लहान अंडीं असतात त्यांपासून बिया तयार होतात. ह्या बिया जमिनींत पेरल्या की पुन्हा रोपं अंकुरित होतात. त्यांनाच आपण वनस्पतींचीं बाळं म्हणतों.

आता ह्या धोत्र्याच्या फुलांत पुकेसर व स्त्रीकेसर दोन्ही आहेत. अशा फुलांना पूर्ण-फुलं म्हणतात. कांही फुलांत तीं अेकत्र नसतात. त्यांना अपूर्ण-फुलं म्हणतात. अशा फुलांतील परागांचं मीलन किंवा पुकेसर व स्त्रीकेसर यांचा संयोग व्हावा म्हणून एका फुलांतील पुकेसरावरील पराग दुसऱ्या फुलांतील स्त्रीकेसराकडे नेण्याचं कार्य कीटक, फुलपाखरं व वारा यांच्याकडून होतं व मग बीजधारणा संभवते.

माशांचा जन्मदेखील असाच. नरमासा व मादीमासा यांच्या जननेंद्रियांतील अुत्पादनद्रव्याचा संयोग झाला की नवा मासा जन्माला येतो. पण हा संयोग जरा वेगळ्या प्रकारचा असतो. पावसाळ्याच्या सुरवातीलाच असा संयोग घडून येतो, कारण ह्याच काळांत मादीमाशाच्या शरीरांत अंडीं तयार होतात. मादीमाशांचे गटच्या गट आपलीं अंडीं अुथळ पाण्यांत सोडतात. अेका चिकट पदार्थामुळं — वीर्य-जंतूमुळं तीं असंख्य अंडीं अेकमेकांना चिकटून तरंगतात. याच वेळीं नरमासे आपल्या जननेंद्रियांतून एक प्रकारचा चिकट पदार्थ — वीर्यजंतु — त्या तरंगणाऱ्या अंड्यांवर टाकतात. त्यांचा संयोग झाला म्हणजे नवा मासा जन्माला येतो. माशांची वाढ बाहेर पाण्यांत होते. ते आअीच्या पोटांत वाढत नाहीत. पण मादीच्या शरीरांतील अंड्यांचा व नराच्या शरीरांतील वीर्यजंतूंचा संयोग झाला तरच नवा मासा जन्माला येअू शकतो.

पक्षीजन्म-रहस्यहि असंच.

पक्षिणीच्या अंडाशयांत अंडीं प्रथम तयार होतात. तेथे हीं अंडीं सूक्ष्म अवस्थेंत असतात. त्यांचा व नराच्या वीर्यजंतूंचा संयोग झाला म्हणजे तीं गर्भाशयांत सरकतात व वाढीला लागतात. त्यांची वाढ होतांच मादी गर्भाशयांतील अंडीं योनिमार्गें बाहेर टाकते. मादीच्या गर्भाशयांतून अंड बाहेर पडलं की पक्ष्याचा पहिला जन्म होतो. अंड्यांना ती अुबवते व आंतील जिवाला वाढवीत असते. वाढ पूर्ण होतांच अंड्याचं कवच फोडून तें चिमुकलं पक्षी-बाळ बाहेरच्या जगाला प्रथमच पाहतं. असा पक्षी दोनदा जन्मतो, म्हणून पक्षाला 'द्विज' हि म्हणतात. 'द्वि' म्हणजे दोन व 'ज' म्हणजे जन्मणं.

ह्या जीवसृष्टींतील जन्मकथेवरून कांही गोष्टी तुझ्या ध्यानांत आल्या असतीलच. प्रथम नर व मादी यांचा संयोग व्हावा लागतो. या संयोगापासून बीज किंवा गर्भधारणा संभवते. वनस्पतींच्या बाबतींत अंकुर, माशाच्या बाबतींत अंडीं व पक्ष्याच्या बाबतींतहि अंडीं तयार होतात. अगदी हाच नियम मानवी बालजन्माच्या बाबतींत कसा तंतोतंत लागू पडतो तें मी तुला सांगणार आहे.

• • •

प्रकरण ३ रें

कशावरून ग मी मोठी झालें ?

" आ आी, कशावरून ग मी मोठी झालें ?"

चांगला प्रश्न विचारलास किशोरी! आता मी तेंच सांगणार आहें तुला. बालवयांत मुलाचं नि मुलीचं शरीर सारखंच असतं. खांदे, स्नायु यांचं प्रमाण सारखंच असतं. छाती सपाट असते. पण अकरा वर्षांचं वय होतांच मुलगी स्त्री होण्याच्या मार्गाला लागते. ह्या कालांत तिच्या शरीराची वाढ झपाट्यानं होते. थोड्याच महिन्यांत मुलगी अुंच, रुंद होत जाते. तिच्या चेहऱ्यांत मार्दव येअूं लागतं. बालवयांतील मुग्धपणा तिच्यांत दिसून येत नाही. तिचा नितंब भाग रुंदावत जातो. शरीराचे कोपरे मुलासारखे टोकदार न राहतां वर्तुलाकार बनतात. कारण तिच्या नाजूक व पातळ त्वचेखालील चरबीची वाढ होत असते.

बाळपणापासूनच मुलींचीं कांही अिंद्रियं मुलांच्या अिंद्रियांपेक्षा वेगळींच असतात. निसर्गानंच तिची घडण वेगळी केलेली असते. ह्या अिंद्रियांना प्रजननअिंद्रियं म्हणतात. ह्या अिंद्रियांमुळंच तिला आअी होतां येतं. बालदशेंत हीं अिंद्रियं कांहीच कार्य करूं शकत नाहीत. तीं नुसतींच भातुकलींतील वस्तूप्रमाणं लहान स्वरूपांत प्रकट झालेलीं असतात. मुलगी मोठेपणांत येअीपर्यंत तीं आपल्या कार्याची वाट पाहात असतात. पचनेंद्रिय, श्वसनेंद्रिय, मज्जासंस्था, पंचज्ञानेंद्रियं आणि अुत्सर्जक संस्था यांचीं कामं जन्मापासूनच बालकाच्या गरजेप्रमाणं होत असतात. यांच्या व्यतिरिक्त आपल्या शरीरांत आणखी

कांही अवयव असतात, ते जन्मापासून शरीरांत असले तरी त्यांचं कार्य स्पष्टपणें होअूं लागण्यास मुलीचं वय बारा ते चौदा वर्षांचं व्हावं लागतं व तीं पूर्णपणें कार्यक्षम व सशक्त होण्यास अठरा ते वीस वर्षांपर्यंतचा काळ जावा लागतो.

स्त्रियांचे मूत्रपिंड व मोठ्या आतड्याचं खालचं तोंड यांच्या दरम्यान अेक स्नायूंची तीन अिंच लांब व दोन अिंच रुंद अशी पिशवी असते. ही अुलट्या घड्याच्या आकाराची म्हणजे वरच्या भागाला रुंद व खाली बाटलीच्या गळ्यासारखी निमुळती झालेली असते. हिला गर्भाशय म्हणतात. तिच्या वरच्या बाजूनं अुजवीकडे व डावीकडे सुमारे चार ते पांच इंच लांबीच्या दोन बारीक नलिका गेलेल्या असतात. त्यांना



स्त्री-शरीराची रचना

बीजवाहक नलिका म्हणतात. त्यांच्या तोंडाजवळ बदामाच्या आकाराचे दोन अंडाशय आहेत. मुलगी बारातेरा वर्षांची झाली म्हणजे शरीराची वाढ झपाट्यानं होअूं लागते व अंडाशयं आपलं कार्य करावयास सुरवात करतात. दृष्टीस दिसणार नाहीत असं सूक्ष्म अंड त्यांत तयार होतं. त्यालाच स्त्री-बीज अथवा स्वेतबीज म्हणतात. तें बीजवाहक-नलिकेंतून गर्भाशयांत येतं व तिथून तें शरीराबाहेर फेकलं जातं. या हालचालींची जाणीव मुलींना होत नाही, परंतु तें स्त्री-बीज गर्भाशयांतून निघून

जातांना तेथील नाजूक आंतरत्वचा – ह्या त्वचेला अस्तर म्हणतात, ती सुटते व रक्तस्राव सुरू होतो. यालाच आपण मासिक पाळी म्हणतों.

साधारणपणें अठ्ठावीस दिवसांच्या अंतरानं हा रक्तस्राव होतो व तो चारपांच दिवस टिकतो. पहिले दोन दिवस स्रावाचं प्रमाण जास्त असतं व नंतर तें कमी होऊं लागतं. कांही मुलींच्या बाबतींत सुरवातीस पाळी बरीच अनियमितपणें येते. कारण त्यांचे अवयव कांहीसे अशक्त असतात. थोड्या महिन्यांनंतर पाळी नियमित येऊं लागते. कांही मुलींच्या बाबतींत रक्तस्राव सहा-सात दिवसदेखील चालू असतो. तो फार अधिक प्रमाणांत नसेल व अशक्तपणा येत नसेल तर घाबरण्याचं कारण नसतं.

श्वास घेणं, अन्नपचन होणं, मलोत्सर्जन होणं यांच्याअितकीच मासिक पाळीची क्रिया स्वाभाविक असते. शरीरास कोणताहि त्रास न होतां ही क्रिया नैसर्गिकपणें झाली पाहिजे. परंतु पाय किंवा कंबर दुखणं, थकवा येणं, मळमळणं अशीं लक्षणं अेकदोन दिवस बऱ्याच मुलींना होतात. तीं विशेष तीव्र स्वरूपाचीं नसल्यास त्यांकडे फारसं लक्ष देऊं नये. शारीरिक शक्ति वाढल्यानं पुष्कळ वेळां हीं लक्षणं नाहीशीं होतात. या काळांत रक्ताभिसरण जोरांत चालतं, अुत्साह नाहीसा होतो, चेहरा काळसर होतो, डोळ्यांच्या खाली काळीं वर्तुळं दिसतात व अशक्तता वाढते. मासिक पाळींतील अवस्थेंत असलेल्या स्त्रीला 'पुष्पवती' हें गोड नांव देण्यांत किती रसिकता आहे बरं ?

कांही मुलींची मासिक पाळी – हिला रजोदर्शन असंहि दुसरं नांव आहे – अकराव्या वर्षी सुरू होते, तें अस्वाभाविक होय. रजोदर्शन होण्याचा काळ हवामान व आहार यांवर अवलंबून असतो. आपल्या देशासारख्या अुष्ण कटिबंधांतील देशांत मुलींना बारा ते चवदा वर्षांच्या दरम्यान व शीत कटिबंधांतील देशांत सोळा ते अठरा वर्षांच्या दरम्यान रजोदर्शन होतं. या वयांत मुली तारुण्यांत प्रवेश करतात. त्या वेळीं मुलीच्या शरीरांत अनेक फेरबदल होतात. नवीन भावना, नवे मानसिक गुण दिसूं लागतात. कधी शरीर जड झाल्यासारखं वाटतं, कधी थकवा आल्यासारखा वाटतो, कधी जादा अुत्साह वाटतो तर कधी क्षुल्लक कारणावरून मुली चिडतात व या ना त्या कारणावरून रडत बसतात. 'रडूबाअी' म्हणून मग तुम्हांला घरांतलीं माणसं चिडवितात. म्हणूनच वडील माणसांच्या सहानुभूतीची अधिक जरूर तिला याच काळांत

लागते. शरीराच्या गोलाकार अवयवांना — म्हणजे छातीला, नितंबांना आकर्षकपणा येतो. मुली विनयशील, लज्जाशील बनतात. त्यांचा अल्लडपणा कमी होतो. आपल्यांत स्त्रीत्वाचा अुदय होत आहे व आता आपण तरुण होणार आहोंत हें मुलींना हळूहळू कळून येतं.

तुम्ही वयांत येतां. पहिल्या रजोदर्शनाच्या वेळीं रक्त पाहून आपल्याला अेखादा रोग तर झाला नाही, असं तुम्हांला वाटतं. वडील माणसांना सांगण्याची लाज वाटते. मग आपले कपडे गुपचुप धुअून ते वाळत घालतां. किंवा ओलेच्या ओले वापरतां व सर्दीतापाला आमंत्रण देतां. पण कधीकधी यामुळं मासिक पाळी अजिबात थांबते व शरीराला अपाय होतो.

मासिक पाळी सुरू होणं हें जसं तारुण्याचं लक्षण आहे तसं माता होण्याच्या पात्रतेची ती शारीरिक तयारी आहे — योग्यता नव्हे, हें मुलींनी लक्षांत ठेवावं. कळी म्हणजे फूल नसतं, फूल म्हणजे फळ नसतं, तिचा पूर्ण विकास व्हायला अवधि असतो. मासिक पाळी हा अेक शरीरधर्म आहे. निरोगी मुलींना त्यापासून कोणताहि त्रास होत नाही; पण या वेळीं जर पोटदुखी होत असली तर कांहीतरी बिघडलं आहे असं समजावं. मासिक पाळीच्या वेळीं अति श्रम झाले, गारठा लागला, तर रजोदर्शन कष्टदायक होतं.

बद्धकोष्ठाचा विकार ज्यांना असतो त्यांनाहि ही पाळी वेदना देते. ज्यांना नियमितपणं शौचास जाण्याची सवय नसते त्यांच्या मलाशयांत व मोठ्या आतड्यांत मळ साचून राहतो, त्यामुळं गर्भाशयावर व अंडाशयावर दाब बसतो, ओझं पडतं व वेदनांना सुरवात होते. अति तिखट खाण्याची सवय, पचण्यास जड असा आहार, आवळेचिंचांचा फराळ, मनाला वाअीट रीतीनं अुत्तेजित करणाऱ्या वातावरणांतील राहणी, शृंगारिक कादंबऱ्यांचं वाचन ज्या मुलींना असतं त्यांची मासिक पाळी योग्य वयाच्या पूर्वीच सुरू होते. अेखादी कळी फुंक मारून अुमलविण्याचा प्रयत्न करावा तसंच हें असतं. पण अशी कळी लवकरच कोमेजून जाते.

चैन न पडणं, डोकं जड होणं, कंबर दुखणं, आळस येणं हीं मासिक पाळीचीं पूर्वचिन्हं होत. हीं सर्व चिन्हं दिसूनहि मासिक पाळी जर सुरू झाली नाही तर कुठंतरी कांहीतरी बिघडलं आहे असं समजायला हरकत नाही. अशा वेळीं डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्यावा.

पुष्कळ वेळां असंहि होतं, की अेकदा पाळी सुरू होते व नंतर कांही महिने ती बंद राहते. परंतु अितर बाबतींत जर प्रकृति चांगली असेल तर काळजी करण्याचं कारण नसतं. पुष्कळदा नियमित पाळी लागण्यास वर्ष दोन वर्षंहि लागतात.

मासिक पाळींत जें रक्त जातं त्याला विटाळ म्हणतात. विटाळ थोडा असला तरी घावरण्याचं कारण नसतं. जास्त विटाळ पडतो तो आपल्या कृत्रिम राहणीमुळं पडतो. ज्यांची राहणी नैसर्गिक व बेताची असते, ज्यांच्या राहणींत भडकपणा नसतो, अशा मुलींचा विटाळहि स्वाभाविकपणें कमीच येतो. जास्त विटाळ आल्यानंतर जर अशक्तपणा वाढला तर कांहीतरी चुकलं आहे असं समजावं. याचं कारण शरीराचा अशक्तपणा हें असेल, पण या स्थितीला गांगरून जाण्याचं कारण नसतं. मोकळी हवा, साधा आहार, शारीरिक, मानसिक विश्रांति व पोट साफ ठेवण्याची काळजी घेतली तर या स्थितीला भिण्याचं कारण नसतं. ओटीपोटांतच गर्भाशय असतो हें तुला सांगितलं आहे, म्हणून या सुमाराला पुष्कळ चालणं, अुड्या मारणं, पळणं, अति व्यायाम आणि श्रमाचीं कामं करूं नयेत, जड ओझीं अुचलूं नयेत.

तीन दिवस दूर बसण्याची आपली जुनीपुराणी मानलेली रीत आपल्या जुन्या माणसांनी अनुभवांतीं व दीर्घ विचारपूर्वक केलेली आहे. त्या काळच्या सामाजिक परिस्थितीला ती योग्य होती. त्या वेळीं एकत्र कुटुंबपद्धति अस्तित्वांत होती. सासू-सासरे, दीर-जावा, चुलती-चुलते, चुलत भावंडें यांच्या संमिश्र कुटुंबांत स्त्रियांना घर-कामांमुळं विश्रांति मिळणं शक्य होत नसे. नदीवरून किंवा विहिरीवरून पाणी आणणं, केरकचरा काढणं, स्वयंपाकपाणी करणं हीं सर्वच कामं स्त्रियांना करावीं लागत. म्हणून धर्माच्या व सोवळ्या-ओवळ्याच्या नांवाखाली त्या सक्तीनं दूर बसत, विश्रांति घेत. अशा चालीरीति केवळ जुन्या म्हणून त्यांना त्याज्य समजूं नये. त्यांतील हेतु ओळखावा. आता हीच चाल पाहा. मासिक पाळीच्या या तीन दिवसांत आवश्यक असणारी विश्रांति मुलींना असं दूर राहूनच मिळते. घरांतील काम करण्याची तिच्यावर पाळी येत नाही. आत्ताच्या पिढींतल्या तुम्ही मुली या चालीविरुद्ध नाकं मुरडतां. पण मग सक्तीची विश्रांति तुम्हांला मिळत नाही. तुम्हांला ओरडूनओरडून सांगावं लागतं—की 'अहो, मी पुष्पवती आहें—मला काम सांगूं नका—मला विश्रांति पाहिजे.' शाळेंत कवाअितीच्या वर्गशिक्षकांना मग आम्हांला चिठ्या द्याव्या लागतात, की मुलींना कवायत करायला सांगूं नका; कारण त्या मासिक पाळींत आहेत.

मासिक पाळीच्या दिवसांत अगदीच काम करूं नये असंहि नाही; पण पुष्कळ वेळपर्यंत अेकाच जागीं ज्या कामासाठी बसावं लागतं असं काम करूं नये. शक्यतों अधिक वेळ पडून राहावं. अशक्त मुलींनी तर संपूर्ण विश्रांति घ्यायला पाहिजे.

कांही बायका या तीन दिवसांत आंघोळ करत नाहीत, कपडेहि बदलत नाहीत. ही गोष्ट फार वाअीट आहे. वास्तविक या वेळींच शरीराच्या व कपड्यांच्या स्वच्छतेची अधिक जरूर असते. अून पाणी व साबण यांनी कपडे स्वच्छ धुवावे. डाग बाळलेले अस्वच्छ कपडे कधीहि वापरूं नयेत. मासिक पाळीच्या दिवसांत शारीरिक स्वच्छतेकडे, विशेषतः जननेंद्रियाच्या स्वच्छतेकडे अधिक लक्ष दिलं पाहिजे. दररोज अून पाण्यानं स्वच्छ करून अंग अगदी कोरडं पुसावं. या दिवसांत स्नान केल्यावर अपाय होतो ही जुनी कल्पना चुकीची आहे. थंड पाण्यानं मात्र स्नान करूं नये व अंग ओलं राहूं देअूं नये, अुघड्यावर झोपूं नये. गार पाण्यानं स्नान करण्याची सवय जरी चांगली असली तरी अशक्त मुलीनं गार पाणी टाळावं. तसंच ओल्यांत राहूं नये. ओटीपोटाला कोणत्याहि प्रकारें गारठा बाधणार नाही अेवढी काळजी घ्यावी.

स्त्रियांच्या जीवनांत मासिक पाळीचं महत्त्व मानलं आहे तें तिच्या गर्भसंभवाशीं निकट संबंध आहे म्हणून. अशा ह्या महत्त्वाच्या नैसर्गिक क्रियेसंबंधी काळजीहि तितकीच घ्यावी लागते.

पहिली महत्त्वाची गोष्ट मासिक पाळींत सांभाळायची असते ती म्हणजे रक्तस्राव शोषून घेण्याकरिता मऊ व पांढऱ्यास्वच्छ कापडाच्या घड्या वापरावयाच्या असतात. त्या दिवसांतून दोनतीन वेळां तरी बदलायच्या असतात. बाजारांत अशा निर्जंतुक घड्या विकत मिळतात त्या वापरल्यास चांगलंच; परंतु त्या सर्वांना विकत घेणं परवडत नाही. म्हणून स्वच्छ फडक्यांच्या घड्या सरकूं नयेत म्हणून चड्ड्या वापराव्या. अिंग्लंड-अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत सार्वजनिक जागीं म्हणजे हॉटेलांत, स्टेशनांत, सिनेमागृहांत, धर्मशाळांत, खेळण्याच्या जागीं, अशा ठिकाणीं या घड्यांची मुलींसाठी—स्त्रियांसाठी फुकट सोय केलेली असते. अशी योजना आपल्या देशांत सुरू करण्यासाठी स्त्री-संस्थांनी प्रयत्न करावयास हवेत.

हल्ली तुम्ही सर्वच मुली विकच्छ पद्धतीनं साड्या नेसतां, तेव्हा परकराची दोरी किंवा निऱ्यांची गाठ बबीवर येअूं न देण्याची दक्षता घ्यावी, कारण त्यामुळं पोट दबतं व ओटीपोटावर भार पडतो. आंतील चड्डीहि फार तंग असूं नये. झोपतांना

अंगावरच्या पांघरुणाचा भार ओटीपोटावर पडणार नाही याची काळजी घ्यावी लागते. घडीसाठी अस्वच्छ व जुने, घाणेरडे, टाकाऊ कपडे वापरूं नयेत. त्यामुळं जननेंद्रियास कंड सुटून पुटकळ्या अुठतात.

या तीन दिवसांत हलकं अन्न खायचं असतं. आंबट, तिखट पदार्थ टाळायचे असतात. थोडक्यांत सांगायचं म्हणजे मासिक पाळीच्या दिवसांत भरपूर झोप, मोकळी व ताजी हवा, साधा पण पौष्टिक आहार, सैलसे काळसर रंगाचे पण स्वच्छ कपडे, व्यायाम टाळून विश्रांति या गोष्टींकडे तर लक्ष द्यावंच लागतं, पण या सर्वांहून अधिक महत्त्वाची अशी मानसिक शांतता मिळवण्याकडे अधिक लक्ष ठेवावं लागतं. पण—

तुम्ही करतां तें अुलटंच! थकवा येअील असे शारीरिक श्रम तुम्ही करतां; संकोचामुळं आपली अडचण शाळेंत शिक्षकांना सांगत नाही; खुशाल मन मानेल तो व्यायाम करतां. अुड्या काय मारतां, हुतुतु–लंगडींत भाग घेतां, लांबलांब सहलींत भाग घेण्याचा तुम्हांला मोह पडतो; पण यामुळं गंभीर स्वरूपाच्या अिजा होण्याचा संभव असतो. जड वस्तु अुचलणं किंवा अुन्हांत फिरणंहि चांगलं नसतं. या दिवसांत सायकलवर बसणं शक्यतोंवर टाळावं. सावकाश चालण्यास कांहीच हरकत नाही.

मासिक पाळी सुरू होण्यापूर्वी किंवा सुरू झाल्यावर मलावरोध होण्याची सवय कांहींना असते. त्यामुळंच पोट दुखणं, ओकाऱ्या होणं वगैरे त्रास होतो. अशी सवय ज्यांना असेल त्यांनी सौम्य रेचक घेऊन आपला कोठा साफ ठेवावा.

मासिक पाळीची ही शारीरिक क्रिया अगदी नैसर्गिक आहे, म्हणून या बाबतींत वृथा लज्जा वाळगण्याचं कांहीच कारण नाही. आपली भूक, आपली झोप आपण अितरांपासून दडवतों का? मासिक पाळी ही कांही विचित्र गोष्ट आहे, त्याबद्दल बोलणं किंवा सांगणं लज्जास्पद आहे, अशा खोट्या समजुतीनं प्रकृतीस त्रास होत असला तरी पुष्कळ मुली त्यावर अुपचार करून घेत नाहीत हें गैर आहे. पोट दुखणं पायांत गोळे येणं, रक्तस्राव फार किंवा कमी होणं अित्यादि त्रास होत असल्यास आअीला विश्वासांत घेअून सांगावयास पाहिजे.

तोंड, नाक, कान या बाह्येंद्रियांची स्वच्छता राखण्याचा आपण प्रयत्न करतों; पण जननेंद्रियं हीं शरीराच्या गुप्त भागांत असल्यामुळं त्याकडे आपलं दुर्लक्ष होतं हें बरोबर नाही. अुलट जननेंद्रियांच्या स्वच्छतेबद्दल आपण अधिक दक्ष राहिलं

पाहिजे. कारण हीं अिंद्रियं शरीराच्या गुप्त भागांत असल्यानं व मलमूत्राशीं त्यांचा संबंध असल्यानं ह्या भागांत मळ व घाम साचतो, म्हणून स्नान करतांना ह्या भागाच्या स्वच्छतेकडे अधिक लक्ष दिलं पाहिजे; नाहीतर खरूज, गजकर्ण यांसारखे त्वचेचे रोग अुद्भवतात. स्नान करतांना मांड्या, जांघा व जननेंद्रियं गरम पाणी व चांगल्या साबणानं धुवावींत.

मासिक पाळीची सुरवात म्हणजेच तुम्ही वयांत आलांत हें सिद्ध होतं.

वयांत येणाऱ्या मुलींना कसंसंच वाटतं म्हणे! बोजडपणा अंगीं आल्यासारखा वाटतो. चालतांना पाय अडखळतात की काय असं वाटतं. पण अशा प्रकारचा बदल होत असतांना भिण्याचं कारण नसतं. कारण या वेळीं तुमच्या हातापायांत अेक नवीन सामर्थ्य निर्माण व्हायचं असतं. तुमच्या स्नायूंची वाढ होत असते. त्यामुळं तुमच्या हालचाली जोरदार होतात. त्यांच्यावर तुमचा ताबा राहूं शकत नाही. अेखादा मजबूत घोडा आवरायला प्रथम कठीण जातं, पण सवयीनं त्याच्या वेगावर आपल्याला नियंत्रण घालतां येतं, त्याचप्रमाणं तुमच्या ह्या वाढलेल्या शक्तीचं आहे. सवयीनं, अनुभवानं तुम्हांला त्यांच्यावर नियंत्रण ठेवतां येतं.

वयांत येतांना तुमच्या तोंडावर पुटकुळ्या येतात, त्यांना तारुण्यपीटिका म्हणतात. पण नेहमीच्या वापराच्या भाषेंत त्यांना मुरूम म्हणतात. ह्यांमुळं तुम्ही अधिक संत्रस्त होतां. आपल्या चेहऱ्यावरचं सौंदर्य वाढत आहे की कमी होत आहे याचा अंदाज तुम्हांला लागत नाही. तोंडावरचे हे मुरूम–पुटकुळ्या चिमटींत धरून चेपण्याचा तुमचा अखंड अुद्योग सुरू होतो. पण या क्रियेमुळं काळे डाग चेहऱ्यावर पडून चेहरा अधिकच विद्रूप होण्याचा संभव असतो.

"–पण मुरूम कां ग येतात?"

–बरा प्रश्न विचारलास हं, किशोरी. या वयांतील तुम्हां सर्वच मुलांमुलींपुढं हा प्रश्न असतो–मुरूम कां येतात? तुम्ही खूप खातां, त्वचा स्वच्छ ठेवीत नाही, असे आरोप वडील माणसं तुमच्यावर करतात. पण हें त्याचं खरं कारण नव्हे. तुमच्या त्वचेंतील ग्रंथी आपल्या कार्याला आता लागल्या आहेत हें त्याचं कारण. कांही ग्रंथीं-तील द्रव्यं या वेळीं त्वचेच्या बाहेर फेकलीं जातात.

मुलीच्या बाबतींत ती वयांत येण्याच्या संक्रमणावस्थेंत जो फरक होत असतो तो मुख्यतः तिच्या अंडाशयाकडून होतो. हें अंडाशय किंवा जननपिंड गर्भाशयाच्या

प्रत्येक बाजूस, बीजवाहक नलिकेच्या खालीच असतात. त्यांची जाडी अर्धा अिंच, रुंदी पाअूण अिंच व लांबी दीड अिंच असते. बाळपणांत या अंडाशयांना कांहीच कार्य नसतं ; पण त्यांच्या कार्याची सुरवात मात्र कुमारी-अवस्थेपासूनच होते.

अंडाशयांना दोन कार्यं करायचीं असतात. अेक प्रकारचा रासायनिक पदार्थ त्यांच्यांत उत्पन्न होतो. त्या रसाला हार्मोन — अंतःसर्ग म्हणतात. हे रस शरीरांत सर्वत्र खेळत राहतात व अिंद्रियांना आपल्या स्पर्शानं कार्यक्षम करतात. त्यांचं शरीरांत सर्वत्र अभिसरण होअून शरीरांत कांही बदल घडवून आणण्याचं कार्य ते करतात. स्त्रीच्या शरीरांतील वर्तुलाकार भागांची प्रमाणांत वाढ करतात. गर्भाशयाचा व वक्षस्थळाचा अुन्नतपणा घडवून आणतात. ही रासायनिक क्रिया मुलगी वयांत आल्यावरहि चालूच राहते व प्रजनन अिंद्रियांच्या कार्याला मदत करते.

अकरा ते चवदा वर्षांच्या दरम्यानच अंडाशय असे रासायनिक पदार्थ निर्माण कां करतात, ह्या प्रश्नाचं नीटसं समाधानकारक अुत्तर देतां येणार नाही. निसर्गाची मर्जी — अेवढंच म्हणतां येअील. पण हल्ली अुपलब्ध असलेल्या शास्त्रीय ज्ञानाच्या साहाय्यानं अेवढंच सांगतां येअील, कीं आपल्या मेंदूच्या तळाशीं अेक प्रभावी पिंड असतो, त्याला अधोरुह किंवा पिट्युटरी पिंड म्हणतात. या पिंडाचा ताबा अंडाशयावर असतो. हा पिंड जणू काय अंडाशयांना बजावतो — " सावध राहा, तुमच्या कार्याची वेळ समीप आली आहे ! "

अंडाशयांचं दुसरं कार्य म्हणजे स्त्रीबीजं — खेतबीजं ज्याला आपण म्हणतों — तीं निर्माण करणं हें होय. मानवी जीवनाचीं हीं बीजं होत. हा लहानसा सूक्ष्म कण म्हणजे बालकाच्या जीवनधारणेचा आधार होय. अंडाशय बालपणांत खेतबीजं अुत्पन्न करीत नाहीत. परंतु अकराबारा वर्षांपासून महिन्याला अेक याप्रमाणं तीं तयार होत असतात. अेका महिन्याला अुजव्या अंडाशयामधून तर दुसऱ्या महिन्याला डाव्या अंडाशयामधून असं पाळीपाळीनं हें कार्य चालत असतं. कधीकधी अेका अंडाशयाला अेखादा रोग झालेला असतो, अशा वेळीं शस्त्रवैद्य तो काढून टाकतात. मग अुरलेल्या दुसऱ्या अंडाशयालाच खेतबीजं तयार करण्याचं काम करावं लागतं.

हीं खेतबीजं निर्माण करण्याची क्रिया कुमारी-अवस्थेच्या पूर्वींच सुरू झाली म्हणजे मुलगी आअी होण्याची शक्यता तिच्यांत निर्माण झाली आहे असं समजून येतं. दर महिन्याला अेक याप्रमाणं खेतबीजं निर्मितीचं कार्य सतत स्त्री पंचेचाळीस वर्षांची

होअीपर्यंत चाललेलं असतं. मात्र मधेच गर्भधारणा झाली की अंडाशयाची ही क्रिया तात्पुरती बंद होते. पंचेचाळीस वर्षांनंतर खेतबीजं अुत्पन्न होत नाहीत, म्हणून गर्भ-धारणेची शक्यताहि नसते. अंडाशय ज्याप्रमाणं दर महिन्याला खेतबीजं निर्माण करतात त्याप्रमाणं गर्भाशयांतील अस्तर दर महिन्याला गर्भावस्थेचा संभव दाखविणाऱ्या नाजूक खेतबीजांच्या पोषणाची तयारी करीत असतं व दर महिन्याला खेतबीज तयार झाल्यानंतर कांही दिवस गर्भाशयाचं अस्तर मखमलीसारख्या मअू व जाड अशा पोषक द्रव्यानं भरून निघतं.

ज्या अर्थी मूल जन्माला यायला आअीची व बापाची जरुरी असते त्या अर्थी आअीबापांच्या मीलनाचा योग्य काळ विवाहानंतर असतो. म्हणून अशी वेळ येण्यापूर्वी आअीच्या शरीरांतील दर महिन्याला अुत्पन्न होणारं खेतबीज नाश पावतं. गर्भाशयाचं अस्तर विभक्त होअून त्याचे तुकडेतुकडे होतात व ते योनिमार्गातून चार दिवसांत बाहेर पडतात. या अस्तरांत बरंच रक्त असतं. या क्रियेंतून मासिक पाळी अुत्पन्न होते व ही मासिक पाळीची क्रिया अगदी नैसर्गिक व आरोग्यकारक अशीच असते. खेतबीज त्या त्या महिन्याला नाश पावून गर्भाशयाच्या अस्तराच्या रक्तप्रवाहाच्या रूपानं वाहून गेल्यावर पुन्हा नवीन खेतबीज व नवीन अस्तर तयार होण्याची क्रिया सुरू झाली हें ही मासिक पाळी सुचविते.

मासिक पाळी मोठ्या स्त्रियांपेक्षा लहान मुलींना अधिक तापदायक होते, याचं कारण गर्भाशयाची भिंत अस्तराचे तुकडे बाहेर टाकतांना संकुचित होते. गर्भाशयाचें तोंड व योनिमार्गाचे तंतु ताणले जातात.

मासिक पाळीच्या तीनचार दिवसांत मुलींना गळल्यासारखं वाटतं. अुत्साह नाहीसा होतो, चिरचिरेपणा येतो, हें जरी खरं असलं तरी मासिक पाळी म्हणजे प्रत्येक निरोगी स्त्रीच्या जीवनांतील अेक आवश्यक कार्यक्रम आहे. त्यांत भिण्यासारखं कांही नसतं. ती अेक नैसर्गिक क्रिया आहे. ती जर तशी होत नसेल तर मात्र भिण्याचं कारण आहे. निरोगी स्त्रीची मासिक पाळी नियमित असते. विवाहित व अविवाहित स्त्रियांत ती सारखीच असते.

विवाहित स्त्रियांच्या बाबतींत गर्भधारणेच्या काळांत मासिक पाळीची क्रिया थांबते. गर्भधारणेव्यतिरिक्त अितर कांही बाबतींतहि मासिक पाळीचा भंग होअू शकतो.

नेहमीचा आजार, हवामानांत अेकदम झालेला बदल व अतिशय काळजी, चिंता यांचा परिणामहि मासिक पाळीवर होतो.

हें सर्व माहीत झाल्यावर विधाता आपल्या मानवी बालकांच्या कल्याणाकरिता किती व कशा प्रकारें चिंता वाहतो हें आपल्याला दिसून येअील व आपलं हें शरीर ज्या कार्याकरिता त्यानं अुत्पन्न केलं आहे त्या शरीराची योग्य प्रकारें काळजी घेणं हें परमेश्वराचे आभार मानण्याइतकंच अुदात्त आहे हें समजून येअील. खरं न किशोरी ?

● ● ●

प्रकरण ४ थें

आता थोडं मुलांविषयी —

किशोरी, अेखाद्या चित्रकारानं मुलीची व्याख्याच करण्याचं ठरविलं तर तो म्हणेल—
वयांत येणारी मुलगी म्हणजे वर्तुळाकृति नमुना; त्याबरोबरच मअूमअू मखमली त्वचा, रुंद नितंब, मांसल बाहु, हनुवटीचे कंस! — तर मुलगा म्हणजे कोनाकृतीचा नमुना; रुंद खांदे, रोमयुक्त अवयव, अगदी केसाळ प्राणी! याचं कारण —

मुलांमधे तेरा-चौदा वर्षांच्या आसपास शारीरिक बदल होतो. हनुवटी, गाल, छाती, पोटाखालचा भाग या ठिकाणीं केस येअूं लागतात. मुलाची अुंची वाढते. आवाज बदलतो. तोंडावर मुरुम येतात. शरीरांतील अेन्डोक्राअिन नांवाच्या ग्रंथीपासून अंतःस्राव चालू होतो व तो सर्व शरीरभर पसरला जातो. त्यामुळंच वरील सर्व बदल घडून येतो.

ह्या वयांत मुलीचे विचार नेहमी घरासंबंधी चालत असतात. घरांत हेंच हवं, तेंच हवं, याची तिला चिंता! स्वयंपाकघरापासून दिवाणखान्याची सजावट, व्यवस्था करण्याच्या कामीं तिचीच धामधूम अुडते. वागणूक नम्रपणाची होते. आवाज मृदु होतो. तर याच्या अुलट मुलगा बाहेरच्या जगांत रमणारा, राकट वागणुकीचा व कठोर आवाजाचा होतो. कारण त्याला कंठ फुटलेला असतो. त्याच्या तोंडावर मुरुम येअूं लागतात. मग हें क्रीम लाव, ती पावडर चोपड असा त्याचा अुद्योग सुरू होतो. मुलामुलीचे हे शारीरिक भेद काय दाखवितात बरं? मुलींचीं शरीरं पत्नी, माता हीं कर्तव्यं पार पाडतां येतील अशींच कल्पिलीं आहेत, तर मुलांचीं शरीरं पति व पिता या कर्तव्यांना पात्र होण्यासारखीं रचलीं आहेत. मागं तुम्हांला मी सांगितलंच आहे

की स्त्रीच्या शरीररचनेंत गर्भसंभव, गर्भरक्षण व पोषणाची व्यवस्था केलेली असते. पण मुलांच्या जननेंद्रियांत अशी कांहीच व्यवस्था नसते. त्याचं कार्य फक्त रेतबीजं अुत्पन्न करून तीं पत्नीच्या शरिरांत गेलीं की तीं गर्भाशयाकडे पोचविणं. अेकदा हीं रेतबीजं पत्नीच्या शरिरांत गेलीं की तीं गर्भाशयाच्या पोकळींत जातात; तिथं जर खेतबीज त्या वेळीं तयार झालंच असेल तर त्याच्याशीं त्यांचा संयोग होतो. ह्या रेतबीजांचा खेतबीजाशीं संयोग म्हणजेच गर्भसंभव होतो. मुलांच्या जननेंद्रियाला दोन कार्ये करायचीं असतात. पहिलं — रेतबीजं तयार करणं व दुसरं — पौरुष अुत्पन्न करणारा व टिकवणारा अेक रासायनिक द्रव पदार्थ अुत्पन्न करणं. त्याला वीर्य म्हणतात.

अेका मांसल पिशवींत अेकमेकांना लागून मुलाच्या जननेंद्रियाचं स्थान असतं. ही पिशवी दोन जंघांच्या मध्यभागीं पुढल्या बाजूला असते. या पिशवीच्या पुढे बोटाच्या आकाराची लांबट नलिका असते, तिची लांबी अडीच ते साडेतीन अिंच असते. हें पुरुषाचं जननेंद्रिय होय. यांतून अेका बारीक नलिकेच्या वाटें लघवी बाहेर जाण्याची वाट असते. रेतबीजं बाहेर नेण्याचं कार्यहि हीच नलिका करते.

स्त्रियांच्या बाबतींत महिन्यांतून अेकच खेतबीज अुत्पन्न होतं, तर पुरुषांच्या बाबतींत रेतबीजं सतत व प्रचंड प्रमाणांत अुत्पन्न होतात. पिशवीच्या तळाकडून डाव्या व अुजव्या बाजूकडे असलेल्या बारीक नलिकेच्या वाटेनं जननेंद्रियामधून अुत्पन्न झालेलीं रेतबीजं स्त्रियांच्या शरीरांत शिस्ननलिकेच्या साहाय्यानं पोचविलीं जातात. रेतबीजांची वाढ प्रचंड प्रमाणांत असल्यानं तीं अंडाशयाच्या पिशवींत साठविलीं जातात. रेतबीजांनी समृद्ध असलेला हा चिकट द्रव पुरुषाच्या मूत्रनलिकेच्या टोका-मधून बाहेर पडतो. तो बाहेर पडत असतांना त्याचं दुसरं कार्य — लघवी बाहेर नेणं — होअू नये अशीच या अिंद्रियाची व्यवस्था निसर्गानं केलेली असते.

माता होण्यापूर्वीच ज्याप्रमाणं मुलीच्या शरिरांत खेतबीजं तयार होत असतात, त्याप्रमाणं मुलाच्या बाबतींतहि पिता होण्यापूर्वीच रेतबीजं तयार होत असतात. या कालांत आपल्या भावी जीवनासाठी मुलीमुलं तयार होत असतात; पण त्यांच्या व्यक्तित्वाची पूर्ण वाढ — म्हणजे शारीरिक व मानसिक वाढ झाल्याखेरीज व पतिपत्नीची भूमिका पार पाडण्याचं सामर्थ्य अंगीं आल्याखेरीज जननेंद्रियाच्या परिपूर्णतेला महत्त्व नसतं. तरीहि पिता होण्यापूर्वी तयार झालेल्या रेतबीजांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था निसर्गानं मुलांच्या बाबतींत केलेली असते. मुलीच्या मासिक पाळीच्या रूपानं जशीं

खेतवीजं पडून जाण्याची नैसर्गिक क्रिया असते त्याचप्रमाणं मुलांच्या बावतींतहि प्रमाणाबाहेर साठविलेलीं रेतवीजं आपोआप निसर्गयोजनेनं बाहेर पडतात. या व्यवस्थेला वीर्यपात किंवा स्वप्नावस्था म्हणतात. निरोगी मुलाच्या बावतींत ही स्वप्नावस्था प्रत्येक आठवड्याला झोपेंत होत असते. या अवस्थेंत बाहेर टाकल्या जाणाऱ्या रेतबीजांचं प्रमाण अल्प असतं. स्वप्नावस्था होणं ही अेक नैसर्गिक घटना आहे. स्वप्नावस्थेंतून वीर्य किंवा रेतवीजं जाण्यानं प्रकृतीवर वाअीट परिणाम होत नाही, अुलट मधूनमधून स्वप्नावस्था होणाऱ्या मुलांत पौरुष आहे व त्याची प्रकृति ठीक आहे असंच समजतात. मधूनमधून म्हणजे महिन्यांतून तीनचार वेळांच अशी स्वप्नावस्था झाली तर तें नैसर्गिक आहे – पण यापेक्षा अधिक वेळां ती होअूं लागली तर मात्र डॉक्टरी तपासणीचा तो विषय आहे असं समजावयास हरकत नाही. जननेंद्रियाची कमालीची स्वच्छता ठेवणं हा सर्वांत सोपा व खात्रीचा अुपाय आहे. मुलाच्या शरिरांत वीर्य तयार होण्याचं व तें प्रमाणाबाहेर झाल्यावर स्वप्नावस्थेच्या द्वारें बाहेर हाकण्याचं कार्य जरी नैसर्गिक समजलं जातं तरी असं अधिक वीर्य कां तयार होतं ह्याचाहि विचार करावयास पाहिजे. स्वप्नावस्थेचा अतिरेक थांबवावयाचा म्हणजे वीर्याची वाढ मर्यादित करावयास हवी. ही वाढ कोणत्या कारणांमुळं होते हें कळलं की वीर्योत्पत्ति आटोक्यांत आणतां येअील. अशा अनेक कारणांपैकी पहिलं व महत्त्वाचं कारण म्हणजे मुलींविषयी विचार करणं, नाटकं-कादंबऱ्यां-तील कामुक वर्णनं वाचणं, अश्लील, घाणेरड्या अभिरुचीचे चित्रपट पाहणं, शेजार-पाजारच्या मुलींकडे वाकवाकून पाहणं. – दिवसा पाहिलेल्या अशा दृश्यांमुळ रात्रीं मनावरचा बुद्धीचा ताबा नाहीसा होतो, वीर्य वाढतं व स्वप्नावस्थेच्या रूपानं बाहेर पडतं.

मसालेदार पदार्थांचा अतिरेक, दारू व अितर मादक पदार्थांचं आकंठ सेवन, विड्या, सिगरेट यांचं व्यसन, कॉफी-चहाचा अतिरेक हीं वीर्यवृद्धीच्या अतिरेकाला कारणं आहेत.

विवाहित होण्यापूर्वी कांही सुखांचा विचारहि करावयाचा नसतो, हें मुलं विसरलीं की त्याचा परिणाम त्यांना भोगावा लागतो.

मुलांच्या बाबतींत काय किंवा मुलींच्या बावतींत काय त्यांचं ब्रह्मचर्य जितकं निर्मल, दोषरहित तितकं त्यांचं चारित्र्य व शील अुंचावलेलं असतं. शीलाच्या शैलावर जितकं अुंच जातां येअील तितकं तरुणांमधे आपलं ध्येय लवकर गाठण्याचं सामर्थ्य वाढेल.

मुलांमुलींच्या बाबतींत विवाहापूर्वी जीवनरजःकणांची विल्हेवाट निसर्गाकडून अशा प्रकारें लावली जाते. तुम्ही म्हणाल, हीं मुलांचीं गुपितं अशीं उघड करून आम्हाला कां सांगतां ? सांगायला हवींच. कारण त्याचा तुम्हां मुलींच्या शीलरक्षणासाठी फार जवळचा संबंध आहे.

पुरुषाचं जननेंद्रिय फार संवेदनाक्षम असतं. जेव्हाजेव्हा स्त्रियांसंबंधी मनांत विचार येतात–मग ती पत्नी असो, अेकटी सापडलेली दुसरी स्त्री असो–हें अिंद्रिय अुद्दीपित होतं. भावना मर्यादेबाहेर जातात व पुरुषांतील राक्षस जागा होतो. स्त्रियांचीं भडक रंगाचीं व अुन्मादक चित्रं पाहून, गर्दींत स्त्रियांच्या मअूमअू शरीराचा स्पर्श झाल्यावर, स्त्रियांच्या शरीराचे अुघडे भाग पाहूनसुद्धा पुरुषाच्या जननेंद्रियाला संवेदना होतात. अेकांतांत आपल्या आवडत्या मैत्रिणीच्या सान्निध्यांत असल्यावर तर ही प्रवृत्ति अत्यंत जोरावते. यावरून असं दिसून येअील, की सर्वसामान्य मुलगा आपल्या ह्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळं मुलीकडे आकर्षिला जातो, तशी मुलगी आकर्षिली जात नाही. मुलगी अधिक संयमी असते, पण पुरुषाच्या पाशवी सामर्थ्यापुढं अबला ठरते. हा नैसर्गिक वीर्यपात सुखावह असतो म्हणूनच मुलींशीं अुत्तान व बेभान वागणूक होण्याकडे मुलांची प्रवृत्ति असते. विचारी मुलांना स्त्रियांबद्दल अभिमान, आदर असतो व स्वतःच्या नीतीची जपणूक करण्याची जाणीव असते. असे तरुण विवाहापूर्वी स्त्रीशीं वाटेल तें स्वातंत्र्य घेत नाहीत. ज्यांना आपल्या मनावर ताबा ठेवतां येत नाही, असे खलपुरुष नीतितत्त्वं गुंडाळून ठेवतात. एकट्यादुकट्या, आपल्या हातांत सापडलेल्या मुलीवर बलात्कार करतात व परिणाम भोगायला मुलींना अेकटेच सोडून आपण नामानिराळे राहातात. केवढें हें अधःपतन !

यावरून तुम्हां मुलींना पुष्कळ गोष्टी कळून येतील. तुमची आअी, वडील माणसं पुष्कळदा तुम्हांला मुलांबरोबर अेकटं फिरायला जाअूं देत नाहींत, गर्दींत जाअूं देत नाहींत. तरुण मुलाबरोबर निकटचा संबंध ठेवण्यांत किती धोका असतो हें त्यांच्या अनुभवी दृष्टीला माहीत झालेलं असतं. पण तुम्हांला मात्र त्यांचा राग येतो. आपल्या स्वातंत्र्यावर गदा घातल्यासारखं तुम्हाला वाटतं. आपल्या स्वतःच्या मुलींनी हावभावांनीं अुगाचच डोळा वाकडा करून हसण्यानं पुरुषाच्या भावना अुद्दीपित होतील, आपल्या वेषभूषेनं आपल्या शरिराकडे न्याहाळून पाहाण्याची प्रवृत्ति पुरुषांना होअील असं कोणतं-हि कृत्य करण्यांत आपण किती मोठा धोका पत्करीत असतों याची तुमच्या अल्लड

मनाला कल्पना नसते. म्हणून तरुण मुलांशीं कोणत्याहि प्रकारची शारीरिक सलगी करणं धोक्याचं असतं.

मुलालाहि हेंच सांगतां येअील, की जर ध्येय बाळगायचं असेल, तर मुलींबरोबर कोणत्याहि प्रकारची लगट करणं हितावह नाही. ब्रह्मचर्याचं कठोर पालन केलं तर त्यांना आपल्या शक्ति, आपल्या गुणांचा विकास व शिक्षण यांच्याकडे लावतां येतात व भावी जीवन सुखाचं जातं.

अुत्तम चारित्र्य बनविण्याची संधि विद्यार्थी-जीवनांतील या कालांतच मिळते. आपल्या भारतीय संस्कृतीला शीलाचं मोल संपत्तीपेक्षा अधिक आहे.

"शीलं परं भूषणम्। सर्वं शीलवता जितम्। शीलं सर्वं वै धनम्।" अशीं सुभाषितं आपण पाठ करतों, पण अमलांत आणीत नाही. शीलाच्या नांवाचा नुसता जप करून चालणार नाही, तें अंगीं बाणलं पाहिजे.

भारतीयांची आश्रमसंस्था ही आपल्या पूर्वजांची भारतीय समाजरचनेला अेक अमोल देणगी आहे. त्यांची माहिती प्रत्येक मुलामुलीनं करून घेअून आजच्या समाजरचनेंत ती कशी आचारांत आणतां येअील याचा थोडा तरी विचार करणं जरूर आहे. ब्रह्मचर्याश्रमावर पुढील सर्व म्हणजे तीन आश्रमांची अुभारणी झालेली आहे. विद्यार्थी-दशा हेंच ब्रह्मचर्याश्रमाचं महत्त्व. या दशेंत इतर प्रौढ विषयांना स्थान असतां कामा नये. या बाबतींत संजीवनी विद्या प्राप्त करून घेण्यासाठी कचानं स्वीकारलेलं व कडक अुपासना केलेलं विद्यार्थीजीवन नजरेसमोर आदर्श म्हणून ठेवतां येण्यासारखं आहे. ध्येयसिद्धीकडे नजर ठेवून त्यानं देवयानीच्या प्रेमाचाहि धिक्कार करण्यास कमी केलं नाही. आता तुम्ही मधेच प्रश्न कराल, की देवयानीच्या दिव्य प्रेमाचा धिक्कार करण्यांत कचानं स्त्रीजातीचा अपमान केला आहे! नाही – मुळीच नाही! देवयानीनं तरी कचाच्या विद्यार्जनाच्या तपश्चर्येंत लुडबूड कां करावी? त्याचा तपोभंग कां करावा? विद्यार्थीदशेंत स्त्रियांच्या नादीं लागूं नये, कामुक विषयांचा मनांत प्रवेश होअूं देअूं नये, मनाची शांति ढळूं देअूं नये,– हेंच कचाच्या चारित्र्याचं मर्म आहे. ब्रह्मचर्याश्रमांतच ब्रह्मचर्य कठोरतेनं पाळावं म्हणजे मनाच्या सर्व शक्ति अेकत्रित होअून माणसांत तेज निर्माण करतात. अर्थात् हा मार्ग कठीण आहे. पण सवयीनं त्याचं परिपालन करतां येतं. यासाठी मुलांनी कांही नियम सक्तीनं अगर सवयीनं पाळले पाहिजेत.

प्रथम पंचपंच अुषःकालीं म्हणजे पहाटेस अुठण्याची सवय करावी. सकाळीं लवकर अुठायचं म्हटलं म्हणजे लवकर झोपलं पाहिजे आणि लवकर झोपावं म्हटलं तर सिनेमा-नाटकाचे शेवटले ‘ शो ’ टाळले पाहिजेत. जागरणं थांबविलीं पाहिजेत. दिवसां अंगांतून घाम निघेल अितपत व्यायाम करावयास हवा, म्हणजे रात्रीं शांत झोप मिळणार. पण ती मिळाली म्हणून अगदी मखमली मअू गादी वापरण्याची सवय नसावी. पांघरूणहि थोडंसं हलकं असावं. शरीराला सुखापेक्षा श्रमांची सवय लावावी.

आता आहारांतसुद्धा सात्विकपणा असावा. विद्यार्थ्यांत चहा-चिवड्याचा अतिरेक आढळतो, तो टाळण्याची शिकस्त करावी. सिगरेटचं व्यसन या वयांत टाळलं पाहिजे. फिरायचं—हिंडायचं असेल तें आपल्या बरोबरीच्या मुलांत — मुलींत नव्हे — हिंडण्याची सवय ठेवावी. अेकटं अेकटं फिरू नये. रिकाम्या मनांत सैतान घर करतो म्हणतात. — आणि रात्रीं झोपतांना तर पोरीसोरींचे विचार मनांत आणतां कामा नये. त्याअैवजी झोपीं जाण्यापूर्वी प्रार्थना म्हणण्याची प्रथा ठेवावी. रोज सकाळीं गार पाण्यानं व संध्याकाळीं कमरेपर्यंत गार पाण्यानं स्नान करण्याची सवय ठेवावी. अशा कांही नियमित जीवनामुळं मनाला अेक प्रकारची शक्ति व शांति मिळते — अभ्यासाला मदत होते. ब्रह्मचर्याश्रमांतील कर्तव्य पार पाडण्यास आत्मिक बल मिळतं.

किशोरी, मुलांचीं हीं नैसर्गिक गुपितं जर तुम्हां मुलींच्या नजरेंत आणून दिलीं नाहीत तर नकळत तुमचा पाय अग्नीवर पडण्याचा संभव असतो. आणि मग नकळत जरी अग्नीवर पाय पडला तरी तो पोळल्यावांचून कसा राहील ? पोळतात, भाजतात ते मुलींचेच नाजूक पाय. म्हणून तुम्ही मुलींनी अधिक काळजीपूर्वक समाजांत वागलं पाहिजे. कारण मुलींनो, निसर्ग तुमच्या बाजूचा नाही !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३२६५३ वि:
क्रमांक २३ नों. दि.

प्रकरण ५ वें

धोक्याचा कंदील

"आई, ए आई, आई ग ऽऽ!"

"काय झालं ग असं आरवायला?"

"ही माई बघ ना काय बोलते!"

"काय बोलते?"

"क्षिति माझा नवरा आहे म्हणे—मी तिच्या प्रेमांत पडलें आहें!"

"ही काय भलतीच थट्टा माई?"

"आई, मुली—मुली अशा प्रेमांत पडतात का ग नवरा-बायकोसारख्या?"

मला वाटलंच, किशोरी, असा प्रश्न तूं केव्हातरी करशील! याबद्दल मी केव्हातरी सांगणारच होतें. हो, मुलगी मुलीच्या प्रेमांत सापडते. तसं पाहिलं तर आपण सर्वांवरच प्रेम करतों. घरांतल्या माणसांवर करतों, वस्तूंवर करतों, शेजाऱ्यांवर करतों व 'शत्रूवरहि प्रेम करा.' असं खरा धर्म सांगतो. प्रेम म्हणजे जीवन, प्रेम म्हणजेच परमेश्वराचं रूप हें सारं खरं आहे. प्रेमावांचून जग शून्याकार होईल; मग दुसऱ्या मुलीवर प्रेम केलं तर तें चूक कसं होईल असा तुला प्रश्न पडेल.

असं पाहा, मुलींच्या वाढीचा नैसर्गिक क्रम कोणता? बाल्य संपण्याच्या व वयांत येण्याच्या सुरवातीच्या कालांत मुली मुलांपासून दूरदूर राहण्याचा प्रयत्न करतात. मुलांबद्दल त्यांना एक प्रकारची बेपर्वाई वाटते. मुलगेहि या कालांत मुलींची मैत्री

टाळतात. तशी मैत्री त्यांना आवडत नाही. आपलं वर्तन बेपर्वाअीचं असलं तरी मुलांनी आपल्या मागंमागं यावं अशी विचित्र अिच्छा मुलींत अुत्पन्न होते. याच सुमारास मुलांमुलींच्या शरीरांत — जननेंद्रियांच्या बाबतींत झपाट्यानं जेव्हा फरक घडून येत असतो त्या वेळीं असा कल आढळतो. मुलगी वयांत येण्याच्या काळांत भित्री बनते, कारणावांचून ती मुलांत मिसळत नाही. दादाचे मित्र घरीं आले की दाराआडून अुत्तर देते. रस्त्यांतून फिरतांना, समाजांत मिसळतांना आपल्याकडे सगळ्यांचे डोळे लागले आहेत असं तिला वाटतं. ती लज्जाशील व भीरु बनते. अिथून तिथं जातांना तिला बरोबर कुणीतरी हवंसं वाटतं. अशाहि स्थितींत तिला कुणीतरी जोडीदार हवाहवासा वाटतो, पण तो मुलगा तर नको असतो. मग ती मुलीलाच आपला जोडीदार बनविते. आपल्या प्रेमाचा वर्षाव ती जोडीदार मुलीवरच करते. जोडी-जोडीनं फिरत असलेल्या मुली याच वयांत अधिक दिसतात. शाळेंत जातांना, फिरतांना अेकमेकींच्या खांद्यावर हात टाकून भर रस्त्यांत चालणाऱ्या मुलींच्या घोळक्यांत अशा मुली नेमक्या सापडतात. त्यांच्या मैत्रीचा अुच्छृंखळ प्रकार जाणत्या मुलींना जरा आचरटपणाचा वाटतो. त्याचप्रमाणं दुसऱ्याच्या स्पर्शाचा विलक्षण मोह होतो. ही ओढ मैत्रिणीलाच मिठी मारून वा तिचे मुके घेअून कांही मुली भागवतात. किंवा कुतूहलानं वा कुसंगतीमुळं ह्या संवेदनाक्षम अिंद्रियांना अुद्दीपित करण्याच्या कृत्रिम मार्गांचा अवलंब करतात. ह्याला हस्तमैथुन म्हणतात. फार वाअीट व घाणेरडी आहे ही सवय. या सवयीमुळं आपल्याला मिळालेल्या निसर्गाच्या अुदात्त व भव्य देणगीचा आपण अनादर करतों, अुपहास करतों व दुरुपयोगहि करतों.

कांही कालानं हा कल कमीकमी होत जातो. अशी सवय कांही थोड्या काला-पुरतीच मर्यादित असते. तेवढ्या कालांत सावधगिरी बाळगायला हवी. पावसाळ्यांत निसरडी जमीन टाळून आपण आपला मार्ग शोधीत जातों, त्याप्रमाणंच या कालांत मुलींनी स्वतःला सावरलं पाहिजे. मुलगी अेकदा तारुण्यांत प्रवेश करूं लागली की तिला मग तरुण मुलांच्या सहवासाची ओढ लागते. अेकीकडे अशी ओढ असतांनाहि मुलीला तिच्या जिवलग मैत्रिणी असतातच. संक्रमणाच्या या कालांत ती आपल्या वयाच्या मैत्रिणींशीं मैत्री चालूच ठेवते. तिच्या सामाजिक जीवनाचं वर्तुळ आता मोठंमोठं होत जातं.

किशोरी ! मुलं काय अगर मुली काय, वयांत आलीं म्हणजे कांही सर्व संपलं नाही. अुलट कांहीतरी नवीन, रोमांचकारी आपण अनुभवतों आहों असं त्यांना वाटत असतं

कांही महिन्यांपूर्वी जें सामर्थ्य तुला अपरिचित होतं त्याची प्राप्ति तुला झाली आहे याबद्दल तुला अभिमानहि वाटेल. आपल्यांत कांहीतरी नवीन बदल झाला आहे, नवीन सामर्थ्य आलं आहे, नवा अुत्साह वाटत आहे, याची तुम्हां मुलींना जाणीव होते. आपली अुंची वाढली आहे, शरीराची आकृति आकर्षक दिसत आहे, शरीर कांहीतरी नवीन आकार घेत आहे, असं तुम्हांला वाटतं. घरीं, रस्त्यावरच्या दुकानांत, पैशांच्य पाकिटांत, पाण्यांत जिथंजिथं म्हणून प्रतिबिंब दिसण्याची शक्यता असेल अशा ठिकाणीं आपल्या गोंडस चेहेऱ्याचं प्रतिबिंब पाहिल्याखेरीज तुम्हांला चैन पडत नाही. शरीराच्या या बदलाबरोबरच तुमचे कल, तुमच्या आवडीनिवडी, तुमचे विकार यांना आता कांहीतरी नवीन वळण लागण्याचा हा काळ आहे. त्याचा तुम्ही चांगला अुपयोग करून घेतला पाहिजे.

आपलं शरीर अनेक शक्तींमुळं बलवान होतं. पवित्र मन, चांगल्या सवयी, ज्ञान, अनुभव व सुदृढता यांमुळं शरीर बलवान होतं. पण अशी शक्ति जेव्हा विपुल प्रमाणांत शरीरांत साठविलेली असते तेव्हा तें माणूस अत्यंत अुत्साहानं जीवनांतील बऱ्यावाअीट प्रसंगांना तोंड देअूं शकतं. ती शक्ति शरीरांतील स्नायूंचे तंतु निरोगी अवस्थेंत ठेवूं शकते. विजेच्या मुख्य प्रवाहावर ज्याप्रमाणं विजेचीं कोणतींहि अुपकरणं सुरू करतां येतात, त्याचप्रमाणं शरीरांतील सर्व अिंद्रियांचं सामर्थ्य स्नायूंतील राखीव शक्तींवर अवलंबून असतं. जेव्हा जेव्हा कांही कारणामुळं ही शक्ति कमी होते तेव्हा सर्व शरीरावर त्याचा विपरीत परिणाम होतो. असं दुर्बल माणूस रोगाच्या आहारीं चटकन् जातं. सर्दी-पडसं होण्याकडे त्याची अधिक प्रवृत्ति होते व तेज नष्ट होतं. म्हणून विकृत सवयींना पोषक अशा कांही गोष्टी टाळायला पाहिजेत. ज्यांत लैंगिक गोष्टींचं चटकदार वर्णन केलं आहे अशा पुस्तकांचं वाचन, ज्या संभाषणापासून वैषयिक वासना बळावतील असं संभाषण, असे चित्रपट, अशीं दिवास्वप्नं टाळलीं पाहिजेत. अनिष्ट अशा कामप्रेरक विषयांकडे विचार वळले की जननेंद्रियावर ताण पडतो. म्हणूनच तुमच्या वयांतील मुलींनी विद्या, कला यांतच रमण्याचा प्रयत्न करावा. वाअीट विचारांना मनाच्या दारांत मनाअी करावी. वैवाहिक जीवनाबद्दल पावित्र्य व आदर बाळगावा. शुद्धाचरणाचे कांही नियम पाळावे. अेकटंअेकटं बसूं नये. बोलणं-चालणं, बसणं-अुठणं नि झोपणं या गोष्टी चार माणसांत करण्याचा नियम कटाक्षानं पाळावा. दारं बंद करून बसूं नये. चांगलं वाङ्मय वाचावं. आपल्या खोलींत चांगलीं चित्रं लावावीं. भडकपणा व्यक्त करणारीं बीभत्स चित्रं नजरेसमोरहि आणूं नयेत. ज्यांचं

जीवन समाजाला आदर्शभूत झालं आहे अशा थोर व्यक्तींचीं चित्रं लावावींत. खट्याळ मनाला बंधनांत ठेवण्याचे हे कांही अुपाय आहेत. जीवनाला खरी सफलता आणायची असेल तर मनालाच चांगल्या गोष्टींना जुंपलं पाहिजे. चांगले चरित्र-ग्रंथ या काळांत तुम्हांला दीपस्तंभांप्रमाणं होतील.

मग मनाला दुसरा व्यवसाय कोणता? हो, आहे. या वयांत स्वतःपेक्षा अितरांबद्दल अधिक विचार करावा. अितरांना मदत करण्यासाठी सदैव तयार असणं, घरीं वडील माणसांची सेवा करणं, शाळेंत खालच्या वर्गांतील मुलींना त्यांच्या अभ्यासांत मदत करणं, हें मुलींचं कर्तव्यच झालं पाहिजे. आपले आअीवडील, बहीण-भावंडं, मैत्रिणी यांच्या मेळाव्यांत शक्यतों राहावं. अेकांतांत राहण्याचं व घाणेरडी पुस्तकं वाचण्याचं टाळावं. तुमच्या वयांतील मुली हळूहळू आपल्याच कौटुंबिक सुखाचा ध्यास न घेतां घराबाहेरील व्यक्तींत मिसळण्याच्या व त्यांच्या सुखदुःखांशीं समरस होण्याच्या मार्गावर असतात. मैत्री व भलेपणा कसा वाढवावा याचं कसब त्या जाणूं लागतात. दुसऱ्याला साहाय्य करायची कृति ह्या काळांतच बळावते व मुली स्वतःच्या सुखसोयींविषयी बेफिकीर राहतात. मैत्री वाढवितांनासुद्धा विचारपूर्वक वागलं पाहिजे. अुच्च ध्येयानं प्रेरित असलेल्या मुलीची मैत्रीण म्हणून निवड करावयास पाहिजे. कारण अशा मैत्रिणीच्या संगतींत तिला आपला व्यक्तिविकास करण्याची ओढ लागेल व आपल्या ध्येयसिद्धीचा मार्ग शोधण्याकडेच तिचा वेळ जाअील. वाअीट विचारांना थारा मिळणार नाही. आपल्या देशांत साक्षरतेच्या क्षेत्रांत काम करायला तुम्हां मुलींना केवढा तरी वाव आहे! शिवाय शालेय अभ्यासक्रमाखेरीज गायनवादनादि कला, कलाकुसरीचीं कामं, शिवण-टिपण, अेखाद्या भारतीय भाषेचा अभ्यास यांकडे मुलींनी आपलं मन गुंतवलं की धोक्याचा हा काल सरून जाअील.

वयांत आलेल्या व येणाऱ्या मुलींनी आळसाचं अेक टोक व अतिशय मेहनत करण्याचं दुसरं टोक यांचा समन्वय केला पाहिजे. दोन्हींचा अतिरेक वाअीटच. त्यांतल्या त्यांत वेळ फुकट घालविण्यापेक्षा अधिक अुद्योग केलेला पतकरला. अिंग्रजी भाषेंत अेक म्हण आहे, की रिकाम्या मनांतच सैतान आपलं घर करतो. या कुमारी-अवस्थेंत मुलगी शरीराच्या व मनाच्या प्राथमिक अवस्थेंत असते. म्हणून ह्या दोन्हींचा अुत्कर्ष साधायला सुरवात करणं ह्या वयांतच शक्य असतं. भावी सुखी जीवनासाठी

शरीराची सेवा करण्याचं हेंच वय असतं. बऱ्यावाअीट सवयी याच वयांत घर करतात. साधा आहार, नियमित व्यायाम, स्वच्छतेची राहणी व विश्रांति या चार खांबांवर निरोगी शरीराची अिमारत अुभारलेली असते. ह्या वयांत अुत्पन्न होणारा जो नवा अुत्साह त्याची अुधळपट्टी न करतां तो भावी जीवनासाठी—शरीराला सुदृढ व सामर्थ्यवान करणं यासाठी असतो. असं जरी असलं तरी तिला आपला सर्वच वेळ कांही अभ्यास व काम यांत घालवितां येणार नाही. म्हणून तिनं आपला फुरसतीचा वेळ वर सांगितलेल्या कलांच्या सेवेंत व सात्त्विक करमणुकींत घालवावा हेंच वरं. शरीरिक व्यायाम घेतल्यास शांत झोप मिळते व शरीराला नित्य ताज्या शक्तीचा पुरवठा होतो. शांत व स्वस्थ झोप मिळणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

पण शारीरिक व्यायामाकडे तुम्ही मुली फार दुर्लक्ष करतां. शालेय अभ्यासक्रमांत व्यायामाचं फार महत्त्व मानलं आहे; पण तुम्ही मुली मात्र नाना प्रकारचीं खरींखोटीं कारणं दाखवून व्यायामाच्या तासाला हजर राहण्याचं टाळतां व भावी जीवनक्रमाला नालायक ठरतां. नाजूकपणा हें तुम्हांला सौंदर्याचं वैभव वाटतं, पण मग तरुणपणांतच तुम्ही वृद्ध दिसूं लागतां. अकालीं पिकलेले केस, सुटलेलं अंग, मंद दृष्टि हीं वृद्धत्वाचीं लक्षणं कांही मुलींमध्ये दिसूं लागतात.

नुसत्या शारीरिक व्यायामानंच व्यक्तित्वाची वाढ होत नाही. त्यावरोबर मनाचाहि विकास व्हावयास पाहिजे. नाहीतर अेखाद्या बाटलीप्रमाणं शरीर मोठं नि डोकं लहान दिसायचं. भरगच्च वाचन व सतत अभ्यास यांची मनाला सवय लागली पाहिजे. शाळेंत जाणाऱ्या मुलींना अशी सवय लागायला आपोआपच संधि मिळते; पण अुन्हाळ्याच्या व हिवाळ्याच्या मोठ्या सुट्टीचा कार्यक्रम मात्र मोठ्या कौशल्यानं आखावयास पाहिजे; नाहीतर नियमनाचीं सर्वच बंधनं विस्कळित होतील.

शरीर व मनाप्रमाणंच व्यक्तित्वाच्या वाढीला आहाराची मदत होते. ज्या अनिष्ट सवयींमुळं शरीराची हानि होते व अपेशी जीवन कंठण्याची पाळी येते त्या सवयी टाळायचं सामर्थ्य आहारामधेच असतं. खूप मसालेदार पदार्थ ज्या अन्नांत अधिक प्रमाणांत असतात त्या अन्नाचं सेवन जननेंद्रियांना अुद्दीपित करीत असतं, म्हणून मुलींनी निरोगी अन्न भरपूर खावं. आपणां हिंदूंत सर्व आहार नियंत्रित झाला आहे. आपल्या आहारांत अनेक विधिनिषेध आहेत व ते आपण अवश्य पाळले पाहिजेत. आपल्या जुन्या ग्रंथांतून आहाराची सूक्ष्म चिकित्सा केलेली आहे. लसूण-कांदा कां खाअूं

नये, तरुण अविवाहित मुलींनी मीठ कमी कां खावं, भातापेक्षा रोटीच अधिक कां खावी वगैरे अन्नपदार्थांचे गुणधर्म व त्यांचं सूक्ष्म विवेचन जुन्या आहारपद्धतींत केलेलं आढळतं. अर्थात् आपण तें जुनं म्हणून फाटक्या कपड्यांप्रमाणं फेकून देण्याच्या लायकीचं समजतों ही आपली चूक आहे. निषिद्ध अन्नसेवनानं दुष्ट सवयी बळावतात. आपल्यावर पडणारीं कर्तव्यं पार पाडण्यासाठी भरपूर व सात्त्विक अन्नाची गरज विशेषतः या वयांत मुलींना असते. म्हणूनच आहाराचं योग्य तें नियमन तुम्हीं करावयास पाहिजे. आंबट चिंचा, बोरं, आवळे या तुमच्या आवडीच्या खाऊचा अतिरेक प्रकृतीवर व भावी जीवनावर अनिष्ट परिमाण करतो. मानवी शरीर हें अेक मंदिर आहे व त्या मंदिराच्या पावित्र्याला आपण जपलं पाहिजे.

शारीरिक व मानसिक व्यक्तित्व वाढावं म्हणून प्रयत्न करीत असतांना आपल्या आत्मिक बाजूचीहि वाढ होणं अवश्य आहे. आपल्यांतील दुष्ट सवयींचं अुच्चाटन व्हावं म्हणून शुद्ध अंतःकरणानं अीश्वराचं साहाय्य मागणं, त्यासाठी शुद्ध अंतःकरणानं प्रार्थना करणं ही ह्या प्रश्नाची आत्मिक बाजू होय. हा त्रिकोण ज्या मुलीला साधतां येअील तिचा संसार सुखमय होअील यांत शंका नाही.

• • •

प्रकरण ६ वें

तुमचीं दिवास्वप्नं

दिवा म्हणजे दिवसा. दिवसा पडणारीं स्वप्नं तीं दिवास्वप्नं. वास्तविक स्वप्नं रात्रीं झोपेंत पडायला हवींत. पण तीं दिवसा कां पडतात, याचं आपण कारण पाहूं. कल्पनाशक्ति ही मानवाला एक अमोल देणगी निसर्गानं दिली आहे. तिच्या साहाय्यानं तो हव्या त्या भराऱ्या मारूं शकतो. आकाश, पाताळ, अष्टदिशा यांतून तो बसल्या जागीं संचार करून येऊं शकतो. अगदी दिवसांतून शेकडो वेळां ! ह्या कल्पना आपल्याला कशा करतां येतात ?

आपण ज्ञान मिळवितों तें अनेकांच्या अनुभवानं सिद्ध झालेलं असतं. अग्नीला हात लागला की चटका बसतो हें ज्ञान आपल्याला अितरांच्या अनुभवानं मिळतं. प्रत्येकाला तें नवीन मिळवावं लागत नाही. कल्पनेशिवाय मनुष्य विचार करूं शकत नाही. म्हणून बुद्धीच्या विकासाला कल्पना अत्यंत आवश्यक असते. ज्ञानेंद्रियाच्या योगानं मनुष्याला जें ज्ञान मिळतं त्याच्या प्रतिमा मेंदूवर अुमटतात व स्मरणाच्या योगानं मनाला वाटेल तेव्हा त्या प्रतिमा मनासमोर अुभ्या करतां येतात. त्या प्रतिमांतून मग कल्पना आवश्यक तेवढ्या घेअून त्यांच्या साहाय्यानं अेक नवीन प्रतिमा मनाच्या पुढं अुभी करते. हेंच कल्पनेचं कार्य ! ही बौद्धिक कल्पना झाली. अनुभवलेल्या वर्णनाप्रमाणं चित्र रेखाटणं हा बौद्धिक कल्पनेचा पहिला प्रकार. कवि, चित्रकार, कादंबरीकार, शास्त्रज्ञ, मूर्तिकार यांना ही अत्यंत आवश्यक असते. दुसरा प्रकार म्हणजे सहानुभूति, दया, प्रेम अित्यादि अुच्च भावनांचा परिपोष होणास मदत करणारी कल्पना — ती

भावनात्मक कल्पना. ही अधिक महत्त्वाची आहे. सर्व सद्गुणांचा पाया याच कल्पनेवर आधारलेला असतो; कारण दुसऱ्यांच्या सुखदुःखादि भावनांचं चित्र आपल्या मनापुढं ह्या कल्पनेमुळंच अुभं करतां येतं.

तुमचे वडील तुम्हाला ब्लाअूजसाठी कापड देतात. आणि मग तुम्हीं पाहिलेले ब्लाअूजचे सुंदर नमुने, अुत्तम शिंप्याची शिलाअी, हें सर्व तुमची स्मरणशक्ति अेकत्र करीत असते. मग तुम्ही ठरवितां, की रमण शिंप्याकडेच झोकदार, स्मार्ट ब्लाअूज शिवून घ्यायचा.

पूर्वज्ञान, अनुभव व ह्या अनुभवाची स्मृति म्हणजेच कल्पना होय. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टींच्या स्मृति अधिक तीव्र असतात आणि म्हणूनच आपल्याला आवडणाऱ्या विषयाकडे ह्या शक्तीचा योग्य अुपयोग झाला तर तें अेक आपल्या प्रगतिसाठी उत्कृष्ट साधन मिळाल्यासारखं आहे. प्रथम कल्पना येते व तींतून कृति निर्माण होते. कृतीला कल्पनाशक्तीची जर चांगली जोड नसेल तर ती कृति यशस्वी होणार नाही. जीमध्ये नवीन निर्माण करण्याची शक्ति असेल तीच कल्पना वरच्या दर्जाची समजली जाते. तिचा आपल्या आयुष्यांत पुष्कळ अुपयोग करून घेतां येतो.

कल्पनाशक्तीच्या साहाय्यानंच आपलीं आपलीं ध्येयं ठरवितां येतात. फ्लॉरेन्स नाअिटिंगेलची गोष्ट तुम्हांला माहीत आहे ना? घरांतील कुत्र्या-मांजराच्या दुःखाची तिला कल्पना असे. त्या अनुभावावरून ती आजारी माणसांची सेवा करावयास लहानपणापासून तयार झाली. त्या काळांत परिचारिकेचा धंदा करणं कमीपणाचं समजलं जाअी. आअीबापांची परवानगी मिळेना. आणि त्या काळांत शाळा तरी कुठल्या आता सारख्या? परिचारिकेच्या धंद्यावद्दल माहिती देणारीं कागदपत्रं, चिटोरीं, जें जें मिळेल तें ती गोळा करीत होती. संधि मिळतांच सरळ गेली फ्रान्सच्या कॉन्व्हेंट रुग्णालयांत. कोणाच्याहि विरोधाला तिनं जुमानलं नाही. जर्मनीला गेली. लंडनला मग तिला लष्करी रुग्णालयांत नोकरी मिळाली. शेवटीं क्रायमियांतील युद्धाच्या कर्मभूमींत तिच्या ध्येयसिद्धीचा अुच्चांक तिनं गाटला. आजचीं सुखसोयीचीं, जगभर पसरलेलीं रुग्णालयं म्हणजेच नाअिटिंगेलबाअीच्या कर्तृत्वाचीं स्मृतिचिन्हं होत! अेका लहान मुलीच्या कल्पनेच्या भरारीचा केवढा हा विजय! किशोरीवाळे, तुमच्या आजच्या पिढींतून अशीं स्त्रीरत्नं नाही का चमकायचीं ह्या भारतभूमींत? पण निराश तरी कां व्हा? काल विशाल आहे!

हें सर्व काम कल्पनाशक्तीचंच आहे. ह्या शक्तीच्या आधारानंच तुम्हांला तुमचं भावी जीवन आखतां येणार आहे. तुमच्या ध्येयधंद्याची आखणी कल्पनाशक्तीच्या साहाय्यानं करतां येअील.

शालेय जीवनांत तुमच्या कल्पनाशक्तीचा विकास होण्यास मदत करतील असे किती तरी विषय तुमच्या अभ्यासक्रमांत असतात! संगीत, चित्रकला, शिवणकला, गृहजीवन, शास्त्र हे तर तुमच्या मुलींच्या प्रांतांतील खास विषय! अितिहास, भूगोल व विज्ञान हे तुमच्या कर्तृत्वाला आव्हान देणारे विषय! यांतील अेकेक विषयाचा भावी जिवनांत अुपयोग करून घेण्याची कल्पना तुम्हीं ह्या वयांतच बाळगावी. अशा अपेक्षेनं ह्या विषयाचा प्राथमिक अभ्यास तुम्हाला करावयाचा असतो. आपल्या भावी ध्येयाची कल्पना आखून ठेवण्याचा हाच काल! पण होतं तें भलतंच! तुम्हाला कोणी विचारतं, —" काय, किशोरी, आता अेस्. अेस्. सी. नंतर काय?" तुम्ही भांबावून जातां. कारण ह्या गोष्टीचा तुम्हीं विचारच केलेला नसतो. तुम्ही मग अुत्तर ठोकून देतां— " बाबा ठरवतील तें!" हें काय अुत्तर झालं? बाबांनी ठरविलेला नवरामुलगा तुम्हाला चालत नाही; मग ध्येयं कशीं चालणार? तुम्हाला तुमच्या ध्येयांची जर पुसटहि कल्पना असेल तर तीं साकार करण्यास तुमचे बाबा खचित मदत करतील. पण कल्पनाच तयार नसतील तर? कल्पना तयार नसायला तुमचं सामान्य ज्ञान अपुरं पडतं! " माझ्याच परिस्थितींतील थायलंडमधील मुलगी काय करीत असेल? आठवी अियत्ता पास झाल्यावर अिंग्लंडमधील मुली काय करतात? जपानी मुलींचं गृहजीवन कसं असतं? अमेरिकन मुली कोणते खेळ खेळतात?" अशा प्रकारच्या प्रश्नांचं कुतूहल तुमच्यांत कमी असतं. तुमच्या वाचनाच्या आवडीचा विकास झालेला नसतो. प्रत्येक सुधारलेल्या देशांत मुलांमुलींसाठी शेकडो वर्तमानपत्रं निघतात व तीं वाचलींहि जातात. अिंग्लंड-अमेरिकेंतील शाळांपुढं चिंचा, बोरं, आवळे, पेरू अित्यादि खाद्यपदार्थांपेक्षा वर्तमानपत्रंच अधिक खपतात दुपारच्या सुट्टींत! वाचनाची खरीखुरी आवड अुत्पन्न झाल्याखेरीज अशीं दृश्यं आपल्याकडे कशीं दिसतील? वाचन नसेल तर कल्पनेचं क्षेत्र तरी कसं वाढीस लागेल? नव्या जगाशीं स्पर्धा करण्यास सरसावलेलं आपलं राष्ट्र! त्या राष्ट्रांतल्या तुम्ही मुलींनीहि अद्यावत् राहावयास शिकलं पाहिजे. नुसतं पोषाखांत नाही, तर विचारांतहि! विचारांची अद्यावतता अधिक परिणामकारक असते.

विचार व कल्पनाशक्ति ह्या जुळ्या बहिणी आहेत व त्यांची वाढ किशोरी, तुला शालेय जीवनांतच करावयास शिकलं पाहिजे शाळा म्हणजे. छापील प्रशस्तिपत्र देणाऱ्या टाकसाळी नाहीत. मनोविकास घडवून आणणारीं तीं पवित्र मंदिरं आहेत !

कल्पनाशक्तीलाहि दोन टोकं असतात. अशीं टोकं शक्य तों टाळावीं. स्मृतींनी जोडलेले अनेक अनुभवाचे कप्पे कधीकधी अितके अुत्साहदायक असतात, की माणसाला वसल्याबसल्याच व दिवसाढवळ्या—कामांत असतांहि सुखस्वप्नं अनुभवायची चटक लागते. कल्पनाशक्तीचं प्रमाण अधिक झालं की दिवास्वप्नांना सुरवात झाली.

कुमारी अवस्थेंत असतां तुम्हाला आयुष्याची मौज वाटते. मोठीं माणसं कित्येक गोष्टी करीत असतात, त्या आपण कराव्या, त्यांतील मौज अनुभवावी, असं मुलां-मुलींना वाटत असतं. पण व्यवहारांत तर या गोष्टी करतां येणं शक्य नसतं. तरी तुमचं कुठं अडतं त्यामुळं ? कल्पनाशक्ति असते ना तुमच्याजवळ ! तुम्ही गोष्टी अैकतां—अेक होता राजा. त्याला अेक सुंदर कन्या होती. चंद्रासारखं तिचं तोंड. ताऱ्यांसारखे लुकलुकणारे तिचे डोळे. चंद्रकोरीप्रमाणं हनुवटी. गुलाबासारखे गाल. चाफ्यासारखं नाक. शालू नेसली होती ती. हिऱ्यामोत्याचे दागिने घातले होते तिनं. सोनकळी तिचं नांव. सोनेरी रथांतून राजा चालला होता. बरोबर सोनकळीहि होती—

तुम्हाला वाटतं, आपण राजकन्या असतों तर ? मग तुमच्या दिवास्वप्नाला होते सुरवात. तुम्ही होतां सोनकळी. तिला मिळालेल्या भाग्याच्या तुम्ही वटेकरी होतां. शालू नेसतां, दागदागिने घालतां, राजाबरोबर रथांत हिंडतां, शिकारीला जातां. मग भेटतो अेक राजपुत्र. फार सुंदर असतो तो, शूर पण असतो ! मग— !

या सगळ्या गोष्टी तुम्ही कल्पनेच्या साहाय्यानं अनुभवीत असतां. त्यांत तुम्हाला सुख वाटतं. अशा कित्येक अैकलेल्या, वाचलेल्या कथांच्या तुम्ही नायिका बनतां. कोणाला कळत नसतं तुमच्या मनांत काय चालतं तें. कोणी टीका करूं शकत नाही. त्यामुळं तुम्हाला दिवास्वप्नं फार आवडतात. आयुष्यांतल्या तुम्हाला आवडणाऱ्या कित्येक गोष्टी तुम्ही मजेनं अनुभवतां. पैसा नको, अडका नको, फुकटची मौज !

तुमचीं दिवास्वप्नं जर तुम्हीं कोणाला सांगितलींत तर तुमचा स्वभाव त्यावरून सहज अजमावतां येतो. ज्या गोष्टी तुमच्या सदसद्विवेकबुद्धीला पटत नाहीत, त्या गोष्टी तुम्ही कल्पनेनं जर अनुभवूं लागलांत तर तिथं धोका आहे. अशीं दिवास्वप्नं तुम्हीं कोणाला अुघड सांगूं शकणार नाही. तीं सांगण्यांत तुम्हाला लाज वाटेल ! अशी जेव्हा लाज

वाटते तेव्हा तुमच्या स्वभावांत दोष आहे असं समजण्यास हरकत नाही. असे दोष कसे दूर करतां येतील याकडे तुम्हीं लक्ष पुरविलं पाहिजे. लहानपणचीं दिवास्वप्नं कधीकधी मोठेपणीं खरीं ठरतात. मग तुम्ही म्हणतां –" अगवाई खरंच ! मी डॉक्टरीण होणार अशीं लहानपणीं मला स्वप्नं पडत. – खरंच झालं तें ! " होय, दिवास्वप्नं हीं पुष्कळदा भविष्यकाळचीं द्योतक असतात. तुमचीं दिवास्वप्नं जर सोज्वल असतील तर तुमच्या स्वभावाची घडण योग्य मार्गानं होत आहे असं म्हणावयास हरकत नाही. अुलट तुमचीं दिवास्वप्नं दुसऱ्याच्या पुढं सांगायला जर तुम्ही कचरत असाल, तुम्हांला तसं सांगायला लाज वाटत असेल, तर तुमच्यांत सदसद्विचारांचं युद्ध माजलं आहे व त्यामुळं तुमच्या स्वभावाच्या घडणींत अडथळे येत आहेत असं सांगायला हरकत नाही. हे प्रश्न, हे अडथळे नाहीसे करण्याचा प्रयत्न तुम्हीं केला पाहिजे.

कधी कधी प्रत्यक्ष जें जीवन तुम्ही जगतां त्यापेक्षा हें कल्पनेचं जीवन आल्हाद-दायक असतं. सुखसमाधानाचा वांटा आयुष्यांत जेव्हा मिळेनासा होतो, आयुष्यांत ज्या वेळीं, जिथं तिथं निराशाच पदरीं येते, मनाजोगत्या गोष्टी घडत नाहीत, अशा वेळीं दिवास्वप्नांच्या साहाय्यानं माणूस – विशेषतः तुमच्या वयांतील मुलंमुली – आपल्या हरवलेल्या सुखाचा दिवास्वप्नांच्या रूपानं आस्वाद घेतात व समाधान मानतात.

ज्या वेळीं दिवास्वप्नांचं आकर्षण प्रत्यक्ष जीवनापेक्षा अधिक वाटतं, हवेंतले किल्ले बांधून सुख मिळविण्याची भावना वळावते व कष्ट करून सुख मिळविण्याची अीर्षा कमी होते, ही स्थिति धोक्याची असते. वेळच्या वेळीं अभ्यास न केल्यानं शिक्षक जेव्हा तुम्हाला रागे भरतात, तेव्हा अभ्यास करून शिक्षकांचं प्रेम कावीज करण्याचा प्रयत्न तुम्ही न करतां ' आपण शिक्षक असतों तर ? ' या कल्पनेनं तुमचीं दिवास्वप्नं सुरू होतात. शिक्षकांना बरं आपलं – अभ्यास करायला नको, निबंध लिहायला नकोत, गणितं करायला नकोत नि कविता पाठ करायला नकोत ! आपलं दोन वेळां सावकाश जेवायचं नि घंटेनंतर वर्गांत शिरायचं. युनिफॉर्मचे तेच तेच कपडे घालायला नको नि शिक्षा भोगायला नको ! छे, आपणच शिक्षक असतों तर ? नि आपल्या बाअी शेवटच्या बाकावर वर्गांत बसल्या तर ? – अशी अदलाबदल करतां येअील तर किती गंमत ! – असं तुम्हांला वाटतं. पण किशोरी, तुमच्या ह्या दिवास्वप्नांतील कल्पना – कल्पनाच असतात.

विनकष्टांनी मोठेपणा मिळवून देणारीं हीं स्वप्नं किशोरी, फार घातक असतात. लहान वयांत दिवास्वप्नं सर्वांनाच सुखदायक वाटतात व तीं तशीं थोड्या प्रमाणांत असतील तर त्यांच्यापासून धोका अुत्पन्न होत नाही. पण तीं जेव्हा तुमच्या आयुष्यांतला बराच काळ व्यापतात, कुठं तरी अेकांतांत बसून काल्पनिक सुखं भोगण्याची तुम्ही अिच्छा करतां तेव्हा मात्र तीं धोक्याचीं ठरतात हें निश्चित. आपल्याला हव्या असणाऱ्या गोष्टी मिळविण्यासाठी आपल्याला जे कष्ट, जो त्याग करावा लागतो, त्याचा सात्त्विक आनंद अशा दिवास्वप्नांतील क्षणिक आनंदाची अंशतःहि बरोबरी करूं शकणार नाही हें विसरतां कामा नये. शिवाय अशा स्वप्नांत पकडल्या गेलांत की जें हसूं होतं तें थोडंच! ज्यांच्या अंगीं सामर्थ्य नाही, खाण्यापिण्यांत कुचराअी करून ज्या मुली खोटाच नाजूकपणा निर्माण करतात, अनेक घरगुती कारणांमुळं ज्या निर्बळ झालेल्या असतात, अशा मुलींमध्येच दिवास्वप्नांचं प्रमाण अधिक दिसून येतं.

किशोरी, बालकांच्या पोषणाकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. तरुणांच्या जीवनाबद्दलहि समाजांत चर्चा होअूं लागली आहे. पण तुम्हां किशोरींकडे चटोर पोरांखेरीज अद्याप कुणाचं फारसं लक्ष लागलं नाही. तरीहि तुम्ही वंशवेलीचीं रोपटीं आहांत. राष्ट्राच्या बालनागरिक आहांत. समाजाच्या घटक आहांत. शालेय जगाचं वैभव आहांत. तुमच्या आअीवडिलांच्या मंगल आकांक्षा आहांत! या सर्वांशीं तुम्ही ऋणबद्ध आहांत. दिवास्वप्नांची चटक लागावयाचीच असेल तर, तीं ऋणं कशीं फेडायचीं याचींच दिवास्वप्नं तुम्हाला पडायला हवींत! याचाच ध्यास तुम्हाला अेकदा लागला म्हणजे तुमच्या अंगच्या कर्तृत्वाला पंख फुटतील!

• • •

प्रकरण ७ वें

अवेळीं केलेलें प्रियाराधन

मागं मीं तुम्हाला सागितलंच आहे, की प्रेमानं आकर्षित झालेल्या दोन तरुण व्यक्तींमधे गोड गुपितं अुत्पन्न होतात. तीं अेकमेकांना सांकेतिक, म्हणजे खुणेच्या नांवांनी हाका मारतात. कोणाला समजूं नये म्हणून सांकेतिक भाषा बोलतात; पण अशी गुपितं ज्या अर्थीं अुघडअुघड चव्हाट्यावर करतां येत नाहीत त्या अर्थीं तीं अेकान्त शोधीत जातात. आपल्या प्रेमाचं पारडं किती जड आहे हें सांगण्याची दोघांत चढाओढ लागते. आपल्या भावी सहजीवनाबद्दल तीं बेत रचतात आणि अेकदा अेकांतांत भेटण्याची सवय जडली की प्रेमाची प्रगति झपाट्यानं व्हायला लागते— अकालीं संसार करण्याची ओढ लागते. मनाचं स्वास्थ्य नाहीसं होतं. प्रेम—प्रेम—प्रेम—बस्सं ! प्रेमाखेरीज दुसरी भाषा बोलली जात नाही. प्रेमाच्या अितर अंगांची ओळखहि बुजून जाते. आअीवडील, बहीणभावंडं, विद्याभ्यास, कलाकुसर यांवरील प्रेमाची नुसती पुसट ओळखहि राहात नाही. अेकच व्यक्ति प्रेमाचं स्थान होअून राहते—प्रेमदेवता बनते.

ह्या अविचारी प्रेमाची प्रगति झपाट्यानं होअील अशी संधि मुलांमुलींना या वयांत मिळतां कामा नये. गंभीर विचार करण्याअितका मनाचा समतोलपणा ठेवण्यास मुलींनी शिकलं पाहिजे. याच विचारांतून अेकमेकांच्या चुका, दोष, सवयी, व्यंगं, आवडीनिवडींचं पृथक्करण करण्याची संधि मिळते व अुतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग लावण्याची व नको त्या वैवाहिक बंधनांत शिरून जन्मभर पश्चात्ताप करण्याची पाळी

येत नाही. प्रेमच करायचं तर अेखाद्या कलेवर करा. कोणत्याहि व्यवसायांत यशस्वी होण्यासाठी अुत्कृष्ट कार्यप्रेम लागतं, त्याशिवाय मार्गांत येणाऱ्या अडचणींना आपण तोंड देअूं शकत नाही. कार्याला जेव्हा प्राणापेक्षा आपण अधिक किंमत देअूं तेव्हा संकटांच्या काट्यांचीं फुलं होतात.

घाअीच्या लग्नापेक्षा लांबवलेलं प्रियाराधन पत्करलं. वास्तविक नुकत्याच वयांत येणाऱ्या मुलांमुलींनी प्रेमाच्या भानगडींतच पडूं नये. वयांत आलेल्या मुलांनीहि अेखाद्या मुलीच्या प्रेमांत पडून घेण्यापूर्वी आपली विद्या संपूर्ण झाली की नाही, आपली आर्थिक बाजू समाधानकारक आहे की नाही, याचा प्रथम विचार केला पाहिजे. अेखाद्या मुलाशीं दाट मैत्री करून त्याच्याशीं वाङ्‌निश्चय करण्यापर्यंत पाळी आणण्यापूर्वी हे महत्त्वाचे प्रश्न प्रथम विचारांत घेतले पाहिजेत. कदाचित् तुमचा वाङ्‌निश्चय तुमच्याकडील माणसांना पसंत पडला नाही म्हणजे लग्न होतांच घराबाहेर पडायची पाळी येते. मग जागेच्या अभावीं कुणातरी मित्रमैत्रिणींच्या घराचा आधार शोधायचा. घराचा व्हरांडा, नाहीतर नळाजवळच्या लहान जागेंत त्यांच्या सहानुभूतीवर दिवस काढीत राहायचें. असे प्रसंग अुतावळेपणानं जीं मुलं विवाहांत पडतात त्यांच्यावर आल्यावांचून राहात नाहीत.

सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांचं आपण अनेक बाबतींत अनुकरण करतों. त्या देशांतील मुलं-मुली या बाबतींत कशीं वागतात हें पाहणें अुद्‌बोधक होअील. वयांत आल्यावर व योग्य वेळीं – अकालीं नव्हे – अेकदा आपलं प्रेमस्थान निश्चित झालं म्हणजे हीं मुलं प्रियाराधनाच्या कालांत पैसा मिळविण्याच्या मार्गाला लागतात व पैसा साठवून ठेवतात. कारण पाश्चात्य समाजांत मुलांचीं लग्नं झालीं म्हणजे तीं आअीबापांजवळ राहात नाहीत. तीं आपलं स्वतःचं घर करतात. त्या देशांत सामानासकट घरं हप्त्यानं विकत घेतां येतात. अशा घरांसाठी दर आठवड्याला थोडेथोडे पैसे द्यावे लागतात. घराची सर्व किंमत फिटली की घर पूर्णपणें स्वतःच्या मालकीचं होतं. अशा घरासाठी व अेका मुलाचं शिक्षण सुखासमाधानानं होअील अशा बेतानं बँकेंत पैसे साठविल्याखेरीज तीं मुलं लग्नाच्या फंदांत पडत नाहीत. नुसत्या प्रेमभावनेच्या आहारीं जाअून वाऱ्यावर पतंगासारखं अधांतरीं राहण्याचं अव्यवहारी स्वप्नरंजन तीं करीत नाहीत. विवाहाची मागणी नेहमीच पुरुषाकडून व्हावी लागते. मुलीच्या मनांत अेखादा मुलगा कितीहि भरला तरी त्यानं जोंपर्यंत विवाहाची मागणी घातली नाही तोंपर्यंत तिला स्वस्थ बसावं

लागतं. आपलं प्रेम ती व्यक्त करू शकत नाही. स्नेह कायम राहूनहि अशी मागणी दुरावली की समजावं, ही स्वारी आपल्या अनैतिक शरीरसुखाचीच नुसती अपेक्षा करीत आहे. अशा माणसापासून दोन हात दूर राहायचं असतं.

विवाहाचा प्रश्न भावनेच्या पहिल्याच भरांत सोडवायचा नसतो. भावनेच्या आहारीं जाअू नये म्हणून अेकत्र येण्याचे प्रसंग शक्य तेवढे टाळावे. तुम्हांला वाटतं, की आपल्या भावी जीवनाचा कार्यक्रम आपणच आखावा. हें कर किंवा हें करूं नको, असं अितरांनी सांगितलेलं तुम्हांला आवडत नाही. मुलांच्यांत मिसळूं नका, असं जेव्हा वडील माणसं तुम्हांला सांगतात तेव्हा तुम्हांला वाटतं, की तीं तुमच्यावर विश्वास ठेवीत नाहीत. पण त्यांच्या अनुभवाच्या दृष्टींतून, मुलांच्या साहचर्यामुळं तुमच्यावर येणारीं संकटं त्यांना ताडतां येतात, समाजाकडून होणाऱ्या टीकेला तुम्ही पात्र व्हाल अशी भीति त्यांना वाटत असते, म्हणूनच तीं तुम्हांला धोक्याचा अिशारा देतात. मागं मीं तुम्हांला सांगितलं आहे, की अशा साहचर्याला समाज जो नांवं ठेवतो, किंवा वडील माणसं जी धोक्याची सूचना देतात त्याला कारण अशा साहचर्यांत कांही शारीरिक संवेदना आहेत आणि त्यांच्यापुढं विवेक वितळून जातो.

प्रेमभावनेचं पहिलं स्वरूप पत्रांतून व्यक्त होत असतं. भ्याड मुलं मुलींशीं पत्रानं ओळख करतांना टोपणनांवानं पत्रं लिहितात. अशा पत्रांची सुरवात कशी होते हें सांगूं का ?—तुम्ही शाळेंत जातां–येतां, मैत्रिणींच्या घोळक्यांतून जातांना तुम्ही अेकमेकींना मोठ्यानं नांवांनी हाका मारीत असतां. स्थल-कालाप्रमाणं आवाजाला नियंत्रण कुठं घालावं हें तुम्हां अल्लड मुलींना कळत नसतं. रस्त्यांतून जातांना पावलं पण वाजवायचीं नसतात. मग तोंड कुठलं ? पण हा शिष्टाचार तुम्हांला माहीत नसतो. शिवाय बोलतांना, घरींदारीं, शाळेंत, समाजांत, रस्त्यांत व सार्वजनिक वाहनांत, गाडींत, बसमधे, ट्राममधे, आवाजाची मर्यादा काय असावी हेंहि तुमच्या लक्षांत नसतं.

अेखाद्या सभेच्या व्यासपीठावरून ध्वनिक्षेपकापुढून बोलल्यासारखं तुम्ही बोलतां. ह्या संभाषणांतून तुमचं नांवगाव, अियत्ता, शाळा, नव्हे शाळेचीं, घराचीं म्हणजे अथर्तात् सारीं गुपितं तुमच्यामागं रेंगाळत चालणाऱ्या द्वाड व भ्याड मुलांना कळतात.

अशी मुलं तुम्हांला कधीकधी तुमच्या घरापर्यंत पोचवायला येतात व तुमचं नांव-गाव, नातींगोतीं हुडकून काढतात. केव्हाकेव्हा धांदरटपणें लिहिलेले तुमच्या वहीचे

सुटे कागद, फीच्या पावत्या, वह्या, पुस्तकं तुमच्या नकळत रस्त्यांत गहाळ होतात. तीं टिपायला मागं मुलं असतातच. अशा वस्तूंवरील नांव, पत्ता, अियत्ता वगैरे तुमची भरपूर माहिती कळल्यावर शाळेच्या पत्त्यावर तुमच्या नांवाचीं प्रेमपत्रं येतात. अर्थात् तीं तुमच्या हातीं क्वचितच मिळतात; कारण तीं अधिकारी व्यक्तींच्या हातीं जात असतात. पण अेखादं पत्र तुमच्याच हातीं पडण्याची खबरदारी अेखाद्या अुनाड मुलानं घेतलीच तर मग तुम्ही क्वचित् घाबरतां व आपल्या वडील माणसांना तीं पत्रं दाखवितां. ही गोष्ट फार शहाणपणाची असते. कारण मग वडील माणसं अशा अेखाद्या रस्त्यावरच्या अुनाड मुलापासून तुमचं रक्षण करूं शकतात. याच्या अुलट, कांही मुली अशा प्रेमपत्रानं हुरळून जातात. आपल्याला सौंदर्यराशी समजणारा, आपल्यावर निरतिशय प्रेम करणारा, आपल्यासाठी प्राण देणारा अेक तरी प्रेमिक आपल्यामागं आहे याचा तिला अभिमान वाटतो. अभ्यासाकडे दुर्लक्ष करून, शाळा सोडून, दुपारच्या सुट्टींत मुलींच्या शाळांच्या आसपास असे कितीतरी प्रेमवीर गोळा होत असतात. त्यांच्यापासून सावध राहावयास पाहिजे. अेकदा का त्यांच्या आहारीं गेलांत की घरीं न सांगतां शाळेंतून बाहेर भटकणं, शाळेचं निमित्त करून घराबाहेर फिरणं, सिनेमाला जाणं वगैरे गोष्टींची चोरून सुरवात होते व अभ्यासांत मन रमायचं थांबतं. लग्नाचा अवेळीं ध्यास लागतो. असा रस्त्यांत मागं लागलेला मुलगा जरी अेकनिष्ठ राहिला व तुमच्याशीं त्याचा विवाह झाला तरी अर्धवट शिक्षण सोडल्यानं चांगल्या नोकरीधंद्याला त्याला मुकावं लागतं. तुम्हीहि प्रेमाच्या मागं लागल्यामुळं शिक्षण तसंच राहतं. आपल्या संसाराला कोणत्याहि प्रकारची आर्थिक मदत तुम्ही देअूं शकत नाही. अनर्थाच्या परंपरा वाढत जातात.

पहिल्या प्रेमाचा भर ओसरून गेल्यावर परिस्थितीचे चटके बसूं लागतात. पण वडील माणसांची, नातेवाअिकांची सहानुभूति तुम्हीं गमावलेली असते. कुणीहि तुम्हाला मदत करूं शकत नाही. मग संसार नकोसा होतो, स्वभाव चिडचिडा बनतो, मुलां-बाळांची अवहेलना होते. तुमच्या असमाधानाचा परिणाम मुलांच्या जीवनावर होतो. अशी ही अनर्थांची परंपरा पहिल्या प्रेमपत्राचा स्वीकार केल्यानं सुरू होते.

तरुण मुलगा व मुलगी बराच वेळ अेकत्र येअूं लागलीं की अिथं कांहीतरी पाणी मुरतंय असंच मोठ्या व अनुभवी माणसांना वाटूं लागतं. मग संशय व संशयांतून गांवगप्पांना वाचा फुटते. समाजाच्या निंदेला तीं पात्र होतात. आपल्या संस्कृतींत अनेक

ऋणं मानलीं आहेत. त्या ऋणांचं बंधन प्रत्येक माणसाला असतं. अशा ऋणांपैकी आपल्या कुटुंबाचं — कुलाचं म्हणून, अेक ऋण असतं. आपल्या घराण्याच्या निष्कलंक क़ीर्तीला या ऋणानं जपायचं असतं. अब्रूला काचेची अुपमा नेहमीच देतात. फुटलेली काच सांधतां येत नाही, त्याप्रमाणं गेलेली अब्रू परत मिळवितां येत नाही. तुम्ही म्हणाल, फुटलेलीं काच सांधायचीं औषधं निघालीं आहेत. होय ! पण त्या औषधाच्या डागानंच सांधकाम चटकन् ध्यानांत येतं. तरुण मुलांमुलींचं निष्कलंक चारित्र्य हेंच त्यांचं अमोल धन. त्याच्या जपणुकीवरच वैवाहिक जीवनांतील सुख अवलंबून असतं.

कांही तरुण मुली तरुण मुलांपासून दूरदूर राहतात, त्यांची फटकळ, पुरुषद्वेष्ट्या म्हणून चेष्टा होते; परंतु मुलाशीं अवेळीं नीतिबाह्य सलगी करून आपलं चारित्र्य बिघडण्यापेक्षा वरील आरोप पत्करला. कारण स्वार्थी तरुण भोळ्या मुलीशीं सलगी करून, तिला चारित्र्यहीन बनवून, तिला अर्ध्या वाटेवर सोडून जातो. परिणाम मात्र मुलीला भोगावे लागतात. कुटुंबांतून, समाजांतून बहिष्कृत होण्याची तिच्यावर पाळी येते. अब्रूरक्षणासाठी कधीकधी आत्महत्येलाहि ती मग प्रवृत्त होते.

कुमारी-अवस्थेंतील वरून गोंडस दिसणाऱ्या पण धोक्याच्या खाचखळग्यांनी भरलेल्या या मार्गांतून जातांना फार सावधगिरी बाळगावयास हवी. शालेय जीवनांत अर्धवट ज्ञानाच्या झुंजूमुंजू प्रकाशांत तर हे धोक्याचे खाचखळगे दिसतसुद्धा नाहीत. खळग्यांत कोसळल्यानंतरच त्याचं अस्तित्व जाणवतं. म्हणून विद्यार्थी-दशेंत वासनांना दारं बंद करावयास हवींत.

• • •

प्रकरण ८ वें

ग्रा. क्र. ११५१५

शीलसंपादनाचा सुवर्णकाल

तुम्ही वयांत येत असतांना तुमच्या जीवनांत नवीन अुत्साह तुम्हांला वाटतो, नाही का ? या वेळीं अनेक महत्त्वाकांक्षा तुमच्या मनांत घर करीत असतात. अनेक आशांचे मनोरे तुम्ही रचीत असतां. या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी पडेल ती मेहेनत करायची असते. ज्यांना असे श्रम करण्याचं सामर्थ्य असतं त्यांचं जीवन यशस्वी होतं. पण ही तयारी कोठे करायची म्हणून तुम्ही विचाराल तर यासाठी विद्यार्थी-दशेसारखा दुसरा सुवर्णकाल तुमच्या आयुष्यांत सापडणार नाही असंच सांगावं लागेल. भावी जीवनाच्या पूर्व-परीक्षेची तयारी विद्यार्थीदशेंतच करावयाची असते. या कालांतच आपल्या अंगच्या सर्व शक्ति विकसित करण्याची संधि तुम्हाला मिळते. आणि जे विद्यार्थी या संधीचा पुरेपूर फायदा घेतात त्यांचंच जीवन समृद्ध बनतं.

विद्यार्थीदशेचा काल म्हणजे ब्रह्मचर्याश्रमाचा काल. प्राचीन काळीं – चातुर्वर्ण्याच्या वैभवकालीं – या आश्रमाचं महत्त्व मुलांच्या विद्यार्जनांत अधिक मानलं असलं तरी आता सर्वच मुलींना मुलांप्रमाणं ज्याअर्थी विद्यार्जन करावं लागतं त्या अर्थी ब्रह्मचर्याश्रमाचे नियम मुलींनाहि लागू आहेत.

ब्रह्मचर्य म्हणजे सर्व अिंद्रियांवर ताबा असणं – ताबा ठेवायला शिकणं. या कालांत कोणत्याहि गोष्टीच्या अतिरेकाला वाव नाही. हा काल म्हणजे केवळ विद्याभ्यासाचाच काल. अितर गोष्टींचा विचार या काळांत डोकावतां कामा नये. जें जीवन साधं असतं,

भरपूर काबाडकष्ट करण्याची ज्या जीवनांत तयारी असते, शरीर व्यायामानं कणखर बनविण्याची जिथं प्रवृत्ति असते, मनाचं व शरीराचं पवित्र्य ज्या जीवनांत कटाक्षानं पाळलं जातं, तें खरं विद्यार्थीजीवन. अुत्पत्ति, स्थिति व लय हें चक्र सर्व प्राणिमात्रांना चुकत नाही. पण अुत्पत्ति व लय म्हणजे जन्म व मरण हीं आपल्या हातीं नसतात, पण स्थिति म्हणजे जगणं, आपला विकास करणं माणसाच्या हातीं असतं. माणसाचं व पशूचं जगणं सारखं नसतं. हें जगणं यशस्वी करण्यासाठी माणसाला ज्ञान मिळवायचं असतं. पुस्तकी विद्या व पोटविद्या ह्या दोन्ही विद्यांचा लाभ योग्य काळीं म्हणजे विद्यार्थीदशेंतच करून घ्यावयाचा असतो.

तुम्ही विचाराल, पुस्तकी विद्या नि पोटविद्या हें काय प्रकरण आहे ? कांही विवक्षित परीक्षा देण्यासाठी आपल्याला विवक्षित अभ्यासक्रमांतूनच जावं लागतं. अेस्. अेस्. सी. परीक्षा पास व्हायची तर अमुकअमुक पुस्तकं वाचायला हवींत. बी. अे. सारख्या पदवी परीक्षांना ठराविक अभ्यासक्रमांतून जावं लागतं. ही झाली पुस्तकी विद्या. या विद्येनं सर्वांच्या पोटाचा प्रश्न सुटतोच असं मानतां येत नाही. यासाठी चाकोरीच्या शिक्षणक्रमांतून जात असतांना प्रत्येक विद्यार्थ्याला कांही कला यावी हें सिद्ध होतं. पुस्तकी विद्या ही अेक प्रकारची आपल्या ज्ञानाची पावती आहे. ती जगाला दाखविली की व्यवहाराची वाट मोकळी होते. म्हणून पुस्तकी विद्या शिकायची. चांदीचा रुपया व चांदीची साखळी यांचे मौलिक गुण जरी सारखे असले तरी सिनेमाचं, आगगाडीचं तिकीट काढण्यासाठी सरकारी छापाचा चांदीचा रुपया आपण घेअून जातों — साखळी घेअून जात नाही. तसंच हें आहे. विद्यार्थीदशेंतल्या तयारीसाठी प्रथम तुम्हीं व्यायामानं शरीरबळ वाढविलं पाहिजे. शाळेंतले व्यायामाचे तास तुम्ही मुली पुष्कळदा चुकवीत असतां. अितर मुली करीत असलेली कवाअीत तुम्ही बाजूला बसून करमणुकीच्या दृष्टीनं पाहात असतां. पाश्चात्य देशांतील नृत्यगृहांत असा नियम आहे, की नृत्यगृहांत प्रवेश मिळण्यासाठी जे तिकिटं खरेदी करतात त्यांनी स्वतः नृत्यांत भाग घेतलाच पाहिजे. अितरांना नृत्य करतांना पाहून करमणूक करण्याचं तें स्थान नसतं. शरीर निरोगी व बळकट असलं म्हणजे अंगांत शक्ति येते व कोणत्याहि संकटांना भिण्याचं कारण रहात नाही. नेभळ्या शरीरांतच नभळं मन वस्ती करतं.

शरीराप्रमाणं बुद्धीहि तिखट ठेवली पाहिजे. बुद्धीच्या तीन शक्ति असतात — स्मरणशक्ति, धारणाशक्ति व कल्पनाशक्ति. या तीन शक्तींची देणगी सर्वांनाच मिळत

नसली तरी प्रयत्नानं त्या वाढवितां येतात. रोजच्या नियमित पाठांतरानं स्मरणशक्तीला अुजाळा देतां येतो. पण हल्ली तुम्ही विद्यार्थी पाठांतराचा कंटाळा करतां. आम्ही लहान असतांना शाळाशाळांतून भेंड्यांचे सामने ठेवीत. कवितांच्या त्या लढाया अैकण्यास व त्यांत भाग घेण्यास सर्व विद्यार्थिनी अेका पायावर तयार असत.

आपण जें जें वाचतों तें तें सर्वांनाच सारखं समजत नाही. तें समजण्याची शक्ति म्हणजेच धारणाशक्ति. ज्या मुलींना ही शक्ति देणगी म्हणून मिळालेली असते अशा मुलींशीं मैत्री करावी. अभ्यासांत तिची मदत घ्यावी. आपलीहि धारणाशक्ति क्रमाक्रमानं वाढत असल्याचं तुमच्या ध्यानीं येअील.

पण कल्पनाशक्ति मात्र ज्याची त्यालाच सहाय्य करते. त्यामुळं अेखादीच्या जीवनांत किती स्थित्यंतरं होतात याविषयी मी तुला स्वतंत्रच सांगेन.

शरीर व बुद्धि यांचं पोषण व्यायामानं व वाचनानं होण्यासारखं आहे; पण मन ? मन म्हणजेच माणूस. तें स्वच्छ, पवित्र व सुंदर राखण्यासाठी मुलींनी झटलं पाहिजे — तें वारंवार झटकलं पाहिजे. त्यावरचा मलिन विचारांचा केरकचरा झाडला पाहिजे. मन म्हणजे माणुसकीचं मंदिर ! तें पवित्र व निर्मळच राखलं पाहिजे. पण वाअीट वासनांचा राक्षस नेहमी मनाला भेडसावीत असतो. विद्यार्थी-जीवनांत वासनांमागं जाणं तर अत्यंत हानिकारक आहे. ही हानि टाळण्यासाठी विकारांना अुत्तेजित करील असं वाचन, करमणुकींचे अनिष्ट प्रकार, चित्रं, आहार हीं टाळलीं पाहिजेत. पचायला जड व अतिशय मसालेदार पदार्थ खाण्याचे टाळले पाहिजेत. खाण्याच्या वेळांत नियमितपणा असायला पाहिजे. विकारांवर ताबा ठेवण्यासाठी साधा व सात्त्विक आहार नेहमी असावा लागतो. भुकेपेक्षा थोडं कमी खाल्ल्यानं शरीर व मन शुद्ध, निरोगी व अुत्साही राहतं.

वासनांवर नियंत्रण ठेवणं म्हणजेच ब्रह्मचर्य-पालन करणं. आणि वाअीट वासनांनी मनांत प्रवेश करूं नये म्हणून कांही नियमांचं पालन केलं पाहिजे.

(१) मिताहार — म्हणजे थोडी भूक शिल्लक ठेवून खाणं. याचं महत्त्व विद्यार्थी-जीवनांत फार आहे. तुम्ही मुली वाटेल तेव्हा सटरफटर खात तोंड हालवीत असतां. (२) खाण्याच्या वेळाहि ठरलेल्या असाव्या. (३) तिखट, आंबट पदार्थांचं सेवन कमी करावं. शाळेच्या आसपास आंबट चिंचा, कैऱ्या, बोरं, आवळे व मसालेदार

पेरू वगैरे माल विकावयास जे व्यापारी बसतात त्यांचं गिऱ्हाअीक तुम्हीच असतां, नाही का ? (४) नियमित व्यायाम करून शरीराला व मनाला सतत चांगल्या कामांत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करावा. (५) लवकर झोपावं व लवकर अुठावं, हा सर्वसामान्य नियम आहे. अंथरुणावर पडल्याबरोबर झोप येणं हें भाग्य जे दिवसभर शरीराला कामांत ठेवतात त्यांनाच लाभतं. अर्धवट जागेपणीं स्वप्नं पडतात व तीं मनाला अस्थिर करतात. (६) घाणेरडे चित्रपट, नाटकं, कादंबऱ्या हीन मनोविकारांना अुत्तेजित करतात. त्यांच्यामुळं नकोत ते विचार मनांत रेंगाळतात. ते तांदळांतील खड्यांप्रमाणं झटकन् बाहेर टाकावे. कोणत्या तरी चांगल्या व्यवसायांत मन रमवावं – शीलवान् मुलींची संगत करावी. (७) पोषाखाबद्दल मला खूपच सांगायचंय तुम्हांला. पण थोडक्यांत अिषारा द्यायचा म्हणजे पोषाखांत अुत्तानता नसावी.

कांही गोष्टी दिसायला साध्या व क्षुल्लक वाटतात; पण परिणामीं अुद्वेग अुत्पन्न करतात. मुलींमुलींनी आपापसांत अेकमेकांना मिठ्या मारणं, मानेभोंवती व खांद्यावर हात टाकून फिरणं, मांडीवर डोकं ठेवून निजणं, हे प्रकार टाळावे. अशा वागणुकींत आपली हीन अभिरुचि व शिष्टाचाराचा अभाव मात्र दिसून येतो.

• • •

प्रकरण ९ वें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

तुमचं शील

मुली नेहमीच भावनावश असतात. अेखादी गोष्ट त्यांच्या मनाला बोचत राहते.

भावना प्रत्येकाला असतात, पण प्रत्येकाच्या भावना वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. भावनांना अुद्दीपित करणारी परिस्थिति, काळ व प्रसंग हे व्यक्तीव्यक्तीच्या बाबतींत सारखे नसतात. भावना म्हणजे काय, हें अेखादी व्याख्या देअून स्पष्ट करतां यायचं नाही. ज्यांच्या त्यांनीच त्या अनुभविल्या पाहिजेत. तुम्ही आनंदी असलां, आशावादी असलां, की हवं तें काम तडीस नेण्याचं सामर्थ्य तुमच्यांत येतं. अुलट, निराशावादी, दुर्मुखलेल्या, निरुत्साही माणसाला सारींच कामं अशक्य वाटतात.

मुली वयांत येतांना त्यांच्या भावना फार तीव्र स्वरूपाच्या असतात; पण त्या कुठून कशा अुद्भवतात हें कळत नाही. त्या जशा अेखाद्या अुन्नत प्रसंगानं अुचंबळतात तशाच विरूनहि जातात. पाहा, तुमची कुणीं स्तुति केली की तुम्ही हुरळून जातां, तुम्हाला आनंद होतो. निंदा केली की मन खट्टू होतं. ही खेदाची भावना आपल्या अितर गोष्टींवर परिणाम करते. मग तुम्ही दुसऱ्यावर नाहक रोष करतां, आदळआपट करतां, सोपविलेलीं कामं वेळींच करीत नाही. वडील माणसांनी, मित्र मैत्रिणींनी सुचविलेल्या गोष्टींचा तुम्ही विपर्यास करतां, त्यांना दुरुत्तरं देतां. कारण तुमच्या भावना समुद्राप्रमाणं अुफाळलेल्या असतात. पण तेंच मन जेव्हा सरोवरासारखं शांत व स्थिर असतं तेव्हा मात्र तुम्हाला हास्यविनोद सुचतो, कामं करण्याला अुत्साह वाटतो, नाचा-अुडावंसं वाटतं.

तुम्ही वयांत यायच्या काळांतच भावना अेवढ्या तीव्र कां असतात? व जसजशा तुम्ही मोठ्या होतां तसतशा भावना आटोक्यांत आणतां येतात, असं कां होतं? आपल्या शरिरांतील स्नायुशक्तीचा भावनांशीं संबंध असतो. जेव्हा ही शक्ति विपुल असते तेव्हा आपण अुत्साही, आनंदी असतों. कोणतंहि कार्य धडाडीनं पार पाडण्याचं सामर्थ्य आपल्यांत असतं. पण या शक्तीचा साठा संपुष्टांत आला की आपण हताश, निरुत्साही, चिरचिरे बनतों. आजारी माणसांत हा साठा कमी असतो म्हणून असा माणूस अुदास, चिडखोर, निराश व थकलेला दिसतो. त्याच्या हातून कोणतंहि कार्य होअू शकत नाही. वयांत येण्याच्या तयारीसाठी हा साठा कुमारी-अवस्थेंत भरपूर असावा लागतो. जीवनांत कितीतरी आकर्षणं आहेत. सौंदर्य तर सर्वत्र भरलेलं आहे. तें हुडकायचं असतं, त्याचा आनंद अुपभोगायचा असतो व अितरांना द्यायचा असतो. यासाठी या शक्तीचा व्यय तुम्हाला करावा लागतो. आणि असं शक्तिधन जर तुमच्यापाशी असेल तरच त्याचा व्यय करणं शक्य असतं.

अेखाद्या रात्रीं जागरण झालं तर दुसऱ्या दिवशीं मलूल व थकलेलं वाटतं. सहलीला तुम्ही गेलांत की दुसऱ्या दिवशीं तुम्ही सुट्टीची अपेक्षा करतां, कारण तुम्हाला थकवा आलेला असतो. अभ्यास करण्याअितका अुत्साह मनाला राहात नाही. याचं कारण तुमच्या स्नायुशक्तीचा व्यय झालेला असतो. विजेरी संपत आली की तिच्यांतला प्रकाश अंधुक होतो, तसंच शरीरांतील शक्तीच्या विजेरीचं आहे.

भावना भडकण्याचं दुसरं कारण म्हणजे तुमच्यांत आता वाढत्या माणसाचे गुणधर्म निर्माण होत असतात. आपण आता मोठे झालों हें तुम्हाला प्रस्थापित करायचं असतं. अितर मोठीं माणसं आपल्याशीं कशीं वागतील याचंहि तुम्हांला कोडं पडतं. मनाविरुद्ध कोणताहि प्रसंग आला की तुम्हांला राग येतो. कामापेक्षा खेळाकडे तुमची प्रवृत्ति दिसल्यावर वडील माणसं तुम्हांला साहजिकच सांगणार की – बाअी ग घरांत अेवढा कामाचा डोंगर पडला असतां बाहेर भटकायला कशी जातेस? – घरांत राहा. पण हें सांगणं तुम्हांला रुचत नाही व पटतहि नाही. कामाचं निमित्त सांगून आपल्याला आअी बाहेर जाअू देत नाही याबद्दल आअीचा तुम्हाला संताप येतो व वडील माणसांच्या प्रत्येक कृतीचा तुम्ही विपर्यास करतां. तुम्ही जसजशा मोठ्या वाढत जाल तसतसं दुसऱ्याशीं कसं वागावं याची तुम्हांला सवय जडेल.

भावना ही फार मोठी शक्ति आहे. भावना संक्रामक असतात. अेकीच्या डोळ्यांत पाणी दिसलं की दुसऱ्या रडूं लागतात; अेकजण हसली की साऱ्या हसायला लागतात.

सभेंत, नाटकगृहांत अेकानं टाळी पिटली की मग टाळ्यांचा गजर होतो. आपल्या उज्ज्वलतेनं भावना अितरांना प्रकाश देतात. अशा भावनांचं संरक्षण करावयास हवं. भावनांची क्रीडा मोठी गमतीची असते. कांही दिवस अुगाचच कारण नसतां अुदासीन, निरुत्साही वाटतं. हें असं कां होतं तें तुम्हांला कळत नाही. मनाची अशी स्थिति दाखवणारी दिनचर्या तुम्ही लिहीत जा. तुम्हाला तीवरून असं आढळून येअील, की अशा मनःस्थितीचा चढअुतार नियमित वेळींच होत असतो. दर तीनचार अगर पांच आठवड्यांनी भावनांचा चढअतार होत असतो असं तुम्हांला दिसून येअील, अितकं हें वर्तुळ अेकसाच्याचं आहे.

स्त्रियांत व मोठ्या मुलींत हें भावनाचक्र त्यांच्या लैंगिक विकासाबरोबर फिरत असतं. मासिक पाळीच्या वेळीं दर चार किंवा पांच आठवड्यांनी मुलींत निरुत्साही वृत्ति जागृत होते. अशा वेळीं अितरांनी तिच्या ह्या कृत्यांकडे दोषदृष्टीनं पाहायचं नसतं. कारण या ठराविक कालानंतर तिचा मूळ स्वभावधर्म आपोआपच जागृत होतो. मुलांमधे व पुरुषांमधेहि असे फरक दृष्टीस पडतात; पण ते स्त्रियांच्या मासिक पाळीच्या नियमित कालाप्रमाणं बदलत नाहीत.

भावनाचक्राचा चढअुतार आपल्या स्नायुशक्तीच्या साठ्यावर अवलंबून असतो. भावनेच्या या नैसर्गिक चढअुताराला भिण्याचं कांही कारण नसतं; मात्र त्याचं नियोजन विचारपूर्वक व्हायला पाहिजे. अुद्याच्या कामाचं नियोजन आजच व्हायला पाहिजे. निराशेला वर तोंड काढूं देण्याची संधि देतां कामा नये. भावनेवर असा वेळोवेळीं जय मिळविलांत की मनाचा समतोलपणा आपोआप सिद्ध होअील.

शरीराच्या व मनाच्या वाढीची वेळ म्हणजे हीच तुमची कुमारी-अवस्था असते. फार जपावं लागतं मनाला या काळांत. जें मन शुद्ध ठेवलं जातं तें निर्भय असतं. आपल्या संकटाच्या वेळीं तें आपल्याला खरा मार्ग सुचवितं. महात्मा गांधी त्याला 'आंतला आवाज' म्हणत. कालिदास कवि त्याला 'प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः' म्हणे. मनाची खरी प्रवृत्ति समजायला अेकांताची जरुरी असते. तिथंच मनांतला परमेश्वर जागा होतो व आपल्याला योग्य मार्गदर्शन करतो. 'अचपळ मन माझें नावरे आवरीतां' असं श्रीसमर्थ म्हणतात. अेखाद्या गोष्टीची सवय करायची असली म्हणजे प्रथम बळजोरी करावी लागते. पहाटे अुठायची सवय करण्यासाठी तुम्ही गजर लावतां. सुरवातीला हें जड जातं, तरी कांही दिवसांनी तुमचा डोळा पहाटेला आपोआप अुघडतो. लवकर अुठण्याची सवय लागते, सवयीचा स्वभाव बनतो.

तुम्ही वयांत येतां त्या काळांत शरीरावरोबरच नव्हे तर शरीरापेक्षाहि मनाची अधिक काळजी घ्यावयास पाहिजे. बळकट स्नायूंपेक्षा बळकट मनाचं महत्त्व अधिक असतं. मनाचं योग्य पोषण आपण स्वतः अंतःस्फूर्तीनं केलं पाहिजे. माराच्या, शिक्षेच्या भीतीनं मन दाबून ठेवणं योग्य नाही. तें मोकळं सुटून अधिकच धुमाकूळ माजवील. मनाच्या पोषणासाठी त्याचं चांगल्याचांगल्या गोष्टींविषयी प्रेम निर्माण करणं चांगलं. वाचन, चांगले मित्र, चांगले विचार, चांगल्या सवयी, अशा सर्व गोष्टींच्या साहचर्यांत त्याला ठेवलं म्हणजे मनाला शिस्त लागेल. शिस्तींत सामर्थ्य असतं. या शिस्तींतून शील बनतं – चांगलं शील !

आयुष्य हेंसुद्धा नियमबद्ध असावं लागतं. थोडींबहुत बंधनं – मग तीं घरांतलीं असोत की समाजाचीं असोत – बंधनं पाळल्यावांचून आयुष्य यशस्वी होणंच शक्य नाही. स्वतःला नियम पाळण्याची शिस्त लावली म्हणजे कोणत्याहि प्रसंगाला तोंड देण्याचं सामर्थ्य आपोआप निर्माण होतं. आपलं जीवन प्रभावी व यशस्वी व्हावं अशी जर अिच्छा असेल तर प्रामाणिकपणा, आचारविचारांतील शुचिता, मधुर वाणी, विनम्र भाव व आनंदी वृत्ति हीं अंगीं बाणवलीं पाहिजेत. पण नेमक्या तुमच्या वयाच्या मुली – सदा गंभीर चेहऱ्यानं वावरत असतात ! जसं कांही साऱ्या जगाचा भार आजच तुमच्यावर पडला आहे ! किशोरी, तुमची अवस्था म्हणजे विकसित पुष्पांची अवस्था. वारा येवो, अून पडो, पावसाचा वर्षाव होवो – सदा आनंदांत डोलत राहणारीं तीं फुलं ! भविष्याच्या चिंताभारानं तीं मलूल होत नाहीत ! तुमचंहि जीवन तसंच असायला पाहिजे, किशोरी !

आचारविचारांचं पावित्र्य असलं तर सारं जीवन कसं अुजळून निघतं ! अितरांनाहि तें दिपवून टाकतं. असं जीवन जगण्यासाठी दुसऱ्यांची निंदा अैकण्यास कान नाखूष असायला पाहिजेत; कोणतंहि अमंगळ भाषण करण्यास ओठांनी विरोध केला पाहिजे; तरच तुम्हां मुलींना आयुष्यांत अुच्च ध्येय गाठतां येअील.

यालाच आपण चारित्र्य म्हणतों. हिंदी संस्कृतींत स्त्रियांच्या चारित्र्यावर फारफार भर दिला आहे. ती परंपरा तुम्हीं मुलींनी प्रथम लक्षांत घेतली पाहिजे व नंतर चालविली पाहिजे. सीता-सावित्री यांचा काळ मागं पडला म्हणून आपल्याला सांगण्यांत येतं. त्यांचीं नांवंहि मुलींना ठेवलेलीं तुम्हांला आवडत नाहीत. होय, काळ मागं पडत चालला आहे; पण त्यांतलीं तत्त्वं अद्यापिहि मूळ धरून आहेत. चारित्र्य हें धन आहे.

स्वतःचं व राष्ट्राचंहि! चारित्र्यहीनतेमुळं पारतंत्र्य येतं व पारतंत्र्यांत चारित्र्यहीनता वाढते, असा इतिहासाचा अनुभव आहे.

मनाचं सामर्थ्य वाढविण्यासाठी व्रतांची जरुरी आहे. नेमस्तपणाच्या सवयींची जरुरी आहे. गंगेचं पावित्र्य, चंद्राचं धवलत्व, सूर्याचं तेज, तुळशीचं मांगल्या म्हणजेच मुलींनो, तुमचं चारित्र्य! त्याला अेवढाहि कलंक लागूं नये म्हणून तुम्हीं दक्षता घेतली पाहिजे.

अशा चारित्र्यवान् मुलीच्या नजरेंत अेक प्रकारचं प्रखर तेज सामावलेलं असतं. सदाचारी मुलाच्या जानव्याला पाहून म्हणे भुतं पळून जातात, तसंच तुमच्या नजरेच्या प्रखर किरणांपुढं दुष्ट, चटोर, चावट मुलांची दृष्टि आंधळी होओील तुमच्याकडे पाहतांना! अशी दृष्टि असलेल्या मुलींना वाह्यात तरुणांपासून आपलं संरक्षण करतां येतं. पण हें सामर्थ्य निष्कलंक चारित्र्य असल्यावांचून लाभत नाही. असं सामर्थ्य मिळविणं हेंच व्रत तूं आचरणार नाहीस काय, किशोरी?

चारित्र्य शुद्ध ठेवण्याच्या दृष्टीनं अेका गोष्टीची आवश्यकता आहे, ती म्हणजे—परमेश्वरावर अतुल श्रद्धा असणं. आपण कांहीहि केलं, तरी कोण पाहतो अशी वृत्ति असली की चारित्र्य ढासळलंच! पण 'सदा सर्वदा देव सन्निध आहे,' अशा भावानं जर परमेश्वरावर श्रद्धा ठेवली तर आपल्या हातून कमी चुका होण्याची शक्यता आहे. ज्या घरांत अंधार असतो तिथंच चोर शिरतो. प्रभूच्या रूपानं तेजाळलेल्या घरांत शिरायला, चोरांना प्रवेश करायला जरा भीतीच वाटते, नाही का?

त्याग, तपस्या व सेवा यांवर भारतीय संस्कृति आधारलेली आहे हें मीं तुला अेकदा सांगितलेलंच आहे. तुमच्या चारित्र्यावर यांचा परिणाम होतो. तूं म्हणशील केवढ्या मोठ्या ह्या गोष्टी, आमच्यासारख्या मुलींना ह्या कशा साधाणार? पण त्याग म्हणजे तरी काय? आपल्याला अधिक आवडणाऱ्या गोष्टींसाठी लहान गोष्टींचा त्याग! त्यागाची बीजं मुलांपेक्षा मुलींमध्येच अधिक असतात. तीं अंकुरित व्हायला संधीचं शिंपण लागतं.

तपस्या तर तुमच्या विद्यार्थीदशेंत महत्त्वाची आहे. तपस्या पूर्ण झाली नाही तर फळ मिळत नाही. तसंच अभ्यास पुरा झाला नाही तर परीक्षा पास होतां येत नाहीत, हें अगदी अुघडअुघड आहे.

पुरी तपस्या होता ठेवी प्रभु फळ हातावरी ।
मूर्ख ते वांछिति फळ लवकरी ॥

असं म्हणतात तें किती खरं आहे बरं !

सेवेबद्दल म्हणायचं तर सेवामूर्ति व्हायला भारतासारखा दुसरा देश नाही. तुमच्या सेवेची जरुरी असलेले शेकडो अभागी जीव तुमच्या आसपास वावरत असतात. त्यांची सेवा धनानं, मनानं, शरिरानं जशी जमेल तशी करण्याचं व्रत तरी तुम्हाला जमेल की नाही ? दुसऱ्यासाठी परिश्रम करणं म्हणजेच सेवा. अशा प्रेमपूर्वक सेवेला तुमच्या शिक्षणसंस्थांतून, तुमच्या समाजांतून किती तरी वाव आहे. अनाथ-अपंगांचे आश्रम, रुग्णालयांतील विवळणारे रोगी, निरक्षर भगिनी, हीं सारीं तुमचं स्वागत करतील. अशा सेवेची सुरवात तुमच्या शालेय जीवनांतच व्हायला पाहिजे. भगवान् बुद्धानं दुसऱ्या-साठी परिश्रम करण्याची शक्ति परमेश्वराकडे मागितली होती. ते म्हणाले होते,

न त्वहं कामये राज्यम् । न स्वर्गम् ना पुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानाम् । प्राणिनामार्तिनाशनम् ॥

मधुर वाणीमुळंच तुमचं किशोरींचं जीवन कसं आकर्षक भासतं. त्यांत बालकांचे अव्यक्त शब्द नसतात नि तरुणांचे भडक रंगीत शब्द नसतात. स्वच्छ स्फटिकासारख्या पाण्यांतून दिसणाऱ्या निर्मल प्रतिबिंबाप्रमाणं तुमचं अंतःकरण तुमच्या वाणींतून दिसून येतं – तें संभाळून ठेवायला तुम्हीं शिकलं पाहिजे.

दुसऱ्याविषयी बोलल्यावांचून राहवतच नसेल तर त्यांच्या गुणांबद्दल कांही स्तुतिपर बोला. अशी सवय केल्यानं आयुष्यांतील सुंदर व आदरणीय गोष्टी हुडकण्याकडेच तुमचा कल राहील. जीवनाकडे पाहण्याची तुमची दृष्टि आनंदी व अुत्साही बनेल. अुत्कृष्ट विचार, अुत्कृष्ट कृति शोधण्याकडे अेकदा दृष्टि वळली की आयुष्य कितीहि संकटांनी भरलेलं असलं तरी त्याला हसतमुखानं तोंड देण्याची शक्ति तुमच्यांत येअील. तुमचं मानसिक सामर्थ्य वाढेल. हेवेदावे विरून जातील. अुत्साह व आनंद हा स्पर्शजन्य असतो. तुमच्या अुत्साहानं अितरांनाहि अुत्साह वाटेल. तुमच्या आनंदी वृत्तीनं दुर्बलांची अुदासीनता पळून जाअील. जगाची अुजळ बाजूच नेहमी दृष्टीपुढं ठेवल्यानं सर्वांचंच जीवन प्रकाशमय होअील ! जगांतला अंधार नाहीसं करण्याचं केवढं सामर्थ्य तुम्हां अेकेकटींत आहे ! हें व्रत तरी पाळतां येअील ना किशोरी तुला ?

• • •

प्रकरण १० वें

वाढतें मित्रमंडळ

तुम्ही जसजशा मोठ्या होत जातां तसतशी तुमच्या मित्रमंडळींत वाढ होत जाते. नुसती वाढच नाही तर मैत्रीचं महत्त्व अधिक वाढत जातं. आपल्या बालपणींच्या मित्रांबद्दल तुम्हाला कांही कमी प्रेम नसतं पण ते मित्र तुम्हीं मुद्दाम निवडलेले नसतात. तुमच्या बरोबरीच्या, तुमच्या वयाच्या अितर मुलांमधून ती सहजच अुत्पन्न झालेली मैत्री असते.

वाढत्या वयांत मैत्रीचा अर्थ आपल्याला कळावयास लागतो. आपल्या आवडी, कल, आचारविचार यांना पोषक अशाच मित्रांची तुम्ही निवड करतां. आता पाहा, तुम्ही जेव्हा आपल्या मैत्रिणींची निवड करितां तेव्हा तुम्ही आपल्या वयाचीच मैत्रीण निवडतां. पहिल्या अियत्तेंतील मुलगी कांही अकराव्या अियत्तेंतील मुलीशीं मैत्री करणार नाही. मैत्रिणीची निवड केल्यानंतर तिच्या मताला तुम्ही मान देतां. तुमच्या आवडीनिवडी आता तुमच्या मैत्रिणीच्या आवडीनिवडींशीं जुळत्या असतात. सर्व मैत्रिणींनी अेखाद्या समारंभाच्या प्रसंगीं सारख्याच रंगाचे कपडे घालावे, सारख्या वेण्या माळाव्या, असं तुम्हाला वाटतं नि मग सारख्या वेषांत तुम्हाला पाहून ‘मैत्रिणींचं टोळकं दिसतंय्!’ असे गौरवाचे अुद्गार कुणींतरी काढतं. तुम्हाला धन्यता वाटते. आपल्या कुटुंबांतील व्यक्तीपेक्षा तुमच्या मैत्रिणींच्या मताचा, विचारांचा पगडा तुमच्यावर अधिक बसतो या वयांत. हें नैसर्गिकच असतं. आपल्या मैत्रिणींत आपली चहा होत आहे हें कळून आल्यावर तुम्हाला वाटतंच, की आपल्यांत आता

समाधानकारक प्रगति होत आहे. तुम्हीं घातलेला अेखादा पोषाख, तुम्ही प्रकट केलेला अेखादा विचार, अेखादा योजलेला कार्यक्रम तुमच्या मैत्रिणीला आवडला नाही की तुम्ही खट्टू होतां. पण ही प्रवृत्ति म्हणजेच कौटुंबिक बंधनांतून बाहेर पडून दुसऱ्यांशीं मिळून-मिसळून वागण्याची तुमची पूर्वतयारी असते. मैत्रिणींशीं जुळतं घेण्यास आपण समर्थ झालों आहोंत, आता अितरांशींहि आपल्याला असंच मिळतं घेअून राहतां येअील याची तुम्हांला खात्री वाटते आणि म्हणूनच विशाल सामाजिक जीवनाची तुम्हाला हौस वाटूं लागते – त्याची ओढ लागते. मित्र मैत्रिणींच्या साहचर्याची जी भूक या वयांत बळावते त्यांतूनच पुढं योग्य सहचराची व संसाराची, आपल्या स्वतःच्या घराची भावना अुत्पन्न होते.

या नाजूक वयांत आपल्याच वयाच्या मुलीशीं मैत्री दृढ होत असली तरी अेकाच मुलीमागं राहून अितरांशीं फटकून वागणं बरं नव्हे. मैत्रिणींचं वर्तुळ जितकं अधिक तितकं चांगलं; त्यामुळं समाजाच्या विशाल जीवनाच्या परिचयाला आरंभ होतो, स्वभाववैचित्र्य अनुभवायला मिळतं व भावी जीवनांत येअील त्या परिस्थितींत सुखासमाधानानं राहण्याचं सामर्थ्य अंगीं बाणतं. अेकाच मैत्रिणीशीं निकट मैत्री करणं, तिच्याच सुखदुःखांत सामील होणं, तिच्याच अेकमेव सहवासांत अतिशय आनंद मानणं, अशा मैत्रींत जरी नांव ठेवण्यासारखं कांही नसलं तरी तुमची वृत्ति स्वार्थी, अेककल्ली व संकुचित बनण्याची भीति असते.

तुमच्या मैत्रीचं वर्तुळ जितकं मोठं असेल तितकं तुमचं जीवन तेजस्वी होअील, त्याला चकाकी येअील. तुमच्या स्वभावाच्या बोथट बाजूंना गोलाअी येअील. तुमच्या वयांतील, कुमारावस्थेंतील मुलांमुलींमध्ये स्पष्ट बोलण्याची प्रवृत्ति असते. ह्या प्रवृत्ती-नुसार तुमच्यांतील दोष तुमच्या मैत्रिणी तुमच्या तोंडावर स्पष्टपणें सांगतील – अर्थात् तुम्हीहि त्यांचे दोष दाखवालच ! विचारांची ही देवाणघेवाण तुमच्या अुत्कट भावनांना थोडीतरी मुरड घालील, यांत शंका नाही. आणि मग असा अेक काल लवकरच येअील, कीं त्या वेळीं तुमच्या मैत्रिणीप्रमाणं तुमच्या मित्रमंडळांत मित्रांचाहि समावेश होअील. अशा अनेक मित्रांपैकीं अेकावर तुमची दृष्टि केंद्रित होअील, तो तुम्हांला अितरांपेक्षा अधिक आवडायला लागेल, त्याचं सान्निध्य तुम्हांला हवंहवंसं वाटेल. आपल्या मैत्रिणींनाहि तुम्ही त्याच्याबद्दल सांगाल – अमूक अेक मुलगा आपणाकडे अधिक लक्ष देतो, हें मैत्रिणींना सांगायला तुम्हांला अभिमान

वाटेल. कांही मैत्रिणींना ही गोष्ट कदाचित् आवडणार नाही. मग तुमचं मन खट्टू होईल. कांही तुमची कुचेष्टा करतील, कांही आपली अनुकूलता दाखवितील, कांही गोड चेष्टा करतील, तर कांहीजणी डोळे मिचमिच करीत म्हणतील, "आहे ब्बुवा !"

वयाच्या सोळासतरा वर्षाला अेकदा सुरवात झाली म्हणजे अेखाद्या तरुणाविषयी तुम्हाला विलक्षण ओढ वाटूं लागेल. त्याच्या मैत्रीपुढं तुम्हाला तुमच्या जिवाच्या मैत्रीणीहि नकोशा वाटतील. मैत्रीची गरजहि भासणार नाही. तुमच्या मित्राच्या मैत्री-विरुद्ध मैत्रिणीनं केलेली टीका तुम्हाला सहन होणार नाही. जुन्या मैत्रिणीला अेक वेळ तुम्ही सोडाल, पण तुमच्या नव्या मित्राला सोडण्याची कल्पनाहि तुम्हाला सहन व्हायची नाही. तुमच्या प्रेमनिष्ठेचा प्रवास याप्रमाणं मैत्रिणीपासून मित्रापर्यंत होईल. आपलं घर, आपला संसार थाटण्याची ती पूर्वभावना असते. आता याच तरुणाबरोबर सहजीवन घालविणं तुम्ही ठरवाल की नाही हें जरी तुम्हाला निश्चित सांगतां येणं शक्य नसलं तरी तुमच्या भावी जीवनाची पूर्वतयारी या वयांत निश्चित होत असते.

या वयांतील मैत्रीचा अर्थ काय ? ती कशी स्थिरावते ? कोणतीहि मैत्री कायम राखावयास निष्ठा लागते. तुम्हीं केलेली अेखादी गोष्ट मैत्रिणीला पसंत .पडली की केवढं समाधान वाटतं तिला !

"किती ग सुंदर दिसतेस तूं या पोषाखांत !" मैत्रिणीच्या तोंडच्या अेवढ्या लहानशा वाक्यानं तुमचं मन उल्हसित होतं. मैत्रिणीच्या ह्या स्तुतींत अेक प्रकारची निष्ठा असते. तिच्यावर तुमचीहि निष्ठा असते. तिच्या मताची तुम्हाला खात्री असते, किंमत वाटते म्हणूनच तुम्ही तिच्या स्तुतिनिंदेनं हरखून जातां अगर खिन्न होतां. याचा अर्थ असा, की तुम्ही आपलीं मतं व आचार आपल्या मैत्रिणींच्या मताप्रमाणं आखतां. अेखादी मैत्रीण अभ्यासू असली की तिच्याप्रमाणंच अभ्यास करण्याची लकब तुम्हाला लागते. अेखादी अुनाड असेल तर तिच्याबरोबर अुनाडक्या करीत अभ्यासाचा मोलाचा वेळहि तुम्ही दवडतां – अशी शक्यता आहे. अशा खेळाडू व अुनाड मैत्रिणी आपल्या हुषार मैत्रिणींची टवाळी करायलाहि मागंपुढं पहात नाहीत. "आहे ब्बुवा स्कॉलर !" म्हणून चेष्टा करतात, हिणवितात नि तुम्हाला लाजल्यासारखं होतं. कांही मुली सात्त्विक आचार-विचारांच्या असतात. अशांची मैत्री तुम्हाला जीवनांत खात्रीनं ध्येयवादी व कर्तव्यनिष्ठ केल्यावांचून राहणार नाही; कारण कुमारावस्थेंत आओबापां-

पेक्षा तुमच्या मैत्रिणीचंच वजन तुमच्यावर अधिक असतं. तुमच्या स्वभावावर, तुमच्या शीलावर याचा परिणाम होतो. अितके हे मैत्रीचे धागे मजबूत असतात. म्हणूनच म्हटलं आहे—समान शीले व्यसनेषु सख्यम् ।

मैत्रिणीच्या मनाचा तुमच्यावर परिणाम होत असल्यानं व तिच्याच कलानं तुम्ही जात असल्यानं तुमच्या आअीवडिलांना वाटतं—मुलगी विघडली, आपलं अैकत नाही, बंडखोर झाली आहे. वास्तविक तिची वृत्ति बंडखोर नसते; पण आअीबाप व मैत्रीण या दोघांच्या मतांत अेकवाक्यता जर नसली तर तुमचं पारडं मैत्रिणीच्याच बाजूला झुकतं. मैत्रिणीचं महत्त्व राखण्यासाठी तुम्ही आअीबापांचा रोषहि अेक वेळ पत्करतां. पण हें थोडं धोक्याचं नव्हे का? अेखादी गोष्ट तुमच्या सदसद्विवेकबुद्धीला पटत आहे, पण ती मैत्रिणीच्या मनाविरुद्ध होत आहे, म्हणूनच तुम्ही विवेकाला दूर सारून ती करणं योग्य होणार नाही. कदाचित् परिणाम घातकहि ठरेल!

आपल्या मित्रमंडळाच्या मनाविरुद्ध अेखादी गोष्ट आपण केली की त्यांच्या टीकेला आपण पात्र होअू या. भीतीनं त्यांच्याविरुद्ध जाण्याची तुमच्यांत कुवत नसते. मग अशा वेळीं कसं वागावं याचं कोडं पडतं. म्हणूनच मित्रमैत्रिणीची निवड फार काळजीपूर्वक करावी लागते. त्यांच्यामुळं तुमच्या स्वभावाला वळण लागतं. तुमचं भविष्य तुमच्या मित्रमैत्रीणींच्या हातीं असतं असं म्हटल्यास चूक होणार नाही.

मैत्रिणींबद्दल तुमची जी अेक अुच्च भावना असते त्यामुळं त्यांचं जीवनहि तुमच्याशीं निगडित झालेलं असतं. म्हणूनच मैत्री जपून व काळजीपूर्वक करावयास पाहिजे. सज्जन मित्र न सांगतांच तुमचं मंगल चिंतीत असतो. अंगावर पडलेला केरकचरा जितक्या सहजतेनं आपण झाडून टाकतों तितक्याच सहजतेनं खरा मित्र आपलं रक्षण करतो, चुकलेल्या मार्गापासून परावृत्त करतो, आपला जाणारा तोल संभाळतो, पशुत्वांतून माणुसकीकडे नेतो, दुष्ट सवयींच्या चिखलांतून वर काढतो. मैत्रिणींकडून आपली प्रशंसा व्हावी, अुत्तेजन मिळावं, सहानुभूति मिळावी, हें जरी साहजिक असलं तरी तोंडपुजेपणा करणाऱ्या मित्रवर्गापासून सावधच असलं पाहिजे. त्यापेक्षा कठोर अुपदेश करून आपली चूक दाखविणारा मित्रच अधिक श्रेष्ठ व खरा मित्र समजावयास हवा. कोणत्याहि संकटांत मदतीला धावणारे मित्र म्हणजे आपलं हुकमी धन आहे. म्हणूनच तुमच्या ध्येयाशीं, अभिरुचीशीं जुळणारी, तुमच्याच वयाची मैत्रीण—जिचं ध्येय तुम्हाला अुत्तेजित करतं, जिच्या आचारविचारांचं अनुकरण करावं असं तुम्हाला मनापासून वाटतं, अशीच

मैत्रीण तुम्हीं पसंत केली पाहिजे, तरच तुमच्या मैत्रीचं सहजीवन सुखदायक होओील. समाजहि तुम्हांला तुमच्या मैत्रीवरून ओळखतो व मग तुमच्या वर्तणुकीबद्दल शंका घेण्याचं धाडस कुणी करीत नाही.

तुमचीं नि तुमच्या आओीवडिलांचीं मतं समजा, अेकच आहेत – जुळतीं आहेत; अशा वेळीं आपल्या मैत्रिणीच्या मतांशीं, ध्येयाशीं तीं कितपत जुळतीं आहेत हें ठरविण्यास तुमच्या मैत्रिणींना वारंवार तुमच्या घरीं येण्याची संधि द्यावयास पाहिजे. तुमच्या घरांतील माणसांशीं तिचं जुळत असेल तर ती नेहमीच तुमच्या घरीं येण्यांत आनंद मानील. नाहीतर ती येण्याची टाळाटाळ करील.

मैत्रीची योग्य निवड तुम्हाला करतां आली नाही तर वडील माणसांचा सल्ला घेण्यांत कमीपणा वाटूं नये. मैत्री कुणाशीं करावी हा जरी तुमचा वैयक्तिक प्रश्न व हक्क असला तरी वडील माणसांचा सल्ला घेतल्यानं चुका लक्षांत येतात. अेखादं महाग किमतीचं कापड आपण वाटेल त्या शिंप्याच्या हातीं सोपवीत नाही, मग साऱ्या जीवनावर जिचा परिणाम होणार आहे, सुखी अगर दुःखी जीवनाचा परिपोष जिच्या मैत्रीमुळें होणार आहे, ती मैत्रीण शोधतांना केवढी काळजी करावयास हवी बरं ? अुलटपक्षीं तुमच्या आचारविचारांचा परिणाम तुमच्या मैत्रिणीच्या जीवनावर होणार असल्यास तुमचीहि तुमच्या वागणुकींतील जबाबदारी अधिकच वाढते.

तुम्ही विचाराल, की मग आमची विचारशक्ति पूर्णत्वाला पोचेपर्यंत आपण स्वस्थ बसावं की काय ? स्वस्थ बसणं जरी शक्य नसलं तरी आओीबापांच्या प्रभावी मार्गदर्शनाखालीच हा काळ तुम्हीं घालविला पाहिजे. त्यामुळं तुमच्या भावी जीवनांतील दुःखं कमी होतील व पश्चात्तापाची पाळी येणार नाही. आपल्या वागणुकीनं वडील माणसांच्या मनांत तुम्हीं अेकदा विश्वास निर्माण केलांत, की तीं तुमच्यावर विश्वास टाकायला मागंपुढं पाहणार नाहीत. मातापितरं तुमच्या आयुष्यांतील सल्लागार होत. यशस्वी झालेलं तुमचं जीवन पाहून त्यांना खूप आनंद होओील. म्हणूनच अमुकअमुक ठिकाणीं मी आज जाणार आहें, अमुकअमुक गोष्ट मी करणार आहें, असं ठासून न बजावतां अमुक ठिकाणीं मी जाअूं का ? अमुक गोष्ट मी करूं का ? – अशी नम्रतेची वृत्ति बाळगल्यास तुमच्या कुटुंबांतील सौख्य तुम्ही द्विगुणित कराल व भावी जीवनांतील शल्यं तुम्हांला टाळतां येतील.

तुमचे आओीबाप हेच तुमचे खरे मित्र होत.

पापान्निवारयति योजयते हिताय
गुह्यं च गूहति गुणान्प्रकटीकरोति ।
आपद्गतं नच जहाति ददाति काले
सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्तः ॥

ही सन्मित्राची व्याख्या आअीबापांना लागू पडते. त्यांना योग्य तो मान देतांना, त्यांच्या सल्ल्याप्रमाणं वागणूक ठेवीत असतांना तुमची योग्य वाढ होत आहे असं समजावयास हरकत नाही.

आपल्या परिचयापैकी अेखाद्या मुलीशींच आपली जिवाभावाची मैत्री जडते; तरी अितर मुलींशीं फटकून वागणंहि बरोबर नाही. तुमच्या शाळांतून, सहलींतून, काय दिसतं बरं? मैत्रिणी-मैत्रिणींचे गट बनलेले असतात. आपल्या गटाबाहेर मुली मिसळत नाहीत असं तुमच्या शालेय जीवनांत पुष्कळदा दिसून येतं. हें चांगलं नाही. विशाल सामाजिक जीवनांत जेव्हा तुम्ही मग प्रवेश करतां तेव्हा मग गटागटांचीं लहानलहान वर्तुळं सर्वत्र विखुरलेलीं दिसतात. तुम्ही म्हणाल, आमच्या मैत्रिणींच्या गटांतच आम्हाला फार समाधान वाटतं. अग, पण खरी मैत्रीण अशी अेखाददुसरीच असते आणि अशा मैत्रिणीजवळच तुम्ही सुखःदुखं सांगतां. ती तुमच्या विश्वासाला पात्र असते व आनंदहि देते. पण पुष्कळदा मुलीमुलींची मैत्री टिकाअू नसते, अळवा-वरच्या पाण्यासारखी असते, असं दिसून येतं. कां बरं? मैत्री करतांना आपल्या तोलाची, आपल्या सामाजिक पातळीची मैत्रीणच निवडावी. जातीपातींचा प्रश्न मैत्रीत अुत्पन्न होत नाही; पण श्रीमंती-गरिबीचा प्रश्न मात्र मैत्री तोडण्यास कारणीभूत होतो. तुमच्या श्रीमंत मैत्रिणीनं तुम्हाला कांही देणगी द्यावी, तुमच्या वाढदिवसाला तुम्हाला आवडणारी साडी द्यावी नि तुम्हाला मात्र अेक हातरुमालहि तिला देतां येअू नये—अशी स्थिति निर्माण झाली की तुम्ही खिन्न होतां. तुमच्या गरिबीबद्दल तुम्हांला मनस्वी वाअीट तर वाटतंच, पण ती स्थिति मात्र तुम्हाला बदलतां येत नाही. म्हणूनच आपल्या तोलामोलाची मैत्रीण निवडणं हेंच अुचित. वास्तविक खऱ्या मैत्रींत श्रीमंती–गरिबी, जातपात हीं आड येअूं नयेत. मनाची श्रीमंती हाच मैत्रीचा दुवा असावा.

• • •

प्रकरण ११ वें

मैत्री टिकली पाहिजे

मित्र-मैत्रिणी सर्वांनाच हव्याहव्याशा वाटतात. लोकप्रियतेची आवडहि सर्वांनाच असते; पण आपल्या मैत्रिणींत आपण प्रिय व्हावं ही अिच्छा तुम्ही वयांत येतां त्या वेळीं प्रबल असते. या वयांत अितर माणसं व आअीवडील आपल्याबद्दल काय म्हणतात याची मुली पर्वा करीत नाहीत; पण आपली मैत्रीण काय म्हणते याविषयी तिला अधिक महत्त्व वाटतं. आअीवडिलांच्या प्रेमळ संरक्षणाखाली तुम्ही वाढत असतां. अितरांच्या प्रेमाची तुम्हाला बेफिकिरी वाटते. किंबहुना आजूबाजूच्या जगाविषयी विचार करण्याच्या परिस्थितींत तुम्ही नसतां. वयांत आल्यावर मात्र तुमच्या मित्रमंडळीचं वर्तुळ मोठं होत जातं. आअीबाबांच्या व घरांतील मर्यादित प्रेमावर तुम्ही आता जगूं शकत नाही. आपल्या वयाच्या मैत्रिणींत आपल्याला मान मिळावा, मोठेपणा प्राप्त व्हावा, असं तुम्हाला वाटतं. वर्गांतील मुलीमुलींतील स्पर्धेला आता मैत्रीचं स्वरूप येतं. आपल्या मैत्रिणी ह्या आपल्या कुटुंबांतीलच अेक आहेत अशी तुमची त्यांच्याबद्दल भावना बनते. या कालखंडाच्या शेवटींशेवटीं तर तुमच्या मैत्रींत मुलांचाहि समावेश होतो.

अितरांशीं आपण जी वर्तणूक करतों त्यावर आपल्या जीवनाचं यश व सुख अवलंबून असतं असं तुम्हाला मग कळून येतं. परीक्षा पास होणं हें नुसतं आयुष्याचं ध्येय होअूं शकत नाही. शिक्षकांशीं, प्राध्यापकांशीं, सहाध्यायांशीं आपलं कितपत मिळतं-जुळतं यावर आपल्या आयुष्याचं सुख व यश अवलंबून असतं. शिक्षकिणीचा अगर

परिचारिकेचा अगर डॉक्टरचा धंदा तुम्हीं पतकरलं तर तुम्हाला असं दिसून येअील, की सहानुभूति, प्रेम या गुणांखेरीज या धंद्यांत यश येणं शक्य, नाही विद्यार्थी, पालक व चालक यांचं सहकार्य असल्याखेरीज जसा शिक्षक यशस्वी होअूं शकत नाही. त्याचप्रमाणं रोगी, अितर परिचारिका, रोग्याच्या कुटुंबांतील व्यक्ति, डॉक्टर यांच्याशीं स्नेहभावानं वागल्याखेरीज व त्यांचं सहकार्य मिळाल्याखेरीज परिचारिकेच्या धंद्यांतहि तुम्ही यश मिळवूं शकणार नाही. अेकाद्या कचेरींत जरी नोकरीला लागलांत, तरी अितर सहकाऱ्यांशीं आपण कसं वागतों, कसं मिसळतों, यावरच तुम्हांला नोकरी टिकवितां येणार व तुमच्या चहात्यांचा वर्ग वाढणार. वरिष्ठ अधिकारी जेव्हा तुमच्याविषयी चवकशी करतील, तेव्हा मित्रांच्या वर्तुळांत तुम्ही कसं वागतां, त्यांचं तुमच्याविषयी काय मत आहे यावरूनच तुमची छाप वरिष्ठांवर बसेल.

मैत्री म्हणजे अेक देवघेवीचा व्यापारच नव्हे का ? तुम्ही जें द्याल त्याचीच परत-फेड तुमचे मित्र करतील. कोणतेहि चांगले मित्र मिळविण्याकरिता तुम्हाला तशी पात्रता अंगीं आणली पाहिजे. शिक्षकांकडून प्रास म्हणवून घेतांना प्रथम चांगल्या अभ्यासाची देवघेव केली पाहिजे. कुणाचीहि मर्जी राखतांना आपली पात्रता सिद्ध केली पाहिजे. हीच देवघेव शेवटीं आपला संसार थाटतांना, घर करतांना, तुम्हाला अुपयोगी पडते. अेखादा तरुण तुम्हाला गृहिणीपदाचा मान देण्याचं ठरवितो, तो केवळ तुमच्या शारीरिक आकर्षणामुळं नव्हे, तर तुमचं व्यक्तित्व त्याला आवडलेलं असतं. सुस्वभावी माणसाला मदत करायला त्याचं मित्रमंडळ सदैव तयार असतं. वडील माणसंहि अशा व्यक्तीला मदत करण्यास सदैव तयार असतात.

वयांत येणाऱ्या मुली वडील माणसांपेक्षा अधिक आनंदी, अधिक अुत्साही असतात. त्यांच्या अुत्साहानं प्रौढांच्या अुदासीन व निरुत्साही जीवनांत अेक प्रकारचा जोम मिळतो; पण आपल्यापेक्षा मोठ्या माणसांशीं मैत्री करतांना थोडी सावधगिरी बाळगायला पाहिजे. ‘आम्हाला सर्व माहीत आहे’ ही तुम्हां मुलींची चढेल वृत्ति मोठ्या माणसांना आवडत नाही. कारण त्यांचा अनुभव अधिक असतो, आयुष्यां-तील बऱ्यावाअीट दिवसांना त्यांनी तोंड दिलेलं असतं. त्यांची न्यायबुद्धि परिपक्व, परिणत झालेली असते; तेव्हा त्यांच्याहून आपल्याला अधिक समजतं ही अहंकाराची बुद्धि ते तुमच्याकडून अपेक्षीत नाहीत. त्यांच्या अनुभवाला व वयाला तुम्ही मान देत नाही अशी त्यांची कल्पना होते. कधीकधी मोठीं माणसंहि चुकतात. त्यांच्या तोंडीं

लागून, आपला वरचढपणा करून त्यांच्या; मनांतून अुतरण्यापेक्षा, त्यांचा योग्य तो आदर ठेवून त्यांच्या अनुभविक दृष्टीचा फायदा घेण्यासाठी त्यांच्या चुकांकडे डोळेझाक करणंच बरं. पुष्कळदा मोठ्या माणसांच्या मदतीची, मार्गदर्शनाची तुम्हांला जरूर लागते. ती मागतांच क्षमाशील अशा वडील माणसांकडून तुम्हाला मिळतेच.

कधीकधी आअी म्हणते – " बाळे, हा पोषाख तुला शोभत नाही. ह्या डोळ्यां-वरच्या झिपऱ्या – हा पोटावरचा उघडा भाग – "

पण तिला वाक्य पुरं करूं न देतां बाळी खेकसते–" बरं बरं ! तुला काय कळतंय् त्यांत ? "

दुसऱ्या अेखाद्या प्रसंगीं बाळी आअीला म्हणते, " तें लुगडं नको ग नेसूं– अगदी गबाळ दिसतेस ! निदान माझ्याबरोबर येतांना तरी नअू वारी लुगडं नेसून येअूं नकोस ! " आणि मग आअीच्या डोळ्यांत पाणी अुभं राहतं.

अशी ही आपलंच म्हणणं खरं करण्याची सवय लहान वयांत अेकदा जडली, की मोठेपणीं ती प्रबळ होते. सुरवातीला तुम्ही आअीवर व अितर वडील माणसांवर आपला मोठेपणा प्रस्थापित करायला जातां व नंतर घराबाहेर आपल्या समवयस्क मत्रिणी व शाळासोबतिणी यांवरहि तो गाजवूं पाहतां. पण असं करतांना मैत्रिणींची साखळी तुटते व अेकाकी जीवन कंठण्याची पाळी येते. मैत्रीचीं बंधनं संयमाच्या साखळीनं संभाळायचीं असतात. तुमचा अेककल्लीपणा घरांत तुमचे आअीबाप अेक वेळ सहन करतील, पण घराबाहेर, शालेय जगांत, समाजांत तो तुमचा अवगुण समजला जाअील. दुसऱ्याच्या मताला मान देणं ही गोष्ट या वयांत तुमच्या ध्यानीं यायला पाहिजे.

" आज आपण सर्वजण मिळून सिनेमाला जाअूंया. " विजयेचे वडील सुचवितात.

" मला नाही बाअी वेळ आज तुमच्याबरोबर यायला. मला विद्युत्‌बरोबर जायचं आहे. तुम्ही जा ! " हें विजयेचं बोलणं अैकल्यावर तिच्या वडिलांचा किती हिरमोड झाला असेल बरं ! आपल्या अेकटीच्या हट्टामुळं आपण किती जणांचा हिरमोड करतों याची विजयेला जाणीव नसते. पण विद्युत्‌बरोबर जाण्यापूर्वी विजयेनं वडिलांची परवानगीच न घेतल्यानं ही घटना घडून आली. आपण मोठे झालों–आता आअीवडिलांची परवानगी कशाला हवी, असं तुम्हाला वाटतं. खरं की नाही ?

वर्गांत बाअी विचारतात, “ दिल्लीला सहल निघायची आहे; कोणकोण येणार ? ”
सर्वजणी हात वर करतात.

“ घरची परवानगी आहे ? ” बाअी विचारतात.

“ हो ऽऽ ! आम्ही हट्टच घेअू ! – जेवणार नाही ! ! ”

“ मग लेखीच परवानगी आणा पाहूं ! ”

दुसऱ्या दिवशीं चव्वेचाळीस मुलींपैकी चार श्रीमंत मुलीच दिल्लीला जायची लेखी परवानगी आणतात.

“ बाकीचीं डोकीं कां ग खाली ? ” बाअी विचारतात. पण अुत्तरच मिळत नाही.

प्रत्येक शाळेंतून तुम्हां मुलींचा असा अनुभव येतो. वडील माणसांशीं खटके अुडण्याचं दुसरं कारण म्हणजे थट्टामस्करी करण्याची तुमची सवय. वडील माणसं थट्टेच्या परिणामांकडे लक्ष देतात, तर तुम्ही थट्टेपासून मिळणाऱ्या क्षणिक आनंदाकडे दृष्टि ठेवतां. ‘ मस्करीची कुस्करी ’ कशी होते हें अनुभवानं त्यांनी जाणलेलं असतं.

आपली छाप अितरांवर पाडण्यास व मैत्री लवकर जडविण्यास संभाषण-चातुर्यहि मदत करतं. माणसाची पारख संभाषणावरूनच चटकन् करतां येते. हें संभाषण म्हणजे आपलंच आत्मगत भाषण नव्हे, हेंहि लक्षांत ठेवलं पाहिजे. संभाषणा-मधे दोन्ही बाजूंना बोलण्याची संधि द्यायची असते. दुसरं कुणी आपले अनुभव सांगत असतांना आपण गप्प राहून शांतपणेंच त्यांचं म्हणणं अैकून घ्यायचं असतं. आपले अनुभव सांगतांना त्यांना जो आनंद होतो तो त्यांना घेअू द्यावा. मधेच आपलं घोडं दामटून त्यांच्या विचारांची साखळी तोडूं नये. तुमचंहि म्हणणं मग त्या शांतपणें अैकून घेतील. मधेमधे बोलून आपलंच म्हणणं अितरांना अैकावयास लावण्यांत आपण मित्र गमावतों. म्हणून मनावर थोडासा ताबा ठेवून मित्र जोडण्याची ही संधि गमावूं नये. बोलक्या मुलीच सर्वांना आवडतात. तिच्या संभाषणचातुर्यानं, हजर-जबाबीपणानं तिच्या मित्रमंडळांत तिच्याविषयी अनुकूल मत होतं.

अितरांना बोलूं न देतां, आपलंच घोडं पुढं दामटायचं हें जसं मैत्री टिकण्याच्या दृष्टीनं घातक आहे, तसं संभाषणांत मुलीच भाग न घेतां घुम्मेपणानं राहणं हेंहि मैत्रीचे पाश सैल होण्यास कारणीभूत होतं. आपल्या मैत्रिणींच्या संभाषणांत आपण रमलों आहोंत असंहि दाखविण्याची संधि तुम्हीं गमावतां कामा नये. तुम्ही म्हणाल,

सर्वच विषयांत आम्हाला कसं रमतां येईल ? तुमच्या समवयस्क मैत्रिणींचे नि तुमचे संभाषणाचे विचार अेकाच पातळीचे असणार. समान आचारविचार असल्याशिवाय मुळी मैत्रीच संभवत नाही. नाही विषय समजला तरी त्या विषयावरील तुमच्या शंका, प्रश्न मधूनमधून विचारून, तुम्ही संभाषणांत रमलां आहांत असं तर सिद्ध होईल ! वर्गांत, सभेंत, तुम्ही पुष्कळदा गप्पा मारीत बसतां. शिक्षकांचा वर्गांत व वक्त्याचा सभेंत त्यामुळं आत्मविश्वास अुडून जातो. त्यांना वाटतं, आपलं कांही चुकत तर नाही ? आपल्याकडे श्रोतृवृंदाचं लक्ष जात नाही कसं ? ही स्थिति गवयाच्या गाण्याच्या वेळीं तर फार ठळकपणें दिसून येते. गवयी अेकटाच गात असतो – म्हणजे सर्वांनी अर्थात अेकत्र गायचं नसतंच; पण गायन अैकायचं असतं हेंहि तुम्ही विसरतां. त्याबरोबर सामाजिक शिष्टाचारहि तुमच्या ध्यानीं येत नाहीत.

अेकदा प्रवासांत अेका आदिवासी स्त्रीनं कोंबड्यांच्या धंद्याबद्दल बोलायला सुरवात केली. तिला आम्हीं बोलूं दिलं. अेखाद्या पुस्तकांतून अेवढी माहिती वाचायची आम्हीं खचित टाळाटाळी केली असती; पण तिनं आपल्या पद्धतीनं, आपल्या रांगड्या भाषेंत, अेरवी रुक्ष वाटणारा हा विषय अगदी सोप्या भाषेंत रंगवून सांगितला. तो सांगतांना तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर केवढा आनंद ओसंडत होता ! तिचे किलकिले डोळे कसे चमकत होते, याचा विसर केव्हाहि पडणार नाही. आपण शांतपणें अेखादी गोष्ट अैकून घेतल्यावर ती सांगणाराच्या आनंदानं आपलंहि हृदय अुचंबळून आलं पाहिजे. यालाच सहृदयपणा म्हणतात. मैत्री जमवायला, ती टिकवायला सहृदयतेचा फार अुपयोग होतो. ज्यांच्यापाशी सहृदयतेचा हा गुण असतो, त्यांच्या मित्रधनाला तोटा नाही. शिवाय अितरांचे अनुभव अैकल्यानं आपल्या ज्ञानांत केवढी तरी पडत असते.

मैत्री करणं व ती कायम टिकवणं हें काम सोपं नाही. त्यांत पुष्कळ अडथळे येतात. शाळेंतील मैत्रिणी पुढल्या जीवनांत जर सतत भेटत राहिल्या तरच त्यांची मैत्री टिकूं शकते. अेकाच गावांत, अेकाच महाविद्यालयांत जर सुदैवानं तुम्ही मैत्रिणी अेकत्र आलांत तरच ती मैत्री कायम राहण्याचा संभव असतो. लग्नामुळं अेखादी मैत्रीण तुमच्यापासून दूर जाते. सुरवातीला अेक दिवसाआड तुमचीं पत्रं तिला जातात. नवीन ओळखी होतात व पत्रांचं अंतर वाढत जातं. जी ती आपल्या प्रपंचांत गढून जाते. मग केव्हातरी अचानक प्रवासांत तुमची गाठ पडते व तुम्ही म्हणतां, "तुम्हाला

पाहिल्यासारखं वाटतं ! ” म्हणून मैत्री वयांत येतांना वाढली पाहिजे, तारुण्यांत ती टिकविली पाहिजे. चांगल्या मैत्रिणी मिळणं ही जीवनांतील अेक अत्यंत सुखदायी व भाग्याची गोष्ट आहे. ज्यांना अुत्तम मित्र व मैत्रिणी जोडतां आल्या आहेत त्यांची भाग्यसीमा कुठवर वर्णावी !

• • •

प्रकरण १२ वें

घरींदारीं

"मग जाऊं का मी सहलीला, आओी ?"

"सहल की स्वैर विहार ?"

"असं कां विचारतेस ग ?"

"कां विचारूं नये ? मागं आपण आपल्या कुटुंबाची सहल काढली होती पंचगणीला, तेव्हा आमच्याबरोबर यायला तूं कुरकूर करीत होतीस नि आता शाळेच्य सहलीचा तूं कालपासून हट्ट घेतला आहेस ! – आणि मीं ज्या कांही सहली पाहिलेल्या आहेत त्यांवरून तुम्हां मुलींना सहलींच्या महत्त्वापेक्षा स्वैर विहाराचाच अधिक मोह पडत असावा असं मला वाटतं. वास्तविक यांत गैर असं कांहीं नाही. आपल्या शाळकरी मैत्रिणींच्या सहवासांत कांही काळ काढावा, आपल्या देशांतील ओतिहासिक तशाच निसर्गरम्य स्थळांचं दर्शन घ्यावं यांत कांही वाओीट नाही. देशाभिमानाची ओपासना व्हायला देशाचं संपूर्ण दर्शन घडायलाच पाहिजे, सहलीमधून तें सहजच घडतं."

शिवाय, हें तुमचं वयच असं आहे, की तुम्हांला वाटत असतं, घरच्या बंधनांतून कांही क्षण तरी दूर जावं, आपलं व्यक्तिमत्व प्रकट करावं, आपण कुणीतरी विशेष आहोंत असं दाखवावं. आपल्यापेक्षा लहान मुलीवर ताओीगिरी करावी, शिटी वाजवून मुली ओकत्र करण्यांत, भोजनावर देखरेख करण्यांत, अशा प्रत्येक गोष्टींत आपल्याला पुढाकार मिळावा ही तुमची धडपड ! सहलींत अशी संधि तुम्हांला

मिळतेहि, पण होतं तें भलतंच ! घराबाहेर कसंहि वावरलं तरी चालेल असं तुम्हांला वाटतं. वास्तविक घराबाहेर समाजांतच तुम्हांला बंधनं सांभाळलीं पाहिजेत. घरगुती वर्तणूक व सामाजिक वर्तणूक या भिन्न गोष्टी आहेत. गणितांत पहिला क्रम आला आहे या आनंदोत्सवाच्या भरांत घरीं लाडांत येअून तुम्ही 'ला ला–ला–ला–ला' म्हणून किंचाळाल, पण समाजांत चारचौघांत असं वरळाल तर सर्वांच्या हितार्थ वेड्याच्या हॉस्पिटलांतच तुमची रवानगी होण्याचा संभव आहे. सामाजिक वर्तणुकीचं शिक्षण मिळावं म्हणूनहि सहलींचा अुत्तम अुपयोग तुम्हीं करून घ्यायला पाहिजे. अशा शिक्षणासाठी आपलं सरकारहि विद्यार्थांना मदत करीत असतं. पण तुमच्या सहली म्हणजे गजबजलेल्या बोलत्या छावण्या ! तुम्ही कोण, कोणत्या कुळाला, कोणत्या शाळेला तुम्हीं भूषविलं आहे हें न विचारतांच आजूबाजूच्या माणसांना कळून चुकतं. शिष्टाचार म्हणजे काय याची कल्पनाच तुम्हांला कुणी करून दिलेली नसते. किंबहुना आपल्याकडे शिष्टाचारांचं असं शास्त्रच नाही. म्हणूनच सर्वांची ह्या बाबतींत अेकवाक्यता नाही. आपल्या प्राचीन स्मृतिग्रंथांतून दैनंदिन वागणुकीचा सूक्ष्म तपशील आढळतो, तसेच अनेक विधिनिषेधहि आढळतात. पण नवीन डोक्यावर ती जुनी टोपी कोण घालील !

साधी आवाजाची गोष्ट घ्या. चारचौघांत कुणी कसाहि आवाज काढावा – तोंडांतून, नाकांतून, पोटांतून – आवाजाला नियंत्रणच नाही. हें काय बाअी नवीन प्रकरण ? तूं विचारशील. आवाजाचं नियंत्रण ? होय, प्रकरण आहे पण नवीन नाही. सहज बोलतांना ताशाचा आवाज आपण काढीत असतों. पन्नास यार्डांवरून बोलतांना ज्याप्रमाणं आवाजाची अुंची व पल्ला वाढवावा लागतो तसा जवळच्या माणसाशीं बोलतांना तो कमीहि करावा लागतो. स्वतःच्या आवाजाच्या नियंत्रणाचं महत्त्व माहीत नसल्यानं पुष्कळदा रेडिओच्या आवाजाच्या लांबीरुंदीचं महत्त्व आपण जाणत नाही. मग शेजाऱ्यांची चिठी येते – 'रेडिओचा आवाज कृपा करून कमी करा. बाळी आजारी आहे. दिनू अभ्यास करतो आहे.' सार्वजनिक वाहनांतून तुमच्या आवाजाचे ध्वनिक्षेप अैकतांना आजूबाजूचे प्रवासी काय कान बंद करून घेतील ? मुलींची जात मुळांतच वाचाळ समजली जाते. कलकलाट करणं हा तर आपला स्वभावधर्म ! चार मुली सहलींत अेकत्रित आल्या की मृदु भाषणाला 'गुडबाय् !'... मुक्या मुलींनाहि मग वाचा फुटते. मग हिंदी चित्रपट संगीताचं सांघिक गर्जना-गायन सुरू होतं. अशा वेळीं मात्र अितर प्रवाशांना कानांत बोटं घालून बसण्याची पाळी येते व शाळकरी विद्यार्थिनींबद्दल अेक प्रकारची घृणा निर्माण होते.

शेळ्यामेंढ्यांचा कळप अेखाद्या रस्त्यावरून गेला की त्या ठिकाणीं लेंड्यांची बरसात झालेली दिसून येते. त्याप्रमाणं विद्यार्थ्यांचे कळप सहलींत जात असतांना कागदांचे बोळे, फळांचीं सालपटं, बिया, शेव-चिवडा यांचा सडा सार्वजनिक वाहनांत व अितर सार्वजनिक स्थळीं दिसून येतो. हा देश आपला आहे, त्यांतील वाहनं आपलींच आहेत, तीं आपल्या घरांप्रमाणं स्वच्छ राखावीं असा आत्मभाव तुमच्यांत निर्माण व्हायला पाहिजे. ज्या देशांतील सार्वजनिक वाहनं, रस्ते, अुद्यानं अितकीं गलिच्छ असतात त्या देशांतील लोकांची राहणीसुद्धा गलिच्छच असली पाहिजे असं अेखाद्या परदेशी प्रवाशानं म्हटलं तर चूक होअील काय? किशोरी, तुम्ही शाळकरी मुलींनीच अशी स्वच्छतेची सवय आपल्याला लावून घेतली पाहिजे. जी मुलगी घरीं स्वच्छता, टापटीप ठेवण्यांत नेहमी तत्पर असते तिला सार्वजनिक स्वच्छता ठेवण्यांत व अितरांना तसं करू न देण्याची विनंती करण्यांत कमीपणा वाटणार नाही. सार्वजनिक अस्वच्छता हा आपल्यावरील कलंक आहे. त्याच्या निर्मूलनाची तयारी तुम्हीं मुलींनी करायला सुरवात केली की मोठीं माणसंहि तुम्हांला वचकून राहतील.

अैतिहासिक स्थळं, अिमारती, किल्ले, लेणीं, मंदिरं यांच्या सौंदर्याची हानि विद्यार्थ्यांच्या टोळ्यांकडून केली जाते; कारण अशा ठिकाणीं कोळशानं, खडूनं, चुन्यानं किंवा मातीनं आपलं नांव, पत्ता, वंश, शाळेचं नांव, पत्ता, आगमनाची – निर्वाणाची तारीख, वेळ यांचा तपशील लिहिण्यांत तुम्हां विद्यार्थ्यांना काय साधायचं असतं बरं! आपल्या पूर्वजांची कृति आचारतां आली नाही तरी स्मृति तरी जागृत ठेवणार की नाही तुमचा विद्यार्थीवर्ग?

सार्वजनिक वाहन हें सर्वांसाठी असतं. आपणच पाय पसरून चार माणसांची जागा अडविणं हा अप्पलपोटेपणा तर आहेच, पण गुन्हाहि आहे. प्रवासांत भर दिवसां आजाराचं, झोपेचं सोंग घेअून जागा अडविणाऱ्या मुलींची संख्या कांही थोडी नाही. या अशिष्टाचाराचं अुच्चाटन करण्याचं तुम्हींच मनावर घेतलं पाहिजे नि तेंहि याच काळांत. शालेय जीवनांतच सामाजिक व सार्वजनिक स्वच्छतेचं तुम्ही कंकण बांधलं पाहिजे, तशी सवय लावून घेतली पाहिजे.

अिंग्लंड-अमेरिकेंतील सार्वजनिक वाहनांतून जातांना शाळकरी मुलं-मुली प्रथम आपल्यापेक्षा वडील, पंगू, वृद्ध, अशक्त माणसांना बसायला जागा मिळाल्यानंतरच

आपण जागेवर बसतात; नाहीतर अुभ्याअुभ्याच प्रवास करतात. हींच मुलं आपल्या देशावर खरं प्रेम करतात म्हणायचीं. कारण देशांतील आबालवृद्धांना तीं कुटुंबवत् समजतात. आपल्याच देशांतील सार्वजनिक वाहनांत जागेसाठी तुमच्या त्या 'संगीत-खुर्ची'चा खेळ खेळावा लागतो.

आता चालण्याबद्दल म्हणशील तर किशोरी, ती हंसगति, ती मृगचपलता, ती गजगति ह्या सर्व गति काव्यग्रंथांत स्त्रियांच्या नांवांवर चिकटलेल्या दिसतात. तुम्ही मुली तर चालण्याची क्रिया न करतां घसरत जातां; आणि मग तुमच्या पायांतील जोड्यांच्या फसूफसू, सदासद्रा चपूचपू अशा आवाजानं रस्त्यांतील माणसं — अंगावर गाडीचं अॆंजिन आल्याप्रमाणं घाबरून आपोआप तुमच्या टोळीला मार्ग करून देतात. ज्याप्रमाणं अेकमेकींच्या खांद्यावर हात टाकून रेंगाळत जाणं म्हणजे चालण्याची क्रिया नव्हे, त्याचप्रमाणं अेकमेकींच्या अंगावर हात टाकून गोविंदा-गोपाळा करीत रस्ता अडवून चालण्याची क्रिया करतांना आपण गर्दीच्या रस्त्यांत अितर पादचाऱ्यांची कुचंबणा करीत आहों याचा तुम्हांला विसर पडतां कामा नये. आपण सार्वजनिक रस्त्यावर आहोंत, आपल्याप्रमाणंच अितरांचाहि त्या रस्त्यावर हक्क असतो हें तुम्ही विसरता कामा नये. पाय अुचलून चालण्यांत तरतरीतपणा, चापल्य दिसून येतं, मान अुंच राहते, कमरेची कृशता कायम राहते. चालणं हा अेक सर्वांगसुंदर व्यायामाचाच प्रकार समजायला हरकत नाही.

घरीं-दारीं-बाजारीं पुष्कळदा दोन किंवा अधिक माणसं समोरासमोरा अुभीं राहून बोलत असतात. वास्तविक त्यांनी असं करतांना रस्त्याच्या कडेला अुभं राहून अेक-मेकांशीं हितगुज केलं पाहिजे. पण अशा बोलत असलेल्या माणसांच्या मधून त्यांना न विचारतां आरपार जाणं हा शिष्टाचार नाही. त्यांना टाळून दुसऱ्या बाजूनं जाणं शक्यच नसेल तर, 'मी जाअूं का?' अशी परवानगी घेअूनच त्यांच्यामधून जाण्याचा शिष्टाचार दाखविला पाहिजे. घाअीगर्दीच्या वेळीं पुष्कळदा आपला धक्का कुणाला लागण्याचा संभव असतो, नव्हे लागतोहि; पण कुणालाहि धक्का मारण्याचा आपला हक्कच आहे अशा तोऱ्यांत पुढं जाणं हा शिष्टाचार नाही. 'क्षमा करा हं' म्हटल्यानं गुन्ह्याचं स्वरूप किती सौम्य होतं, बरं! तुमच्या विनम्रभावाचं कौतुकहि होतं.

अेखाद्याच्या घरांत शिरतांना आंत 'येअूं का?' असं विचारणं हा शिष्टाचार आहे. नाहीतर मूषकप्रवेश झाला. अुंदीर कधीं कुणाला विचारून आंत प्रवेश करतात का?

मराठी ग्रंथ सं... अनुक्रमांक 37... दि: ...
... नों. दि. ...

पण मग त्यांना काठीनं ढुसकावून टाकण्याची पाळी येते. तसं सुविद्य माणसांच्या बाबतींत होतां कामा नये. तुझी ती धसमुसळी कांता नाही का त्या दिवशीं तुला शोधीत थेट आंघोळीच्या खोलीपर्यंत– मधले सगळे टप्पे सोडून धावतच सुटली ! घरांत कुणी कांही खासगी व्यवहार करीत असतात, त्यांच्या अेकांतांत भंग – पूर्वसूचना न देतां करण्याचा आपल्याला काय अधिकार असतो ? पाश्चात्यांमधे अेक चांगली रीत आहे. पूर्वसूचने-वांचून जर कुणीं अेखाद्याचं दार ठोठावलं व तीन वेळां ठोठावूनहि जर तें अुघडलं गेलं नाही तर यजमानांना आपली गाठ घ्यायची अिच्छा नाही असं समजून पाहुण्यांनी खुशाल परत जावं ! आपल्याला भेटण्याअितकी यजमानांना सवड नाही, अिच्छा नाही, असं समजतांना कोणताहि दुराग्रह, राग मनांत बाळगला जात नाही. कुणाचीहि भेट घेणं झाल्यास ती त्यांच्या संमतीनंच घ्यायला हवी, नाही का ? अर्थात् आपल्याकडे असे कृत्रिम शिष्टाचार नसले – आणि नसावेहि – तरी त्यांतील तत्त्व ओळखून अेकमेकांच्या सोयी–गैरसोयींचा विचार करावयास आपण शिकलं पाहिजे.

सार्वजनिक ठिकाणीं कसं वसावं हीसुद्धा विचार करण्यासारखी गोष्ट आहे. घरीं तुम्ही कशाहि बसलांत तरी कुणी नांवं ठेवणार नाहीत. फार तर दम मिळेल; पण समाजांत, शाळेंतहि नीट बसण्याचा शिष्टाचार पाळला पाहिजे. खुर्चीसारख्या अुंच आसनावर बसल्यावर तंगड्या हालविणं अगर पाय वर घेऊन बसणं हा अेक अशिष्ट प्रकार आहे. अुंच आसन जुळतच नसेल तर जमिनीवर फतकल मारून बसलेलं काय वाअीट ? मुलींनी अुंच आसनावर किंवा कुठंहि बसतांना मांड्या जवळ घेअून बसण्याची सवय केली पाहिजे. तुमच्या शरिराची घडणच अशी आहे, की तसं बसण्याचा परिपाठ जर तुम्हीं ठेवला नाहीत तर तुमच्या नितंबाचा भाग भोपळ्यासारखा फुगेल व विशोभित होअील आणि मग तो कमी करण्यासाठी हुला-हुप् गाड्याची कसरत करावी लागेल तुम्हांला !

तुमच्या शाळांतून, सार्वजनिक अिमारतींतून अगर गर्दीच्या रस्त्यांवर पुष्कळदा तुम्हीं ‘ डाव्या हातानं चाला ’ असे फलक पाहिले असतील. येणाऱ्याजाणाऱ्या माणसांच्या टकरा चुकविण्यासाठी अाशा आज्ञा जागोजाग दिलेल्या असतात. त्यांचं पालन केवळ वरील स्थलांपुरतंच नसून जिथंजिथं अशी गर्दीघाअी संभवनीय असते अशा ठिकाणी त्यांचं पालन , विद्यार्थ्यांकडून व अितर सुविद्य माणसांकडून अपेक्षित असतं. पण आगगाडी, बस, ट्राम वगैरे वाहनं थांब्यावर आली की ‘ क्यू ’ चे नियम – म्हणजे

रांगांत राहण्याबद्दलचे सर्व नियम गुंडाळून ठेवलेले दिसतात. लहान मुलं, त्यांच्या माता, वृद्ध माणसं यांना ढकलून मागं टाकीत वाहनांत प्रवेश करून घेणं हा शुद्ध रानटीपणा आहे. सुधारलेल्या शहरांतील नागरिकांना तें लांछन आहे. विशेषत: तुमच्यासारख्या मुलींना आपल्या वागणुकीनं अितरांना धडा द्यावयास शिकलं पाहिजे.

घरांत बसून रस्त्यावर केर-कचरा, सालपटं, बोळे फेकणं हें ज्यांच्या अंगवळणीं पडलेलं असतं त्यांच्यापासून कोणत्या शिष्टाचाराची अपेक्षा करावी ? जें घरीं तें दारीं ! आपल्या सार्वजनिक वाहनांची, अुद्यानांची, फिरण्याच्या ठिकाणांची अवकळा तुमच्या पाहाण्यांत नाही का ? केरकचरा टाकण्याच्या टोपल्यांचं विराट स्वरूप तिथं पाहायला मिळतं. अितकं अस्वच्छ राहणाऱ्या लोकांना अितर देशांपुढं आपलं मस्तक अुंचावतां येअील काय ? स्वच्छता-मोहिमेंतला तुम्हीं आपला भाग अुचलण्याचं कर्तव्य पार पाडलं पाहिजे.

मला आठवतं, किशोरी, तुला वर्ग स्वच्छ ठेवण्याच्या चढाओढींत पहिलं बक्षीस मिळालं होतं. अस्वच्छतेचं अुच्चाटन असं प्रलोभनानं होत नसतं. स्वच्छता राखणं हा प्रत्येक व्यक्तीचा सहजधर्म असायला पाहिजे. त्यासाठी बक्षिसाची आवश्यकता नाही. लवकर अुठण्याबद्दल कोंबड्याला कोणी मानपत्र देतं ? सूर्याचा कुणीं सत्कार करतं ? लहानथोरांमधे स्वच्छतेची, निर्मलतेची व सौंदर्याची आवड अेकदा अुत्पन्न झाली म्हणजे मग रस्तोरस्तीं, सार्वजनिक स्थळीं, चित्रपटगृहांत, नाट्यमंदिरांत होणारं केरकचऱ्याचं अमंगळ दर्शन आपोआप थांबेल. स्वच्छतेंत मांगल्य आहे. तुमचं व्यक्तिगत सौंदर्य तुमच्या आजूबाजूला पसरलेल्या सौंदर्याच्या पार्श्वभूमीवरच अधिक अुठून दिसेल; आणि हें सर्व व्हायला, सौंदर्यदृष्टीची वाढ करायला तुम्हीं शिकलं पाहिजे. तुम्ही फक्त आपल्या शरीरसौंदर्याचा तेवढा विचार करतां. आपल्या देशांतील नुसते रेल्वेचे प्लॅटफॉर्म घेतले तरी आपल्या कमाल गलिच्छपणाची ते साक्ष देतील. प्रत्येक गाडी गेल्यावर ते झाडून स्वच्छ करण्यासाठी झाडूवाल्यांचं स्वतंत्र खातंच निर्माण करावं लागलं आहे रेल्वेला. लंडन, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, पॅरिस, बर्लिन यांसारखीं जगांतील प्रसिद्ध व वैभवसंपन्न शहरं अंतर्बाह्य सुंदर आहेत, तीं तेथील लोकांच्या सौंदर्यदृष्टीच्या आविष्कारानं. ' हात फिरे तिथे लक्ष्मी फिरे ' म्हणतात. ही म्हण व्यक्तीच्या जीवनांत तशीच समाजजीवनांतहि प्रभावी ठरणारी आहे. जिथं निर्मलता, जिथं मांगल्य तिथं कमला प्रसन्न !

किशोरी, तूं विचारशील, ‘ या साऱ्या सामाजिक दोषांचा रोख आम्हां मुलींकडे कसा पोचतो ? ’ पोचतो. तुम्हीहि समाजाचा अेक भागच आहांत. शिवाय कोणत्याहि सद्‌गुणांचीं, रीतरिवाजांचीं बीजं अंकुरित व्हायला किशोरावस्थेपेक्षा दुसरा चांगला काळ नाही. मनं अेकदा टणक झालीं की तीं कोणताहि संस्कार करून घेण्यास तयार नसतात. म्हणूनच समाजाची अपेक्षा तुमच्या कानीं घातली आहे. नवभारताच्या सौंदर्यनिर्मितींत तुमचा फार मोठा वांटा आहे.

• • •

प्रकरण १३ वें

तुमचं सौंदर्य-कपाट

" कुठं गेली होतीस किशोरी, अेवढा थाटमाट करून ? "

" कलेकडे. तिचा वाढदिवस होता. "

" पण हें कपाळावर चित्र कसलं ? दोन माडांसारखं कांहीतरी दिसतं ! "

" हें तर कांहीच नाही. बिन्दूनं काढलंय – कळस नि वर नारळ ! सिन्धूनं काढलंय – कढअी ! अिंदूनं काढलंय – आंब्याचं पान ! "

" पान की वृक्ष ? "

" अशी काय ग थट्टा करतेस ? "

" कां करूं नको ग थट्टा ? जें जें चित्रपटांत दिसतं तें तें तुमच्या कपाळांवर अुमटतं. तुमच्या विद्यार्थी-जीवनांत वास्तविक फॅशनचं चिंतन होअूं नये. आज अमुक प्रकारचं कुंकू लावलं, अुद्या कोणत्या नमुन्याचं लावूंया ? आज भागाकाराचीं तर अुद्या गुणाकाराचीं चिन्हं काढूं या कपाळावर असा विचार करायला तरी वेळ कुठं असतो या काळांत ! सूर्याच्या गतीबरोबर जशी सावली बदलते त्याप्रमाणं पडद्यावरील फॅशन समाजांत अुतरते असा अनुभव आहे. आणि तुमच्यासाठी जोंपर्यंत वेगळे चित्रपट काढले जाणार नाहीत तोंपर्यंत तुम्ही आपल्या मोठ्या ताअीमाअींचंच अनुकरण करीत राहणार ! पण अनुकरण करण्यास तरी वेळ कुठचा तुम्हांला ? बुद्धि-विकासाची तयारी या काळांतच करायची असते तुम्हांला. भरपूर अभ्यास करायचा असतो. "

आणि अभ्यास म्हणजे तरी काय ? त्यासंबंधी संस्कृतमधे अेक वचन आहे —

यः पठति लिखति पश्यति परिपृच्छति पण्डितानुपासयति । तस्य दिवाकरकिरणैर्नलिनी-दलमिव विकासयेत् बुद्धिः ॥ — जो स्वतः अभ्यास करतो, लिहितो, निरीक्षण करतो, चर्चा करतो, विद्वानांची अुपासना करतो त्यांची बुद्धि, सूर्याच्या किरणांनी कमलं जशीं विकसित होतात, तशी विकसित होते, वाढते. अभ्यासाचीं हीं पंचांगं पाळून बाह्य सौंदर्यसाधनेकडे कसं लक्ष देतां येअील तुम्हांला ? साधेपणा अंगीं बाणावा, पोषाखाच्या अवांतर गोष्टींकडे लक्ष जाअू नये, अभ्यासाकडेच लक्ष केंद्रित व्हावं, म्हणून अलीकडे शाळांतून गणवेषाची योजना झाली आहे, ती योग्यच आहे. या गणवेषाच्या पद्धतींत सर्वांचाच पोषाख सारखा ! कोण कुणाचा हेवा करील, तुच्छ लेखील ? गरिबीमुळं कुणाला खंत वाटेल ? श्रीमंतीचा टेंभा मिरवायला कुणाला संधि मिळेल ?

सुनंदा अेका मध्यम स्थितींतल्या आअीबापांची मुलगी. तिच्या वर्गांतील अेक श्रीमंत मुलगी मंदाकिनी नेहमीच जाळीच्या मखमलीचं पोलकं घालून शाळेंत यायची. हिरवे, निळे, किरमिजी — नाना प्रकारचे रंग तिच्या पोलक्यांचे ! सुनंदेला तिचा हेवा वाटे, खंत वाटे. ती वर्गांत घुम्यासारखी बसायची, कुणाशीं बोलायची नाही, खेळायची नाही, घरीं जेवायची नाही, मुसमुसत रटरटत असायची सदा अेखाद्या ज्वालामुखीप्रमाणं. कारण सांगायची नाही. अेक दिवस या ज्वालामुखीचा स्फोट झाला ! तिची आअी शाळेंत आली धापा टाकीत. “कोणती मुलगी मखमलीचीं पोलकीं घालते हो ?” पहिल्या पायरीवरून ती चौकशी करूं लागली.

सुनंदेनं तशाच पोलक्याचा हट्ट घेतला होता म्हणे ! आणि जर तिला तसं पोलकं शिवून दिलं नाही तर ती अंथरूण धरील अशी तिला भीति वाटत होती. औषधांत पैसा घालण्यापेक्षा कपड्यांत घातलेला बरा असं त्या माअुलीला वाटत होतं. सुनंदे-सारख्या कित्येक आक्रस्तळ्या मुली शाळाशाळांतून पाहावयास सापडतात. शाळेंतील गणवेषांची अुत्पत्ति अशा घटनांमुळंच झालेली आहे व ती हितकारकहि आहे. शालेय जीवन निर्मळ ठेवणं हें अेक व्रत समजलं पाहिजे. आपला गणवेश अत्यंत स्वच्छ ठेवणं, त्या वेषाबद्दल म्हणजे आपल्या शिक्षणसंस्थेबद्दल अभिमान बाळगणं हें तुमचं कर्तव्य ठरतं. पण होत तें निराळंच ! आपल्या देशाचा अभिमान दाखवितांदाखवितां जागतिक युद्धंहि जशीं पेटतात तसंच मुलीमुलींत आपापल्या गवेषाच्या अभिमानाचं पर्यवसान कित्येक वेळां भांडणांत झालेलं दिसून येतं.

वासंतीच्या शुभ्र गणवेषाला पाहून शेवंती तिला डिवचते, " अे हे ! काय पण पांढरा बगळा ! "

" बरं बरं ! तपकिरी बेडकीपेक्षा बरा ! "

" थांव, बेडकी म्हणतेस मला ? बाअींना सांगेन तुझ्या. "

" जा सांग. बेडकीची डरॉव बगळा अैकत नसतो ! "

" पोटांत गेल्यावर चांगलं येतं अैकूं ! "

आणि मग कधीकधी नापास झालेली बेडकी जाते बगळ्याच्या शाळेंत नि शुभ्र वेषांत ताठ मान करून वावरते.

अशी अेकमेकींचा धिक्कार करण्याची वृत्तीच तुमच्यांत अुद्भवतां कामा नये. दुसऱ्याच्या कुचेष्टेवर अुभारलेला अभिमान फार हलक्या प्रतीचा समजला जातो. निष्कपटी मन, अमूप अुत्साह, निमळ आनंद हीं तुमच्या वयाचीं ठळक वैशिष्टयं ! तें वय क्षुल्लक हेव्यादाव्यानं गढूळ होतां कामा नये. मोठ्या मुली अमुकतमुक करतात, असातसा पोषाख करतात म्हणून तुम्हीं त्यांचं अनुकरण करणं शोभणार नाही. तुमचं हें वय शरीराची सेवा करून जीवनाचे पुढले टप्पे यशस्वी करण्यासाठी आहे. तारुण्यांतील सुख, शृंगार आताच अनुभवण्याचा अुद्योग करीत बसलांत की भर तारुण्यांतच पिकाअू केसांच्या, थलथलीत शरीराच्या, वाऱ्यावर वाकणाऱ्या वृद्धा बनाल !

फशनचं अनुकरण करण्याकडे मुलींची अधिक प्रवृत्ति असते. डोकं खर्चायला नको, कांही नको. अेकीनं काळ्या कापडाचा पोलका घातला की तोच सर्वांच्या अंगावर ! भडकपणा हें आमच्यातुमच्या वेषभूषेंतील वैशिष्टय आहे. काळाकुट्ट, लालचुटुक, हिरवागार, पिवळाधमक या रंगांचं आकर्षण हल्ली अधिक प्रमाणांत तुम्हां मुलींत दिसून येतं. याचं कारण विचारलं तर तुम्हांला सांगतां यायचं नाही. रंगांचे कांही गुणधर्म असतात. काळा रंग अूष्णता निर्माण करती म्हणून थंड प्रदेशांतील लोकांत काळ्या कपड्यांचा वापर अधिक असतो. पण काळा रंग म्हणजे औदासिन्य ! पाश्चात्य देशांच्या धुरकट-भुरकट हवामानाच्या पार्श्वभूमीवर तो शोभतहि असेल ! पण सूर्यप्रकाशानं नेहमीच अुजळ-लेल्या देशांत तें ग्रहण कशाला ? शिवाय तुमच्या किशोरीजीवनाच्या सुप्रसन्न व अुत्साही वातावरणांत नानाविध रंगांच्या पुष्पाकृति — चित्रविचित्र भ्रमराकृति ज्यांवर चित्रित आहेत अशा वस्त्रांचा वास्तविक तुम्हांला मोह पडला पाहिजे — मग तुम्ही साडी नेसा की स्कर्ट नेसा. तुम्ही फुलांवर प्रेम करतां तें फक्त केसांचं भूषण म्हणून !

जपानी मुलींचं पुष्पसृष्टीवरील प्रेम त्यांच्या वेषभूषेंतहि दिसून येतं. पोषाखांत विविधता असावी. फॅशन करायचीच तर ती स्वतः निर्माण करावी. छापील व भाडोत्री असूं नये. पण जिकडेतिकडे पाहाव्या तों अेक छापाच्या मुली! तुमची आवडनिवड, तुमचं वैशिष्ट्य, तुमचा स्वभाव पोषाखांतूनच प्रथम व्यक्त होतो. कपड्यांवरून माणसाची परीक्षा होत असते; त्याची कलासक्ति व अभिरुचि कळते.

कपडे कशाहि रंगाचे घाला; पण कपड्यांचं कार्य सुधारलेल्या समाजांत कशा प्रकारचं आहे तें नीट ध्यानांत घ्या. मर्यादा हा स्त्रियांचा अेक फार मोठा अलंकार आहे. कोणत्याहि रत्नशाळेंत तो विकत मिळायचा नाही. निसर्गानं तो स्त्रियांनाच तेवढा बहाल केला आहे. मागील पिढ्यांतील स्त्रियांनी – मुलींनी या अलंकाराची जोपासना केली आहे व तो विश्वासानं आता तुमच्या हवालीं केला आहे. संस्कृतीचं हें वाण आता तुम्हीं संभाळलं पाहिजे. पोषाखाच्या बऱ्यावाअीट सवयी – कळत नकळत याच वयांत जडण्याचा संभव असतो. तुमच्या आअीनं जर या विषयावर विचार केला असेल तर ती तुम्हाला चागलं मार्गदर्शन करील. पण तुम्हांला वाटत असतं, की आअीला काय कळतंय् या बाबतींत! आपण मोठ्या आहोंत. आपल्या अमुकतमुक मैत्रिणी अशाच पोषाख करतात, आपण कां करूं नये?

पोषाखांत गरिबी दिसली तरी चालेल, पण छचोरपणा नसावा. आपल्याकडे अितरांचं लक्ष वेधावं म्हणून कित्येक मुली भडक पोषाख करतात. रंगीबेरंगी कपडे, ओठाला रंग, नखांना रंग, भुवयांना कातर या सर्वांचाच देखावा करीत असतात. पण देखावाच तो! प्रेक्षकांना फार वेळ तो पाहायला जमत नाही. आणि तुमच्या वयांत येण्याच्या ह्या कालांत हें प्रदर्शन नेमकं टाळायचं असतं. दुष्ट व समाजकंटक लोकांच्या विषारी नजरेपासून तुम्हांला संरक्षणाची जरुरी असते, म्हणून आपल्या आवडीनिवडीचा अतिरेक होअूं दिला नाही तर असं संरक्षण आपोआप मिळतं. छचोर पोषाखामागं चंचल मन असतं याची चाहूल दुष्ट लोकांना असतेच. मग ते अशा मुलींचा मागोवा घेतात, तिची ओळख करून घेतात, भेटी देतात आणि पुढले टप्पे तुम्हांला माहीत आहेतच! असा हा पोषाखाचा प्रश्न स्वतःचाच असला तरी त्याचे संबंध अितरांशींहि निगडीत झालेले असतात.

आपण असतों त्यापेक्षा अधिक आकर्षक दिसावं असं प्रत्येक मुलीला वाटतं. त्यांत गैर कांही नाही. पण टिकाअू सौंदर्यापेक्षा दिखाअू सौंदर्याकडे तुम्हां मुलींची दृष्टि

वळलेली दिसते. म्हणूनच विकाअू, कृत्रिम सौंदर्यसाधनांना हल्ली अूत आलेला दिसतो. कुंकवांचे नाना प्रकारांचे ठसे, नाना रंगांच्या पावडरी, स्नो, काजळ, ओठांचे-नखांचे रंग,- रिबिनी व रिबीनी नांवाच्या जुन्या लवतरांच्या चिंध्या, केसांचे चिमटे—तुम्ही क्लिपा म्हणतां त्यांना—आणि—? पण पुरे ही यादी! मला वाटतं, शालेय शिक्षणापेक्षा या सौंदर्यसाधनांवरच अधिक खर्च करावा लागत असावा तुमच्या पालकांना! शाळेंत नेमलेल्या पुस्तकांवांचून येणाऱ्या मुली सापडतील अेक वेळ, पण चार चिमटे, रिबिनी, वर फुलांच्या माळा यांवांचून मुली सापडणार नाहीत. हल्ली केसहि मोठे लबाड झालेले आहेत! क्लिपांच्या धाकाखेरीज ते जागेवर बसतच नाहीत!

आता सौंदर्यसाधनांचा विचार करावायचा म्हणजे केसांपासून नखापर्यंत विचार केला पाहिजे. पण सौंदर्य म्हणजे तरी काय हें कळल्याखेरीज त्याचा विचार कसा करतां येअील? सौंदर्य म्हणजे काय अेक गोष्ट आहे? अनेक गोष्टींचा मेळ बसल्यानं, प्रमाण साधल्यानं सौंदर्य निर्माण होतं. चेहऱ्याचं सौंदर्य म्हटलं तरी त्यांत केस, डोळे, भुवया, कपाळ, नाक, नाकपुड्या, हनुवटी, ओठ, गाल, कान या सर्वांची प्रमाणबद्धता आलीच. बाकीच्या शरीरांतील हात, पाय, खांदे, अुरोभाग, नितंब, मांड्या, पोटऱ्या या सर्वांचं अुंचीशीं प्रमाण, शरीराची कान्ति या सर्व अिंद्रियांचा समावेश सौंदर्याचा विचार करतांना झाला पाहिजे. कारण अवयवसाम्यता हें सौंदर्याचं मुख्य लक्षण समजलं जातं. दोन कान, दोन डोळे, दोन गाल, दोन नाकपुड्या, दोन भुवया, दोन खांदे, दोन हात, दोन पाय यांचा सारखेपणा म्हणजेच अवयवसाम्यता. या गोष्टी अर्थात् निसर्गानं दिलेल्या असतात. त्यांतील सौंदर्य कायम ठेवणं म्हणजेच सौंदर्य वाढविणं.

आता केशभूषेबद्दलच जर विचार करायचा झाला तर तुमची केशरचना सुटसुटीत व तुमच्या दैनंदिन कार्यक्रमांत थोड्या वेळांत साधेल अशीच असावी. सध्या घोड्याच्या म्हणण्यापेक्षा तट्टाच्या शेपटीसारखी—'पोनी टेल' नांवाची केशरचना प्रचारांत आली आहे. ती मुलींना खूप आवडली आहे असं दिसतं. अनेक बऱ्यावाअीट रूपांत तिचा प्रसार मुलींच्या केशरचनेंत झालेला दिसतो. अजंठा पद्धतीची केशरचना व त्याबरोबर तीवरील दागदागिन्यांचा साज हें केशभूषेचं आधुनिक अंग बनूं पाहात आहे. त्या कितीहि सुंदर रचना असल्या तरी तुमच्या किशोरी-जीवनांत त्या बसूं शकत नाहीत. रिकाम्या बायका, नर्तिका, नटी यांच्यासाठी त्या राखून ठेवणं

बरं ! पक्वान्नासारखा अेखाद्या सणावारी त्यांचा अुपयोग तुम्हांला करतां येअीलहि. दोन खांद्यांवर नागिणीप्रमाणं रुळणाऱ्या दोन सरळ किंवा दुमडलेल्या तीन पेडी वेण्या हीच तुमची केशभूषा ! नको साजशृंगार ! अेका कानशिलावर फुलांची वेणी पुरे ! पण मला वाटतं, फुलांची वेणी, गजरा माळण्याचा षोक असेल तर अेकच वेणी अूर्फ शेपटा पाठीवर रुळलेला बरा !

केशरचना चेहऱ्याच्या आकाराप्रमाणं करायची असते. आपल्या चेहऱ्याचा प्रकार कोणता आहे – अुभा, लांबट, रुंद, वसका की वाटोळा-गरगरीत हें पाहूनच मग केसांची अुभी, आडवी, तिरकस बांधणी करायची असते. पुष्कळ मुलींना कुरळे केस आवडतात. नवीन शास्त्रीय सौंदर्यसाधनांत कुरळे केस करण्याचीहि योजना आहे; पण हे सगळे शोध गरिबांपर्यंत पोचत नाहीत. ते श्रीमंतांचीं खेळणीं असतात. केस कायमचे कुरळे करावयास दीडशे ते अडीचशे रुपये खर्च लागतो. तुमचं अेखाद्या वर्षाचं महाविद्यालयीन शिक्षण सहज होण्यासारखं आहे या रकमेंतून. शिवाय केस कायमचे कुरळे असे कधीच राहात नाहीत. नळींत घेतलेलं कुत्र्याचं शेपूट तें ! केस कुरळे करण्याचे घरगुती अुपाय कितीतरी सुलभ व बिनखर्चाचे असतात. पण त्यांचा ध्यास या वयांत नसावा.

तोंडावरील डाग, व्रण काढून टाकण्यासाठी डॉक्टरकडे पहिल्या बैठकीला तीनशे चारशे रुपये ओतावे लागतात व पुढील बैठकीला किती लागतील हें सांगतां येत नाही. याचप्रमाणं पापण्यांच्या केसपट्ट्या; भुवया अुपटण्याचे चिमटे, ओष्ठशलाका, नखांचे रंग – कृत्रिम सौंदर्यप्रसाधनांचीं हीं नमुन्यादाखल कांही नांवं दिलीं आहेत. हें भाडोत्री सौंदर्य दुरून ठीक दिसतं, पण जवळून असे नमुने पाहतांना डोळे गप्पकन् मिटून घेण्याची पाळी येते. पुष्कळदा जाहिरातींनी तुम्ही फसतां. अमक्यातमक्या नटीची त्वचा अमुकतमुक साबण वापरल्यानं मखमलीसारखी मृदु झाली असं वाचल्यावर तुम्हांलाहि वाटतं, की आपणहि हाच साबण वापरावा. तशाच गोरं होण्याच्या जाहिराती असतात. शाअीच्या रंगाची बाअी तीन हप्त्यांत कागदासारखी पांढऱ्या रंगाची होते म्हणे ! तुमच्यांतील श्यामवर्ण मुलींना मोह पडतो अशा वेळीं ! पण विचारशील लोक जाहिरातींना फसत नाहीत. आपल्या ह्या काळ्या देशांत गोरं होण्याची तरी महत्त्वाकांक्षा आपण कां धरावी ? महत्त्वाकांक्षा धरायचीच तर कान्तिमान होण्याची धरावी. वर्ण व कान्ति ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. निसर्ग आपल्याला

वर्ण देतो, पण कान्ति प्रयत्नानं मिळवितां येते. भारतीय सौंदर्यशास्त्राप्रमाणं आपल्याकडील गौरवर्ण केतकीसारखा पिवळसर असावा लागतो; चुन्यासारखा पांढराफटफटीत नाही. वर्ण कसाहि असला तरी कान्ति पिकलेल्या लिंबासारखी रसरशीत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्हांला भारतासारख्या अूष्ण देशांत गौरवर्ण होण्याची लालसा अुत्पन्न होते तर श्वेतदेशीय गौरांगना सूर्यकिरणांचं स्नान करीत तांबूस होण्याचा अुद्योग करीत असतात! ज्याला जें दुराराध्य तेंच मिळविण्यासाठी मानव धडपडत असतो हेंच खरं!

भारतीय सौंदर्यसाधनांत हळदीला फार महत्त्व आहे. सुंदर स्त्रीला हळदीच्या वर्णाची म्हणजे वरवर्णिनी म्हणतात. दूध – हळद, मलई – हळद, लिंबाचा रस – हळद, हरभऱ्याचं पीठ – हळद यांचं मिश्रण चेहऱ्याची कान्ति निःसंशय वाढवितं. रात्रीं झोपण्यापूर्वी हें मिश्रण तोंडाला लावल्यास तोंडावरील तारुण्यपीटिका – मुरुम नाहीसे होतात. रसरशीत कांतीसाठी आंबट लिंबाचा रस, पांढरं ग्लिसरिन, या सर्वांचं समभाग मिश्रण व सुगंधासाठी कोलन वॉटरचा अेखादा थेंब झोपण्यापूर्वी जर तुम्हीं नियमानं चेहऱ्याला लावलांत तर अुजळलेला तुमचा चेहरा तुम्हालाच ओळखतां येणार नाही. तुमच्यापकीं कित्येकांची त्वचा कोरडी असते; तिला साबण सहन होत नाही. साबणानं तोंड धुतांना पंचवीस टक्के तेल कमी होतं. शरीरांतील तेल राखून ठेवलं नाही तर सुरकुत्याचं जाळं अकालीं तोंडावर पसरेल.

पापण्यांना भरपूर केस हवेत ना? मग मधूनमधून कॅस्टर तेलाचा हात फिरवा त्यांवर! नखं मात्र वाढवूं नका. नखं वाढविणं म्हणजे रानटी अवस्थेंत पुन्हा प्रवेश करण्यासारखं आहे. आदि मानवाच्या अंगावरील दाट केस व तीक्ष्ण नखं संस्कृतीच्या कालौघांत नाहीशीं झालेलीं आढळतात. त्यांचा पुनरुद्धार कशाला?

दागदागिन्यांचा प्रश्नहि असाच आहे. तुमच्या वयांतील मुलींनी फारसे दागदागिने घालूंच नयेत. ते संभाळण्याचं सामर्थ्य जोंपर्यंत तुमच्यांत नाही – आणि या वयांत तें नसतंच – तोंपर्यंत दागिन्यांच्या वाटेला तुम्हीं न गेलेलंच बरं! अलीकडे बांगड्या न घालण्याची प्रवृत्ति वाढत आहे तुमच्यांत, ती कां? याचं अुत्तर मात्र कोणत्याच मुलीला देतां येत नाही.

अंजलीला विचारलं, “ कां ग, बांगड्या कां नाही घालीत? ”

ती म्हणते, “ मुलं कुठं घालतात? ”

“ मुलांच्या ओठांवर मिशी फुटते– तुम्हांलाहि ती यावी असं वाटतं का! ” असं विचारतांच मात्र अंजलि किंचाळते, “ शीः शीः – अय्या! ”

याच्याअुलट कांही मुली अेकेका हातांत झनझन बांगड्यांचं वेटोळं गुंडाळतात व आपले डौलदार हात झाकून टाकतात.

हातांत बांगड्या वाजल्या नाहीत तरी कानांत डूल हालविण्याची अिच्छा प्रत्येक मुलीला असतेच. अिच्छा असली तरी आपल्या चेहऱ्याच्या आकाराला शोभतील असेच डूल वापरले पाहिजेत तुम्हीं. लांबट चेहऱ्याच्या मुलीला खांद्यापर्यंत पोचणारे लोंबते डूल विशोभित दिसतात हें तुम्हीं पाहिलं आहे काय ? अशा मुलींनी वर्तुळाकार पण आखूड डूल वापरावेत. अुलट, वाटोळ्या, गरगरीत चेहऱ्याच्या मुलींनी बटनासारखे वाटोळे बटबटीत डूल वापरूं नयेत. पण कोणत्याहि मुलीला कानाच्या पाळीलगत चंद्रकोरीप्रमाणं लोंबणारे डूल शोभतात.

किशोरी, कृत्रिम सौंदर्यसाधनं वापरणं तुमच्या आटोक्यांतील नाही. तीं तुमच्या भावी जीवनासाठी वाटल्यास राखून ठेवा. पण तुमच्या सध्याच्या काळांत तुम्हांला मिळालेल्या सौंदर्याचं जतन करतां येअील. त्यासाठी तुम्हीं कांही पथ्यं मात्र नियमानं पाळलीं पाहिजेत.

(१) चेहऱ्याची जशी काळजी घेतां तशी मानेची घ्या. (२) अुजळ वर्ण, मृदु, त्वचा, तेजस्वी कांति व तोंडावरील मुरूम यांसाठी वर सांगितल्यापैकी अेखादं मिश्रण दररोज झोपण्यापूर्वी वापरा. (३) झोपतांना केसांवर पुन्हा फणी फिरवा. (४) नखं वाढविण्यापेक्षा नखांतील वाढलेलं मांस काढण्यासाठी व नखं स्वच्छ ठेवण्यासाठी आठवड्यांतून अेकदा गरम पाण्यांत साबण मिसळून तें मिश्रण काडीला कापूस लावून नखांत फिरवा. (५) रक्ताभिसरणासाठी टॉवेलनं शरीर खसखसून घासा. (६) दररोज फिरावयास जाण्यास विसरूं नका. अभ्यासाची सबब खोटी असते. (७) फिरावयास जातांना खांदे, पाठ, छाती, हनुवटी ताठ ठेवून चाला. (८) ताठ चालण्याची सवय लागावी म्हणून घरांतच डोकीवर पुस्तक ठेवून (हात न लावतां) पांच मिनिटं चाला. (९) अेक दिवसाआड वाकण्याचा, हातपाय पसरण्याचा व्यायाम दहा ते पंधरा मिनिटं कराच. (१०) दररोज दहा तास तरी नियमित झोप घ्या. लवकर झोपणं व लवकर अुठणं हा सुवर्ण-नेम तुमच्या परिचयाचा आहेच !

मला अेवढंच सांगायचंय किशोरी, की तुमच्या जीवनाच्या ह्या महत्त्वाच्या कालखंडांत भाडोत्री सौंदर्यसाधनांची काय आवश्यकता ? किती बहारीचा हा काळ ! विद्यार्जनाचा, निर्व्याजतेचा ! गुलाबपुष्पांनी तुमच्यापासून टवटवीतपणा घ्यावा. जाअी-

जुअींनीं नाजुकतेची तुमच्याकडे याचना करावी ! भ्रमरांनी तुमचा मंजु निनाद अुचलावा ! पाखरांनी तुमच्या शालेय जीवनाचा हेवा करावा ! काय कमी आहे तुम्हांला किशोरी ? तुम्हीच सर्वांची भूषा आहांत—आपल्या आअीबापांची, आपल्या शिक्षण-संस्थांची, आपल्या समाजाची तुम्हीच भूषा आहांत. कोणत्याहि भूषेचा अधिक विचार न करतां अंगभर साधं पण स्वच्छ वस्त्र, पोटाची वळी, पाठीची नळी व वक्ष-स्थळांचीं वर्तुळं न दिसतील अितपत पोलकं, पुनःपुन्हा न तुटणाऱ्या चपला, स्वच्छ रुमालाचं अेक पटकुर—अेवढा साधा पोषाख तुमची दररोजची गरज भागवील, नाही का ?

साधेपणांतहि सौंदर्य कसं व्यक्त करतां येअील याचाच विचार तुम्हीं करायला शिकलं पाहिजे. आणि मग तुमच्या सौंदर्य-कपाटांत शीलाचीं साधीं वस्त्रं, विचारांचा आरसा, मंजुभाषणाची ओष्ठशलाका, प्रेमळपणाचं अंजन, व्यायामाचा स्नो, मधु-स्मिताची गुलाबी पावडर, सद्वर्तनाचे दागदागिने, अेवढी सामग्री असली तरी ती तुम्हांला तुमच्या भावी आयुष्यांत खचित पुरून अुरेल. तुमचं हें चित्र सर्वांना मोह-वील. ह्याच तुमचा शृंगार ! हेंच तुमचं सौंदर्य ! !

• • •

प्रकरण १४ वें

तुम्ही कोणतं व्रत पाळणार?

"इश्श! मला तुमचीं तीं व्रतंबितं कांही करायचीं नाहीत हो आओी!"

"नको करूंस. पण असा त्रागा कां करतेस, किशोरी? जुनाट, निकामीं, बुरसटलेलीं व्रतं नको करूंस; पण व्रतंच करायचीं नाहीत असं कसं म्हणतां येअील तुला? आपल्या संस्कृतींत व्रतनियमांना फार महत्त्व आहे. कालमनाप्रमाणं व्रतांचे विषय बदलले असले तरी व्रत-नेम कायमच राहणार आहेत हो! व्रत कोणतंहि असो, तें पाळण्यांत मनाची शक्ति वाढते, कार्यक्षमता वाढते. बंधनांत राहण्याची सवय लागते. तसं पाहिलं तर सारी सृष्टीच – पृथ्वी, ग्रहमाला, सूर्यचंद्र, सारे कांही विशिष्ट नियमांनी बांधलेले दिसतात. आपापल्या कर्तृत्वाला घालून दिलेली मर्यादा सोडून जर आपण वागूं लागलों तर जगांत गोंधळ माजेल! ग्रहमालेनं पृथ्वीतलावर सहल काढण्याचं ठरविलं, सागरानं आकाशारोहण करायचं मनांत आणलं, पर्वतांनी विमानासारखं उडायचं ठरविलं – तर? प्रत्येक धर्मांत व्रतं असतात. मनाचं सामर्थ्य वाढवायला व्रतांची जरुरी असते.

धर्म कोठलाहि असो. आणि अेका धर्मांतहि वेगवेगळं तत्त्वज्ञान असणारीं माणसं असतात. कांही माणसं कोणताहि धर्म मानीत नाहीत, देव मानीत नाहीत; पण जीवनांत कांहीतरी विवक्षित असं त्यांचं तत्त्वज्ञान असतंच. विश्व व मानवजात ह्यांच्या संबंधाविषयी त्यांच्या कांही कल्पना असतातच. तुम्ही वयांत येतांना तत्त्वा-तत्त्वांचं वैशिष्ट्य – विविधता मग तुमच्या लक्षांत हळूहळू येअूं लागते.

नुसत्या हिंदुधर्मापुरतं पाहिलं तरी अनेक पंथ, अनेक मतं दृष्टीस पडतात. जन्म, पुनर्जन्म, मृत्यु, स्वर्ग, नरक यांबद्दल अेकमत नसतं. कुणी अीश्वराचं अधिष्ठान आकाशांत तर कुणी हृदयांत मानतात. देव कृपाळू आहे असं कुणी म्हणतात व त्याच्या समदृष्टीची थोरवी गातात. जगांतील विषमता पाहून कुणी अीश्वरावर अन्यायीपणाचा आरोप करतात. अशा अनेक प्रकारच्या मतामतांचा गलबला अैकून तुम्हांला भांबावल्यासारखं वाटायला लागतं व तुमचं मन तुम्हांला विचारतं – " काय ग, तुझं तत्त्वज्ञान कोणतं ? – " आणि मग याच वयांत स्वतंत्र विचार करण्याची सवय तुम्हांला लागते. अशा वेळीं आअीबापांची मदत तुम्हांला झाली पाहिजे. आपल्या मुलांना कपडालत्ता व अन्नवस्त्र दिलं, त्यांच्या शारीरिक गरजा पुरविल्या की झालं, असं आअीबापांना वाटतां कामा नये. वरील गरजांबरोबरच मुलींच्या भावनात्मक व आत्मिक गरजांचीहि काळजी घ्यावयास पाहिजे. हल्लीच्या निधर्मी राज्यव्यवस्थेंत शाळांतून धार्मिक शिक्षणाला स्थान नाही, नीतिशिक्षणाला मज्जाव नाही. हिंदुधर्मात काय किंवा कोणत्याहि धर्मांत धर्म व नीति हातांत हात घालूनच राहिलीं पाहिजेत. अशा परिस्थितींत शाळेपेक्षा घरावरच ही जबाबदारी अधिक प्रमाणांत पडते. जीवनाच्या अुत्कृष्ट तत्त्वज्ञानाची ओळख आअीबापांनी आपल्या मुलींना या वयांतच करून दिली पाहिजे. तत्त्वज्ञान सांगून शिकवितां येत नाही. आअीबापांनी, मोठ्या माणसांनी तें प्रत्यक्ष आचरून दाखवायचं असतं. तुम्हीं तारुण्यांत पाअूल टाकलं, तुमची विचारशक्ति वाढीला लागली की मग आपल्या वडील माणसांनी मनावर ठसविलेलं तत्त्वज्ञान आपण पाळावयाचं की आपलं नवं असं तत्त्वज्ञान अनुसरायचं हें तुम्हींच ठरवायचं असतं. अशा परिस्थितींत आअीबापांनी शक्य तों मतभेदातीत असं सर्वमान्य व व्यवहारोपयोगी तत्त्वच मुलींपुढं ठेवावं. आपली संस्कृति म्हणजे तरी काय, याची माहिती मुलींना या वयांत करून दिली पाहिजे. भारतीय संस्कृति अशी होती, तशी होती, अशी नुसती पुस्तकी माहिती मिळवून न थांबतां, चालू घडीला ती व्यवहारांत कशी आचारतां येअील याचं ज्ञान मुलींना करून दिलं पाहिजे. आपल्या पूर्वजांच्या नांवावर आपण किती वर्षं जगणार ? आपणहि नवीन युगाला अनुसरून नवसंस्कृति निर्माण केली पाहिजे, याची जाणीव मुलींमध्ये अुत्पन्न केली पाहिजे.

ज्या घरांत धर्माबद्दल आस्था दाखविली जाते, संस्कृतीचा आदर ठेवला जातो, त्या घरांत वाढलेल्या मुलीवर अुत्कृष्ट संस्कार होतात. जीं धर्मतत्त्वं आपलीं वडील माणसं मानतात, त्या धर्मतत्त्वांप्रमाणं तीं चालतात की नाही याचा देखावा मुलांच्या

समोर असतो. ज्या धर्मतत्त्वांमुळं घरांतील माणसांत प्रेम, सहानुभूति, क्षमाशीलता, परमेश्वरावर अचल निष्ठा या गोष्टी परिणामकारक रीतीनं दिसत असतील, तर मुलांना याच्यापेक्षा कांही वेगळं तत्त्वज्ञान पाळायची अिच्छा होअील असं वाटत नाही. यशस्वी जीवनाची गुरुकिल्लीच त्यांना अशा कुटुंबांत सापडलेली असते. पण पालक जेव्हा तत्त्वाच्या विरुद्ध वागतात, धर्माचं अवडंबर माजवून अधर्मानं वागतात, तेव्हा मुलांना तो अेक फार्स आहे, नक्कल आहे असंच वाटणार!

धर्म कोणताहि असो, माणसाची चकाकी अगर सुसंस्कृतता त्याच्या नेहमीच्या वागणुकीवरून दिसून येते. आपल्या संस्कृतींत धर्म व व्यवहार यांची अुत्तम सांगड घालून दिलेली आहे. दैनिक व्यवहारांतूनच सद्धर्माची प्रवृत्ति होते, म्हणून आपल्या संस्कृतींत दिवसाच्या कार्यक्रमाला महत्त्व आहे. त्यांतल्या कांही गोष्टींचं तुम्हां मुलींच्या जीवनांत फार महत्त्व आहे.

प्रभातकाळीं पक्ष्यांच्या किलबिलीन तुम्हीं जागं व्हावयास पाहिजे. याच वेळीं गायीला पान्हा फुटतो. म्हणून प्राचीन काळीं गायीचं दूध काढण्याची कामगिरी मुलींच्याकडे असे. घरोघर गायी— त्यांची सेवा, दोहन—घरांतील मुलींकडे; म्हणूनच मुलीला 'दुहिता'—दूध काढणारी म्हणून म्हणतात. प्रभातकाळीं पूर्व दिशेला तांबडं फुटतं, आपण त्याला अरुणोदय म्हणतों. सर्व सृष्टीला जिवंतपणा याच मंगल कालांत येतो म्हणून मानवांनीहि त्यांत भाग घेतला पाहिजे. प्रातःस्मरणाचे श्लोक, भूपाळ्या यांच्या पाठांतरानं स्मरणशक्तीला व्यायाम मिळतो. अलीकडे तुमचं पाठांतर शून्यावर आलं आहे. दररोज सकाळीं अशा पाठांतराची सवय ठेवली पाहिजे. देवाला (घरांत असेल तर) नाहीतर आअीबाप यांना देव समजून वंदन, आपल्याला माननीय अशा गुरूचं स्मरण यांचं महत्त्व प्रातःकालीन कृत्यांत फार मानलं आहे. अितर धर्मांप्रमाणं प्रार्थनेचं अुत्तर मिळतंच मिळतं असा साधुसंतांचा व थोर व्यक्तींचा अनुभव आहे. चांगल्या पुस्तकांचं वाचन, शाळेचा अभ्यास, भोजन, झोप यांचा समावेशहि नित्यक्रमांत योजावयाचा असतो. नियमितपणा ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. आहारांत, झोपेंत तर नियमितपणा असावा लागतोच, पण अभ्यासांत जर तो तसा नसेल तर परीक्षेंत खात्रीचं यश मिळणार नाही.

"क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्। क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम्।" हें सुभाषित तुम्हांला माहीत आहे ना? क्षणक्षण अभ्यास करून, म्हणजे नियमित

अभ्यास करूनच विद्या मिळवतां येते व पैशापैशाचा संचय करूनच धन वाढतं. वडील मंडळींच्या मदतीनं व आपल्या आवडीप्रममाणं आपली दिनचर्या आखून आयुष्याला वळण लावायचं असतं. तें याच वयांत.

जगांत अनेक धर्म आहेत. येशू ख्रिस्ताचा ख्रिस्ती धर्म, महंमद पैगंबराचा अिस्लाम धर्म, झरतुष्ट्राचा पारशी धर्म, गौतमबुद्धाचा बौद्ध धर्म, गुरु नानकाचा शीख धर्म, महावीराचा जैन धर्म, हिंदूंचा वैदिक आर्य धर्म – या सर्वांत हिंदुधर्म प्राचीन धर्म आहे. धर्म कोणताहि असला तरी सर्व धर्मांची शिकवण अेकच. देव अेक आहे, त्यावर विश्वास ठेवा, असंच प्रत्येक धर्म सांगतो. आपल्या आर्य धर्मांत तर कोट्यवधि देव! " किती चमत्कारिक ? " तूं विचारशील. आपल्या धर्मांत देवपणाला पोचण्याची प्रत्येक मानवाला शक्यता आहे. देवकोटीला पोचलेला मानव असंच आपण रामा-विषयी म्हणतो. जितके मानव तितके सर्व देवकोटीला पोचले पाहिजेत ही धर्मांची अपेक्षा आहे, हें लक्षांत आणलं तर हिंदूंच्या देवांची संख्या कोट्यवधि कां याचं अुत्तर मिळतं.

मन ताब्यांत ठेवा, चांगले विचार करा, सर्वांवर प्रेम करा, आचरण शुद्ध ठेवा व अमृतवाणीनं बोला ही प्रत्येक धर्मांची शिकवण आहे. प्रत्येक मुलीनं अितकी सोपी शिकवण आचरण्याचा जरी निश्चय केला तरी पुरे! हिंदुधर्मांची शिकवण वेद, स्मृति, पुराणं, अितिहास व गीता या ग्रंथांत सामावली आहे. साधुसंत व राष्ट्रीय थोर पुरुषांनी ती प्रत्यक्ष अंमलांत आणून दाखविली आहे. मोजक्याच शब्दांत ती सांगावयाची तर असं म्हणतां येअील, की स्वधर्मानं म्हणजे आपलीं कर्तव्यं करून वागा, देवावर विश्वास ठेवा, तुम्हांला जें कांही मिळेल तें परमेश्वराला अर्पण करा. प्राणिमात्रांवर दया करा, सत्य, प्रेम व क्षमा यांसारखे सत्त्वगुण मिळवा म्हणजे परमेश्वर तुमची सर्व प्रकारची काळजी घेअील. कोणी तरी समर्थ आपली काळजी घेणार या कल्पनेनं किती हलकं वाटतं! मनावरचं दडपण किती कमी होतं?

चांगल्या सवयी लावून, तुमच्या स्वभावाला वळण लावण्याची पूर्वतयारी याच काळांत करावी लागते आणि ती तुम्हांला अेकट्यानं करायची नसते. तुमच्या आअी-बापांनी व वडील माणसांनी तुम्हांला मदत केली पाहिजे. आअीबाप कसेहि वागत असले तरी आपल्या मुलांनी आपल्या आज्ञेंत राहावं, प्रेमानं, आदरानं वागावं, खरं बोलावं, अभ्यास करून नांवलौकिक मिळवावा असंच त्यांना वाटतं. धर्म व नीतीचे

संस्कार या वयांतच चिरस्थायी होतात. म्हणूनच चांगल्या पुस्तकांची व चांगल्या मित्रांची निवड आपल्या वडील माणसांच्या मार्गदर्शनानं तुम्हीं करायला पाहिजे. संस्कृतांत अेक सुभाषित आहे–" शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् " शरीर हेंच धर्माचं साधन आहे. शरीर निरोगी असल्यावांचून वर सांगितलेल्या धर्माचं योग्य प्रकारें पालन कसं होणार ?

निरोगी शरीरांत निरोगी मन राहातं. शरीराच्या नाजूकपणाविषयी अभिमान न बाळगतां शरीराच्या सामर्थ्याविषयी प्रेम व अभिमान वाटला पाहिजे. आपलीं पुराणं गोष्टीरूपानं कित्येक तत्त्वं आपल्यापुढं मांडतात. भीमानं शरीरसामर्थ्यानं कौरवांचा नाश केला, तर मारुतीनं राक्षसांचा संहार केला. बलाची अुपासना करा, असंच या कथा सांगतात. मग तुम्ही भीमाच्या नाहीतर मारुतीच्या देवळांत जा अगर जाअूं नका, त्याच्या तत्त्वांचं पलान करायला तुम्हीं शिकलं पाहिजे.श रीराच्या शक्तीवांचून पराक्रम नाही. या वयांतील तुमचा पराक्रम म्हणजे अुत्तम अभ्यास करणं. तो जर तुम्हांला शरीराच्या नबळेपणामुळं साधतां आला नाही तर तुम्हांला जीवन व्यर्थ वाटेल. अैन परीक्षेच्या वेळेला तुमचे डोळे बिघडतात, डोकंदुखी सुरू होते, अन्न जात नाही, थकवा येतो, परीक्षा हातची जाण्याचाहि संभव असतो. हें कशाचं लक्षण ?

शरीरसामर्थ्य मिळविण्यासाठी आपल्या धर्मांत आहाराचे कांही निर्बंध घातले आहेत ते खाद्य व पेय पदार्थांचे गुणदोष लक्षांत घेअूनच घातले आहेत. आरोग्याचा ह्या निर्बंधांशीं संबंध आहे. मोठ्या माणसांनी गुरुवारीं व शनिवारीं अेकदाच जेवावं, अेकादशीच्या दिवशीं निरशन म्हणजे कांहीहि न खातां राहावं – पण 'अेकादशी दुप्पट खाशी' ही म्हण आपण आधाशीपणें जो फराळ करतों त्यावरून पडली आहे. अन्नाला अमृत म्हणतात. कडकडीत भुकेनंतरच या अमृताची खरी गोडी कळते. पण अितकं थांबायला आपल्याला आपल्या धावपळीच्या दिनक्रमांत वेळ असतो कुठं ? मध्यान्हाच्या वेळीं भूक प्रदीप्त होत असते. शाळा, कॉलेज, कचेऱ्या या सर्वांचंच जेवणाच्या सुट्टीबद्दल अेकमत झाल्यास भुकेचं तत्त्वज्ञान अमलांत आणतां येअील. पचनेंद्रियांना विश्रांति मिळण्यासाठी अुपासांची योजना केलेली असते, आपण पाळीत नाही ही गोष्ट वेगळी !

धर्म आणि आरोग्य यांचा सुंदर समन्वय आपल्या शास्त्रज्ञांनी घालून दिलेला आहे. प्रभातकाळीं सूर्याची पूजा करण्यानं कोवळ्या किरणांचा लाभ आपल्यास होण्यासारखा असतो. नदी किंवा समुद्राचं स्नान सक्तीनं व्हावं म्हणून पर्वण्यांची योजना झालेली आहे. अष्टमीच्या दिवशीं गियारोहण करावं अशी आपल्या धर्माची आज्ञा आहे. या सर्व धर्माज्ञांचा संबंध सक्तीचा व्यायाय व्हावा म्हणूनच आहे.

शुद्ध आहार व मोकळ्या जागेंत विहार हीं तत्त्वं धर्माच्या नांवाखाली घातलीं नसतीं तर तीं लोकांनी पाळलींहि नसतीं. कारण आपल्या हिंदु समाजाचा पिंडच मुळी धार्मिक आहे.

शरीराप्रमाणंच मनाबद्दलहि आहे. मन फार चंचल असतं. मन हेंच माणसाच्या बंधनांचं किंवा मुक्ततेचं साधन असतं. तें क्षणभर स्थिर राहात नाही. अभ्यास करतांना तुम्हांला याचा अनुभव असेलच! औरंगजेबाचा अितिहास वाचायला घ्यावा तों मन जातं भरकटत रामशास्त्री चित्रपटाकडे! गणितांत तर पायरीपायरीला घसरतां! कविता पाठ करायला जावं तर चित्रपटांतलीं गाणींच तोंडीं येतात! किती गमतीदार मन! बिन पैशानं, बिन प्रवासानं हजारो मैलांवरून धावत असतं! असेल मन धावरं, पण त्याला अिच्छाशक्तीनं आटोक्यांत आणतां येतं. ज्या गोष्टींत तें रमतं तिथं तें स्थिर राहू शकतं— म्हणजे आपल्याला आवडणाऱ्या विषयाच्या बंधनांत तें सहज राहूं शकतं. मग मनाला स्थिर करायचं असेल तर आपल्या आवडीच्या विषयाचा अभ्यास करून मनाचं सामथ्य वाढवितां येतं. पौराणिक कालांतील भीम व अर्जुन हे वीरबंधु शरीराचं व मनाचं सामर्थ्य दाखवितात. अर्जुनाच्या मनाला दृढपणा आणायचं काम श्रीकृष्णाच्या अुपदेशानंच घडवून आणलं. राम तर देवकोटीला पोचलेला मानव! ज्याच्यावर आपण प्रेम करतों, त्याच्यासाठी त्याग करणं ह्या कसोटीला अुतरलेला तो पुरुष! त्याच्या मनाचं सामर्थ्य किती असेल बरं?

मीं तुला सांगितलंच आहे, की धर्माचा अर्थ व्यापक दृष्टीनं घ्यायचा म्हणजे कर्तव्य-कर्माचं पालन करायचं. धर्माच्या या व्याख्येनं तूं बुचकळ्यांत पडशील! म्हणशील— मी तर हिंदु धर्माची, हॅना ख्रिस्ती, शिरीन पारशी, जुबेदा मुसलमान! जन्मानं आपण आपल्या धर्माचं व कुटुंबाचं नांव धारण करतों. पण त्या कुटुंबाचं नांव अुज्ज्वल करणं हें आपलं कर्तव्य ठरतं. तसंच धर्माचंहि आहे. आपल्या धर्मातील अुच्च तत्त्वांचं पालन करणं हें आपलं कर्तव्यच ठरतं. आपल्या धर्माचं तत्त्वज्ञान अुपनिषद

नांवाच्या ग्रंथांत साठविलेलं आहे. त्यांतील अेका अुपनिषदांतील हा मंत्र पाहा— " मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथिदेवो भव। " हिंदूंच्या देवांची संख्या असंख्य कां तें कळलं ? या मंत्रांत आपल्या कर्तव्यपालनाची दिशा दाखविली आहे. अन्नदात्री भूमि, जन्मदात्री मातापिता, पितृवत् वाटणारीं माणसं, गुरु व अतिथि यांची सेवा करण्याचा हा केवढा महान् मंत्र या ल्हानशा सूत्रवचनांत सांगितला आहे! देव म्हणून या सर्वांची भक्ति करायची आहे! या सर्व माणसांतील देवत्व ओळखायला आपण स्वतः त्या पदापर्यंत पोचलं पाहिजे! व्यक्तित्वाच्या विकासाला केवढी मोठी संधि दिली आहे आपल्या धर्मानं ! अितरांतील व्यक्तित्वाला आदर दाखविणं व त्यांच्याबद्दल अभिमान बाळगणं या वृत्तीला हृदयाची विशालता लागते. स्वतः विशाल होअून विशाल जगाचा अभिमान बाळगण्यास शिकणं हीच आपली संस्कृति ! माणसाला अितकी अुंच अुडी मारतां आली नाही की मग लोक धर्मालाच नांवं ठेवतात. सुदैवानं आपल्या देशाचा अितिहास व संस्कृति तेजस्वी आहे.

वेद–अुपनिषदांची भूमि म्हणजे आपला देश. रामायण-महाभारतासारखे ग्रंथ म्हणजे आपल्या वाङ्मयाची गंगोत्री. त्याग, सेवा यांचं प्रत्यक्ष दर्शन म्हणजे आपले पूर्वज. या सर्वांच्या अुच्चतेनं आपलीहि मान अुंचावते ! पण आपल्या पूर्वजांच्या संस्कृतींत आपणहि सतत भर घालून संस्कृतीचा प्रवाह वाहता ठेवला पाहिजे. यासाठी प्रेम, सत्य व अहिंसा या त्रिगुणांची वाढ मनाच्या विकासाला पोषक आहे. प्रेमानं मन जिंकतां येतं; पण आपण मात्र प्रेमाची फार संकुचित व्याख्या करीत असतों. म्हणूनच जगांतील युद्धांचा शेवट होत नाही. प्रत्येकजण स्वतःच्या देशावर प्रेम करतांना अितरांना शत्रुस्थानीं मानतो. देशाभिमान हा गुण की अवगुण समजायचा—असं तूं विचारशील. आपल्या देशावर प्रेम करतांना अितरांचा द्वेष, मत्सर, हेवादावा केलाच पाहिजे असं नाही. प्रत्येकानं आपापल्या देशांत सुखा-समाधानानं राहावं याच कल्पनेवर आधारलेलं पंचशील नांवाचं तत्त्व स्वतंत्र भारतानं जगापुढं ठेवलं आहे. स्वदेशावर, स्वजनांवर व स्वधर्मावर कुणींहि प्रेम करील; पण मानवजातीवर प्रेम करणं हें आपल्यापुढं ध्येय असलं पाहिजे.

सत्यनिष्ठेबद्दल तर फार प्राचीन कालापासून आपला देश प्रसिद्ध होता. जे जे परकीय प्रवासी प्राचीन काळीं आपल्या देशांत येअून गेले ते ते अेकमुखानं म्हणतात की भारतीय लोक सत्यप्रिय आहेत; समाधानी आहेत व प्रामाणिक आहेत. ते आपला

शब्द कधीहि मोडत नाहीत, विश्वासघात करीत नाहीत, खोटं बोलत नाहीत की घरांना कुलपं लावीत नाहीत. हरिश्चंद्राच्या सत्यनिष्ठेची कथा तर तुम्हांला माहीत आहेच. सत्यामागं निर्भयता चालून येते.

कुणाच्याहि शरीराला व मनाला न दुखविणं म्हणजेच अहिंसा पाळणं, इतकी सोपी व्याख्या अहिंसेची आहे. आपण पुष्कळदा दुसऱ्याचं मन दुखवितों, त्याला कांही तसं कारणहि नसतं. थट्टेतसुद्धा अशी दुखापत करणं योग्य होणार नाही. शरीरावरील जखमा दिसतात, पण मनावरील व्रण दिसत नाहीत, म्हणून मनाची अहिंसा ही कल्पना तुम्हांला कदाचित् अवघड वाटेल.

व्यक्तिविकास करतांना आणखी कांही गुणांची आवश्यकता असते.

"दया क्षमा शांति। तेथे देवाची वसति।" हें वचन तुला माहीत आहे ना? देव देवळांत असो की नसो, त्याला शोधीत जाण्याचं कारण नाही. कारण या तीन गुणांतच तो समाविष्ट झालेला असतो. ज्यांच्यापाशी हे गुण नाहीत त्यांना तो कधीच दिसायचा नाही—सापडायचा नाही. प्राणिमात्रावर दया दाखवीतच परमेश्वराकडे गेलं पाहिजे. दया बुद्धींतूनच क्षमाशीलतेचा अुदय होतो. परस्परांतील कलह मिटविण्याचं क्षमाशीलता हें केवढं मोठं साधन आहे! कुणाला चुकून आपण कांही बोलतों, कुणाला चुकून आपला धक्का लागतो, त्याचा विपर्यास होण्याचा संभव असतो; पण "क्षमा करा हं!" अेवढ्या अेकच वाक्यांत सगळा क्रोध विरून जातो. गर्दीच्या रस्त्यांतून जातांना असे प्रसंग वारंवार येतात. तुम्हां मुलींना कुणाचा धक्का लागला, विशेषतः मुलाचा—तर तुम्ही अेवढे डोळे करून त्याच्याकडे पाहतां; पण तुमचा धक्का त्यांना लागला तर "क्षमा करा" असं म्हणण्याचं तुमच्या ध्यानांत येत नाही. आणि कुणाच्याच ध्यानांत येत नाही. धक्काबुक्की करणं हा जणू काय आपला हक्कच आहे असं तुम्ही समजतां. दया व क्षमा या दोन गुणांच्या जोरावर मनाला शांति मिळते; कारण राग विरून जातो, प्रेम व सहानुभूति तेवढी अुरते व त्यामुळंच मन शांत होतं. मनाच्या शांतींतून भक्तीचा अुदय होतो. परमेश्वराकडे मन धावतं—आणि अेकदा आपण त्याला शरण गेलों, त्यावर प्रेम करायला शिकलों की तो आपली काळजी घेतो. गीतेचा हाच संदेश आहे. आपल्या धर्माची हीच शिकवण आहे. "अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥" परमेश्वराला शरण जाण्याचं साधन म्हणजे प्रार्थना. सकाळीं अुठल्यावर व झोपतांना

प्रत्येक आओीबाप आपल्या मुलांमुलींना प्रार्थना करावयास सांगतात. प्रार्थनेनं मन शुद्ध होतं, प्रसन्न होतं व शांति मिळते.

धर्मनीतीचीं हीं साधींसुधीं लक्षणं जगांतील कोणत्याहि धर्मांना अमान्य होतील काय? निरनिराळ्या धर्मांतील व्यक्तींचे आचारविचार जरी भिन्न असले तरी नीति-तत्त्वांत अेकवाक्यता असते. हाच आपला धर्म ! स्वधर्मांतून जेव्हा मानवताधर्माकडे आपली प्रगति होओील तेव्हाच आपल्या अुच्च संस्कृतीचं दर्शन आपल्याला घडेल ! तें घडवून देण्याचं कार्य तुम्हां आजच्या मुलांमुलींच्या हातीं आहे, किशोरी !

शिवाय, पक्षपाताचा दोष स्वीकारूनहि असं म्हणतां येअील, की प्राचीनतम अशा हिंदुधर्माची संस्कृति हीच विश्वमांगल्याची आशा आहे. पशुपक्षी, वृक्ष, लता, नद्या, महासागर, ग्रहनक्षत्रं हीं भारतीयांच्या जीवनांत पूजास्थान बनलीं आहेत. तुळशीच्या रोपांची पूजा दारादारांतून होते. नद्यांची पूजा क्षेत्रांतून होते. सागराचीहि पूजा होते. लाखो लोकांकडून होते. जलाशय दिसला की गरिबांतला गरीब प्रवासी पाण्यांत पैसा टाकतो. पाण्यांत पैसा अुधळण्याचे हे दिवस नाहीत. तरीहि भारतीयाच्या निसर्गप्रेमाची व पूजेची ही सांस्कृतिक ओढ त्याला तसं करावयास लावते. निसर्गाचा कवि म्हणून अेक वर्डस्वर्थचंच नांव घेतलं जातं. पाश्चात्य वाङ्मयांत त्याच्यासारखे हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे कांही कविवरहि असतील, पण आपल्या भारतांत सर्वसामान्य जनताच निसर्गपूजक आहे ! ही हजारो वर्षांची आपली संस्कृति, झाडूलाहि पायाचा स्पर्श झाल्यास नमायला लावते. मग पृथ्वीला — जमिनीला पाय लागणं तिला कसं सहन होओील ? म्हणूनच बिछान्यांतून अुठल्याबरोबर आपण हात जोडून म्हणतों —

समुद्रवसने देवी पर्वतस्तनमंडले ।
विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्शम् क्षमस्व मे ॥

प्रकरण १५ वें

मिळकतीचा प्रश्न

वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या वाढत्या जबाबदाऱ्यांची तुम्हाला मीं थोडीबहुत कल्पना दिलीच आहे. पण वयांत येअीपर्यंत पैशांचा व्यवहार मात्र तुमच्यापर्यंत पोचत नाही. त्यामुळं पैशाच्या आय व व्ययाची कल्पना तुम्हांला नसते. त्याची अुठाठेवहि तुम्ही फारशी करीत नाही. "आअी, मला अमुक हवं, तमुक हवं; अेवढीच तुमची ओरड; मग हवं तें मिळालं तर आनंदानं तुम्ही नाचतां आणि नाहीच मिळालं तर रागानं आरडतांओरडतां, भोकांड पसरतां; पण वयांत येतांना तुम्हांला पैशाचं महत्त्व कळायला लागतं. घरांत प्रत्येक गोष्ट पैशाशिवाय कशी अडते याचा तुम्हांला अनुभव येतो. तुमच्या गरजा व त्यासाठी लागणारा पैसा याचं प्रमाण हळूहळू वाढतं. पैसे हें श्रीमंतीचं दिखाअू वैभवाचं कसं साधन असतं, अितरांवर आपली छाप पैशानं कशी मारतां येते याची तुम्हांला हळूहळू कल्पना येअू लागते. जगांतील सुंदरसुंदर वस्तूंचा संचय, राजेशाही वाडे, विस्तीर्ण अुद्यानं, नेत्रदीपक पोषाख, रत्नजडीत दागदागिने यांचं प्रदर्शन करणं पैशावांचून कसं अशक्य असतं याची जाणीव तुम्हाला होते, व हें सारं पैशानं घेण्याअितकी आपली शक्ति नाही असं पाहतांच, तुमच्या दिवास्वप्नांना मग सुरवात होते. स्वप्न म्हटलं की मग पैशाला काय तोटा? मन मानेल तें सौख्य स्वप्नांनी अुपभोगण्याची प्रवृत्ति तुमच्यांत निमाण होते. पण सत्यसृष्टींत मात्र पावलोपावलीं पैशाची जरूर कशी लागते, कितीहि मिळविला तरी पैसा अपुरा कसा पडतो, या महिन्याची गाठ दुसऱ्या महिन्याशीं कशी पडत नाही याचं प्रत्यंतर तुम्हाला

... स्थळप्रत.
आवक क्रम...

येअूं लागतं. वाढत्या वयांत हे सारे अनुभव तुम्हांला घ्यायचे असतात. माणूस श्रीमंत असो की गरीब असो, मिळकत व खर्च यांचं प्रमाण सारखंच असतं. मिळकत अधिक खर्चेहि अधिक, मिळकत कमी खर्चेहि कमीच असतो. श्रीमंत माणसंहि सदा पैशाच्या अडचणींत असतात. तेव्हा मिळविलेल्या पैशाचा विनिमय कसा करावा हें समजण्यास चातुर्यच लागतं. कित्येक कुटुंबांची सांपत्तिक स्थिति फारशी समाधानकारक नसतांनाहि राहणी टापटिपीची, अतिथिसत्कार, प्रवास, नेमधर्म, लग्नमुंजी, मुलांचं शिक्षण यांवर योग्य तो खर्च करूनहि अशीं कुटुंबं थोडीशी बचतहि करूं शकतात. केवढं धोरण राखून तीं खर्च करीत असतील बरं ? त्यांचं यश कशांत असेल ? मनावर प्रचंड ताबा असल्याखेरीज हें कसं शक्य आहे ? अेखादी गोष्ट आपल्याला आवडली, पण ती नसेल तरीहि चालण्यासारखं आहे अशा समजुतीनं मनाचा संयम ज्या व्यक्ति करूं शकतात त्यांनाच थोड्या पैशांत समाधानानं राहतां येतं.

तुम्ही जेव्हा वयांत येतां, तेव्हा आपल्या भावी संसाराचीं चित्रं तुम्ही रंगवायला सुरवात करतां. तुम्हांला वाटत असतं, की पैशाअडक्याची सर्व जबाबदारी नवऱ्यावरच पडते. पुष्कळांच्या बाबतींत ती गोष्ट खरीहि असते. पण तो मागचा काल आता झपाट्यानं मागं पडत चालला आहे. स्त्रियांच्या समान हक्कांबरोबर समान जबाबदाऱ्याहि वाढल्या आहेत. सामान्य कुटुंबांत पुरुषानं नुसतं मिळवायाचं व स्त्रियांनी चूल संभाळायची अशी स्थिति आता राहिली नाही. स्त्रियांनाहि हल्ली नोकरी करणं भाग पडतं, तरच खर्चाची तोंडमिळवणी करतां येते. ज्यांचं आपण नेहमीच अनेक बाबतींत अनुकरण करतों अशा पाश्चात्य समाजांत मुलंमुली आपल्या संसाराची मनांत योजना करतांच दोघंहि नोकरी करून कांही शिल्लक मागं ठेवल्या-खेरीज लग्नाचा विचारहि मनांत आणीत नाहीत, की अुतावळेपणा दाखवीत नाहीत. अुलट, अेखाद्या दैववान मुलीला नोकरी करण्याची पाळी आली नाही तरीहि नवऱ्यानं मिळविलेल्या पैशाचा योग्य तो विनिमय करणं, शिलकेंत भर घालणं, यांत तिनं आपलं कौशल्य दाखवावयास पाहिजे. हें कौशल्य अंगीं आणण्याच्या कामीं तुम्हीं या वयांतच प्रयत्न करावयास पाहिजे. या वयांत तुमच्यासाठी होणारा खर्च तुमचे आअीबाप तुमच्यासाठी करीत असतात. शाळेंतील फी, सहलीचा खर्च, वर्गण्या, तुमच्या वाढदिवसाच्या देणग्या, भाअूबीजेच्या ओवाळण्या, खाअूकरिता मिळणारे पैसे या सर्वांवर होणारा खर्च तुमचे आअीबाप करतात. पण बक्षीस, देणग्या वगैरेंच्या रूपानं तुम्हांला जी थोडीबहुत रक्कम मिळत असते तिच्या व्यय कसा करावा याचं

योग्य ज्ञान तुम्हांला झालं, मार्गदर्शन मिळालं की पुढं हातीं येणाऱ्या हक्काच्या मिळकतीचा तुम्हीं योग्य तोच विनियोग करायला शिकाल यांत शंका नाही. म्हणून आदा नि खर्च यांचं ज्ञान तुम्हाला वाढत्या वयाच्या संक्रमणकालांतच व्हायला हवं. आपल्याला लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तूंची खरेदी करण्यासाठी वडिलांकडून कांही रक्कम मागून त्याचा योग्य प्रकारें विनियोग करण्याची पात्रता आपल्या अंगीं आहे असं अेकदा आअीबापांना अगर पालकांना तुम्हांला सिद्ध करून देतां आलं तर तुमच्यावर ते विश्वासानं अधिक आर्थिक जबाबदाऱ्या टाकायला मागंपुढं पाहणार नाहीत.

जमाखर्च लिहिण्याची सवयहि तुम्हीं याच कारणासाठी केली पाहिजे. या बाबतींत कधीकधी तुमच्या हातून चूक होण्याचाहि संभव असतो. पण चुकीचीं कारणं समजून घेअून पुन्हा तिची पुनरावृत्ति न करण्याची खबरदारी तुम्हीं घ्यायला पाहिजे. जमाखर्च लिहिण्याची पद्धत जरी थोडीशी कंटाळवाणी वाटली तरी तिचा केव्हाकेव्हा फार अुपयोग होतो. आपण वेळोवेळीं खरेदी केलेल्या वस्तूंची त्यांच्या किंमतींसह व तारीखवार यादी करून ठेवली तर तिचा पुष्कळदा अुपयोग होतो. कोणत्या वस्तूवर आपण अधिक खर्च करतों, त्याला आवर कसा घालावा, टिकाअू वस्तूला थोडी अधिक किंमत दिली तरी तें किती श्रेयस्कर असतं, दिखाअू वस्तूंत खर्चलेले पैसे कसे व्यर्थ जातात या सर्वांचं सम्यक् ज्ञान खर्चाचं टिपण ठेवल्यानं होत असतं.

स्वतःपुरती जरी खर्चाची जबाबदारी तुम्हीं अंगावर घेतली तरी त्यांत हळूहळू तुम्हांला आत्मविश्वास निर्माण होअील. आपल्याला स्वतःच्या आवडीनिवडीप्रमाणं वस्तु खरेदी करतां येतात याचं समाधान तुम्हाला मिळतं. भावी आयुष्यांत या अनुभवाची किंमत तुम्हांला मग कळून येते. स्वतःच्या खर्चांतूनहि बचत करण्याची कला साधल्यास अुत्तमच. तिचा अुपयोग तुमच्या पुढील आयुष्यांत होतो. पैसा कसा मिळवावा याचंहि थोडंसं ज्ञान तुम्हाला या वयांत मिळणं अिष्ट असतं. तुमच्या आअीबापांना अनेक मुलं असलीं तर अेका मुलीवरच अधिक खर्च करणं त्यांना परवडत नाही. अशा वेळीं आपल्याला कोणत्या अुपायानं व शिक्षणाला अडथळा न येतां पैसा मिळवितां येअील याचा विचार तुम्हीं अवश्य केला पाहिजे. शाळेंत शिकत असतांनाहि तुम्हाला कितीतरी गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. खालच्या वर्गांतील मुलांमुलींना थोडेसे पैसे घेअून अभ्यासांत मदत करणं ही गोष्ट सहजसाध्य आहे. कारण मध्यम स्थितींतल्या कुटुंबांतील माणसांना मुलांसाठी अधिक पगाराचा खासगी शिक्षक ठेवणं परवडत नसतं; त्यांना अशी

११५१५१०१

व्यवस्था खचित आवडण्यासारखी असते. रविवारीं व सुट्यांच्या दिवसांत अशा शिकव-ण्यांचे कार्यक्रम खात्रीनं यशस्वी होण्यासारखे आहेत. नवीन वर्षाची, संक्रांतीचीं, दिवाळीचीं भेटकार्ड तयार करणं, जुन्या कपड्यांची दुरुस्ती करणं या गोष्टी घरबसल्या होण्यासारख्या असतात. सध्याच्या बदललेल्या आर्थिक परिस्थितीला विवाहित मुलींना तोंड द्यावंच लागतं. कितीहि टापटिपीचा व काटकसरीचा संसार केला तरी नवऱ्याच्या अपुऱ्या प्राप्तीमधे भागवून घेतां येत नाही, म्हणूनच नवऱ्याला मोठ्या नाअिलाजानं आपल्या बायकोला नोकरी करण्याची सवलत, परवानगी द्यावी लागते. घरांतल्या अडी-अडचणीला स्त्रीलाच तोंड द्यावं लागतं. दारिद्र्याशीं तिलाच झगडावं लागतं म्हणून ती नोकरी करणं पतकरते. विशेषतः मध्यम वर्गातील स्त्रियांना महागाअीशीं तोंड देण्यासाठीच संसार सांभाळून नोकरी करण्याचा निर्णय घ्यावाच लागतो. नोकरीसाठी लागणारं शिक्षण अर्थात् याच वयांत घ्यावयाचं असतं. तहान लागण्यापूर्वीच विहीर खणायची असते. आपल्याला नवऱ्याच्या मिळकतींत भर घालवी लागणार आहे हें गृहीत धरूनच प्रत्येक मुलीनं आपल्या आयुष्याची पूर्वतयारी करावयास पाहिजे.

पाश्चात्य मुली आपल्या शालेय जीवनांत अनेक मार्गांनी पैसे मिळवूं शकतात. नाताळचा सण जवळ आला की मुली स्वतःच कार्ड तयार करतात व आपल्या परिचित माणसांना विकतात. कुणाचं केशकर्तन करण्याचं काम पतकरतात, कुणाच्या बुटांचं पॉलिश करून देतात व पैसे मिळवितात. पैशावांचून आपल्या शिक्षणांत कांही अडून राहिलं अशी वेळच त्या येअूं देत नाहीत. तुम्हांला हें जमेल का ? कोणत्याहि कामांत प्रामाणिकपणा दाखवून कष्ट करण्याची तयारी दाखविल्यास पैसा हाताशींच असतो. श्रीमंत आअीबापांच्या मुलींनीहि स्वकष्टानं पैसा मिळविणं कमीपणाचं आहे असं समजूं नये. “ माझ्या घरीं काय कमी आहे ? – मी कशाला पैसे मिळवूं ? ” ही अहंमन्यतेची वृत्ति परिणामीं घातक ठरते. स्वतः कष्टानं मिळविलेल्या पैशाचा आनंद ज्यानं त्यानं स्वतःच अनुभवायचा असतो.

आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून मात्र नोकरी करण्याचा अट्टाहास, मुलींनो, तुम्हीं करूं नये. आपल्या नवऱ्याला, मुलांबाळांना चांगलं अन्न तुम्हांला घालतां येत नसेल, नातेवाअीक, पाहुणेराअुळे यांचा योग्य तो सन्मान करतां येणं शक्य नसेल, घराचीं व नोकरीचीं बंधनं पाळतां येणार नसतील, आपल्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेतां

येणं शक्य नसेल, तर नोकरीच्या फंदांतच पडूं नये हें बरं. सर्व गोष्टी करण्याचा हव्यास धरतांना कोणत्याच गोष्टींत समाधानकारक यश मिळवितां येणार नाही.

म्हणून ज्या ज्या वेळीं जें जें कर्तव्य अधिक महत्त्वाचं वाटेल तेंच करावं. संसाराला मदत व्हावी म्हणून तुम्ही नोकरीचा मार्ग स्वीकारणार ना? मग योग्य जमाखर्चाची तोंडमिळवणी होअून कांही शिल्लक बँकेंत टाकतां येअील तरच तुमच्या पुरवणी नोकरीचा अुपयोग! जें जें मिळवाल तें तें सर्वच खर्च होअूं लागलं तर तुमच्या जादा कष्टांचा अुपयोग नाही; म्हणून नोकरी करायचीच तर अधिक परीक्षा देअून, अधिक कार्यक्षम होअून मग नोकरीचा मार्ग शोधावा. पैसा जितका मिळवावा तितका कमीच वाटतो. त्याची हाव केव्हाच थांबत नाही. तिला कुठं तरी समाधानाची मर्यादा घालावयास पाहिजे. समाधान हेंच सुख आपण म्हणतों. आपल्या कौटुंबिक जीवनाची कांहीतरी आखणी करावयास पाहिजे. आपल्या पतिपत्नीच्या संयुक्त पैशावर आपल्याला किती मुलांबाळांचा संसार सुखानं करतां येअील याचा विचार प्रथम झाला पाहिजे. मुलांच्या बाबतींत निसर्गाच्या लहरीवर राहतां कामा नये.

आपल्यासमोर राहणाऱ्या रमाबाअींना मुलं नअू. मोठ्या मुलीचं अर्धवट शिक्षण करून त्यांनी तिचं लग्न केवळ लग्नासाठी लग्न म्हणून नव्हे, तर अेका मुलीची सोय बाहेर होअील म्हणून केलं; पण जावयी भामटा निघाला! तो बायकोसकट सासू-सासऱ्यांच्या घरांत मुक्काम करून बसला. आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांना समाजाच्या दयेवर अवलंबून राहावं लागतं. कोणत्या शाळांतून मुलांना नादारी मिळविणं, कोणत्या संस्थांकडून शिक्षणाला पैसा मिळविणं यासाठी दोघां पतिपत्नींची सारखी धडपड चालत असतांहि त्यांनी दहाव्या अपत्याला जर जन्म दिला तर अपराध कुणाचा? समाजाला त्यांची कीव येअील काय?

तेव्हा नोकरीक रायचीच तर केवळ पुरुषाप्रमाणं हक्क गाजवावे म्हणून न करतां आपल्या संसाराला त्याची खरोखरी आवश्यकता आहे का याचा विचार करून नोकरीच्या बंधनांत स्वतःला गुंतवावं. आपल्या दर्जाला शोभेल अशीच नोकरी करावी. पण असा दर्जा अधिक शिक्षणानं कार्यक्षम झाल्यावरच मिळत असतो. आपण मिळविलेल्या पैशांतून बँकेंत शिल्लक टाकतां येते, देशांतील अुद्योगधंद्यांच्या भांडवलांत भर घालतां येते. आपल्या कष्टाचे पैसे शिलकेंत आहेत या कल्पनेनं अभिमान वाटतो. अेखादी आवडती वस्तु खरेदी करण्याचं सामर्थ्य पैशाच्या

रूपानं आपल्याजवळ आहे याचा केवढा अभिमान आपल्याला वाटतो! कुणाला मदत करायचं तुमच्या मनांत येतं, कुणाला देणगी देण्याची अिच्छा होते, अशा वेळीं नवऱ्याची याचना करण्याची तुमच्यावर पाळी येत नाही. तुम्हीं स्वतः कमावलेल्या पैशांचं बळ फार मोठं असतं. तें तुम्हांला वाकूं देत नाही – तुमची मान ताठ राहते. तुमच्या शाळेच्या अिमारत-फंडाला तुम्हाला मदत करायची अिच्छा होते. तुम्ही अुठतां, पैशाची पर्स अुघडतां, चेकबुक काढतां, कुरकुरु लिहितां, फर्रदिशी चेक फाडतां – संत जनाबाअी विद्यामंदिर – अिमारत फंड – अेकशे अेक रुपये! हा आनंद, हें समाधान, किशोरी, ज्यानं त्यानंच मिळवायचं असतं – अुपभोगायचं असतं. पण काटकसरीनं संसार करून पैसा वांचवणं म्हणजे नोकरी करून पैसा अुधळण्यापेक्षा अधिक चांगलं नव्हे का?

• • •

प्रकरण १६ वें

" मला मुळी लग्नच करायचं नाही ! "

" कुणाला ग अुत्तर देत आहेस, किशोरी ? "

" रजनीताअीला. सारख्या आपल्या लग्नाच्याच गोष्टी करीत असते ! "

" पण तिचं तरी काय चुकलं ? मुलगी मोठी झाली, तिची विद्यार्थीदशा संपली की जो तो हेंच विचारणार " आता लग्न कधी करणार ? " आपल्या प्राचीन आश्रमपद्धतींत ब्रह्मचर्याश्रमानंतर गृहस्थाश्रमालाच सुरवात होत असे, आणि नव्याण्णव टक्के मुलींच्या बाबतींत तो सुरू होतो. म्हणजे मुलींच्या संख्येंत अविवाहित मुलींची संख्या शंभरांत अेक असते. तुला त्या अेक संख्येंत का भाग घ्यायचा आहे, किशोरी ? फार कठीण आहे ही गोष्ट ! पुरुषांत आजन्म ब्रह्मचारी सापडतात, पण अशा स्त्रिया मात्र क्वचितच अपवादादाखल दिसतात. प्राचीन कालापासून स्त्री ही स्वतंत्र राहूं नये, कुणावर तरी अवलंबून राहावी, कुणीतरी तिचं सतत रक्षण करावं असं शास्त्रांनी ठरविलेलं असल्यामुळं अर्थात् असं संरक्षण तिला लग्नावांचून मिळत नाही अशी त्या काळीं समजूत होती नि ती आताहि सामान्य जनांत तशीच आहे. तूं म्हणतेस किशोरी, की तुला मुळी लग्नच करायचं नाही ! कांही हरकत नाही. आता काळ बदलला आहे, समाजाची दृष्टि बदलली आहे, विचार बदलले आहेत. सर्व स्त्रियांनी विवाह केलाच पाहिजे अशी सक्ती आता कुणी कुणावर करूं शकत नाही. अुलट, आपल्या देशाला आता सुदृढ व सदाचारी अशा अनेक तरुण, अविवाहित, ध्येयवादी स्त्री-पुरुष सेवक-सेविकांची गरज आहे. स्वामी विवेकानंद तुला अैकून माहीत आहेत

ना? त्यांना आपल्या धर्ममतांचा प्रसार व प्रचार जगभर करण्यासाठी तरुण माणसं हवीं होतीं. त्यांनी त्याबद्दल अेके ठिकाणीं म्हटलं आहे –

"मला आज पोलादासारखे मजबूत स्नायु असलेले सेवक व सेविका हव्या आहेत. त्यांच्या वज्रासारख्या मजबूत देहांत मनेंदेखील वज्रासारखींच दृढ असावींत. त्यांच्या अंगीं क्षत्रियांचें वीर्य व ब्राह्मणांचें तेज हीं दोन्हीं असावींत. पण आपल्या लाखो, सुंदर युवक-युवतींची दरवर्षी कत्तल होत आहे. जिला लोक लग्नाच्या नांवाने ओळखतात त्या पशुतेचें लोकांना वेड लागलें आहे. प्रतिवर्षी लाखो युवक व युवती तिच्या पाशांत सापडतात."

काय खोटं आहे यांत?

तूं म्हणतेस 'मला लग्नच करायचं नाही.' यांत कुणा तुला आवडणाऱ्या व्यक्तीचा आदर्श तूं मनाशीं बाळगला आहेस का? त्या व्यक्तीचं तुला अनुकरण करायचं आहे का? आपल्याला प्रिय असलेल्या व्यक्तीच्या ध्येयापेक्षा आपल्याला आवडणाऱ्या अेखाद्या विषयाचं ध्येय ठेवून जर तूं अविवाहित राहणार असशील तर मात्र तुला माझी सहानुभूति मिळेल. तरीहि अविवाहित राहूं अिच्छिणाऱ्या लोकांवर आपली राहणी व वर्तन शुद्ध राखण्याची जबाबदारी पडतेच. पवित्र व संयमी जीवन घालविण्याच्या अुद्देशानं आणि जीवनाला जास्त अुपयोगी व सेवापरायण बनविण्यासाठी अविवाहित राहणं याहून भव्यतर व्रत दुसरं कोणतं? पण कांही अविवाहित राहणारे किंवा अुशीरा लग्न करणारे स्त्रीपुरुष संसाराच्या जबाबदारीला भीत असतात. कांहींना अशी जबाबदारी पेलण्यासारखी नसते; कांहींवर आअीबापांची, लहान भावंडांची जबाबदारी दुर्दैवानं पडलेली असते. असे लोक आजन्म अविवाहित राहणंच पसंत करतात, म्हणजे सक्तीचं ब्रह्मचर्य त्यांना पाळावं लागतं. अशा स्त्रीपुरुषांचं मन विकार व वासना यांना दूर ठेवूं शकत नाही. समाजमान्य अशा समाधानाचा मार्ग त्यांना सापडत नाही. अशा वेळीं नीतिभ्रष्टता सुरू होते. सारासार विचार विकारांना बळी पडतात.

ज्यांना खरोखर जन्मभर अविवाहित राहायचं असेल किंवा कांही कारणाकरिता ज्यांना मोठेपणीं विवाह करायचा असेल त्यांनी स्वतःच्या जीवनाला कांहीतरी निश्चित ध्येयाचं वळण लावलं पाहिजे. सतत चांगल्या गोष्टींचं मनन व ध्यास लावून घेतला पाहिजे. राहणींत व आहारांत साधेपणा आणला पाहिजे. वर्तणुकींत पावित्र्य, सत्यनिष्ठा,

कणखरपणा, नियमितपणा वगैरे श्रेष्ठ गुणांची जोपासना केली पाहिजे. अविवाहित राहण्याचा संकल्प म्हणजे असिधाराव्रताचं पालन करणं होय, हें तूं विसरूं नकोस.

हल्ली मुली समाजांत स्वतंत्रतेनं वावरूं लागल्या आहेत. शिक्षणाच्या, नोकरीच्या, सभासंमेलनांच्या निमित्तानं त्यांचा अनेक पुरुषांशीं संबंध येतो. अर्थात पुरुष म्हटला की तो पापदृष्टीचा अगर कपटी असतोच असंहि नाही; पण ज्या तरुणाशीं तुम्ही विवाहबद्ध होण्याची शक्यता नसेल, ज्या तरुणाविषयी पतिविषयक भावनेचा तुमच्यांत मागमूसहि नसेल, ज्याच्याशीं लग्न करण्याची तयारीहि नसेल, अशा तरुणाशीं लग्न करणंच भाग पडेल असे प्रसंग टाळावे. ओळखींतून किंवा कामानिमित्त भेटीगाठीचे प्रसंग वाढत जातात, त्यांतून आकर्षण व प्रेमसंबंध निर्माण होतात व ही संकटांची परंपरा थांबविणं अशक्य होतं. अशा अनिष्ट मैत्रीला मुलींनी योग्य वेळींच मुरड घातली पाहिजे व आपली मर्यादा संभाळली पाहिजे. पुष्कळदा तुम्हां मुलींचं बोलणं अघळपघळ असतं. पोषाखांत भारदस्तपणा जरी आणतां आला नाही तरी छचोरपणा मात्र असूं नये. अर्धवट कपडे घालून शरीराच्या अुन्नत भागांचं प्रदर्शन करणं ही अत्यंत हीन अभिरुचि आहे. अभिरुचीवरूनच माणसाची परीक्षा होत असते. डोळ्यांच्या हालचालींतून, अंगविक्षेपांतून शृंगारिक भाव दाखविणं, अुगाचच हसून अितरांचं लक्ष आपल्याकडे वेधणं या गोष्टी कटाक्षानं तरी टाळल्या पाहिजेत, तरच अविवाहित राहण्याचा तुमचा निश्चय पार पडेल.

शिवाय कांही विवक्षित ध्येय तुमच्यापुढं असेल तरच अविवाहित राहण्यापासून समाजाला तुमचा अुपयोग होअील. तुमच्या वासनांना बंधन निर्माण करण्यासाठी कोणत्या तरी सामाजिक कार्याला तुम्हीं वाहून घ्यायला पाहिजे. मनाला कोणत्यातरी कामाला जुंपलं पाहिजे. भावनांचं अुन्नयन झालं पाहिजे. नुसत्या शिक्षणविषयाला वाहून घेतलं तरी कित्येक ध्येयवादी माणसांना पुरून अुरेल एवढं हें क्षेत्र विशाल आहे. ब्रिटिश अमदानींत धर्माचा व शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी हजारो मैलांवरून व साता समुद्रांना ओलांडून ख्रिस्ती मिशनरी स्त्रीपुरुषांची नुसती गर्दी झाली होती आपल्या देशांत. भारतालाहि अशाच सेविकांची आज गरज आहे. शरीरानं व मनानं पवित्र, मर्यादशील, विचारवंत व स्वाभिमानी अशा कुमार-कुमारिकांची गरज आहे. महात्मा गांधी म्हणत, “सर्वांनीच लग्नं कशाला करायला पाहिजेत? देशाच्या खालवलेल्या अवस्थेंत अधिक प्रजा अुत्पन्न करणं म्हणजे गुलामांच्या संख्येंत अधिक भर

घालण्यासारखं आहे." हें जरी सर्व खरं असलं तरी निसर्गानं प्राणिमात्रांच्या ठिकाणीं जी वासना निर्माण केली आहे तिच्याशीं सामना देण्याअेवढं सामर्थ्य जर तुमच्यांत नसेल तर तुमच्या लग्नाचा विचार जितका लवकर अमलांत येअील तितका चांगला!

किशोरी, तूं खरोखरीच का अविवाहित राहणार आहेस? हें दिव्य तुला झेपेल? नाहीतर वेळींच लग्न केलंस तर तुझं आयुष्य सुखावह तरी होअील!

• • •

प्रकरण १७ वें

—आणि लग्न करायचंच झालं तर !

लग्न करायचं तुम्हीं ठरविलंत तर मात्र पुष्कळच गोष्टींचा विचार करणं भाग आहे. पाश्चात्यांच्या विचारसरणीवरून कित्येकांना वाटतं, की प्रेमावांचून लग्नसंभव नाही. पण प्रेम असो वा नसो, आपल्या धर्मांत लग्न हा संस्कार समजला जातो. आयुष्यांतील सोळा संस्कारांमधे लग्न हा संस्कार अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. योग्य वयांत तें झालं, मनाजोगता वर मिळाला, तरच सारं आयुष्य सुखासमाधानानं पार पडायचं.

आपले जुने लोक म्हणत, मासिक पाळी सुरू होण्यापूर्वीच लग्न करावं. लग्नापूर्वी रजोदर्शन झालं तर आओकडील अेकवीस व बापाकडील अेकवीस अशीं अेकवीस दुणे बेचाळीस कुळं (न पाहिलेलीं) नरकांत पडतात, अशी शास्त्रीय समजूत असे! मासिक पाळी सुरू होअूनहि लग्न झालं नाही की मुलींना लज्जा वाटे, समाजाची भीति वाटे. म्हणून पूर्वी मासिक पाळीच्या वेळीं अविवाहित मुलींना लपून बसण्याची पाळी येअी. ह्या नरकवासांतून तुमची पिढी मुक्त झाली आहे हें किशोरी, तुमचं केवढं भाग्य !

ही वेडगळ समजूत केवळ अज्ञानामुळं रूढ झाली असावी. अज्ञानी लोकांच्या मतें मुलीला मासिक पाळी सुरू झाली की ती लगेच माता होअू शकते. वास्तविक गर्भ धारण करण्यासाठी व बालकाला जन्म देण्यासाठी स्त्रीचे सर्व अवयव संपूर्ण विकसित व्हायला रजोदर्शनानंतर निदान चारपांच वर्षांचा काल जावा लागतो. ज्या मुलींचीं

अगदी लहानपणीं लग्न होतात त्या चवदापंधराव्या वर्षी माता होतात देखील. पण त्यांत मुलीच्या प्रकृतीला धोका पोचत असतो. अकालीं त्या वृद्ध दिसूं लागतात. गर्भधारणेचे तिचे अवयव परिपूर्ण झाले नसल्यानं अशा मुलींचीं मुलंहि अशक्त, किरकिरीं, रोगट अशीं होतात. तुम्ही अेखादी फुलाची कळी तोडली व ती फुलविण्याकरिता तिच्या पाकळ्या हातांनीच अुमलवीत बसलांत तर ती कलिका अुमलत तर नाहीच पण छिन्नभिन्न स्थितींत लवकरच कोमेजून जाते ! तसंच हें आहे. मुलीची सुंदर स्त्री बनेल तेव्हाच ती सशक्त, सुंदर बालकाला जन्म देण्याच्या योग्यतेची होते. निसर्गाचं कार्य आपण त्याला त्याच्याच पद्धतीनं करूं दिलं पाहिजे. अपत्यजन्मानंतर मुलाचं संगोपन करण्याची जबाबदारी, ह्या अवेळीं माता झालेल्या चवदापंधरा वर्षांच्या खेळण्यांत किंवा अभ्यासांत गुंतलेल्या मुलीला कशी पार पाडतां येअील बरं ?

तुमच्या लग्नामागं प्रेमाची बैठक असली तर अुत्तमच, पण ती व्यवहाराच्या पाया-वर अुभारलेली असावी लागते. प्रेमाच्या राज्यांत झाडाखाली संसार मांडायची प्रेमि-कांची तयारी असते, आकाशांतील चांदण्यांच्या लुकलुकत्या पणत्यांच्या प्रकाशांत रात्री काढण्याची त्यांना हौस वाटते, वारा खाअून पोट भरण्याची शक्यता त्यांना वाटते ! पण हें झालं काव्य, चित्रपटदर्शन ! प्रत्यक्ष व्यवहारांत झाडाची सावली मिळणंहि कसं अशक्य होतं हें कळून आल्यावर अुतावीळपणानं अुरकलेल्या विवाहाचा अुन्हाळा जाणवूं लागतो.

प्रेमाच्या धुंदींत यमुनेनं शाळा सोडली. आपण लवकरच प्रेमविवाह करणार अस-ल्याचं तिनं वडिलांना सांगितलं. तिचे प्रियकर होते शाळेचे अेक वर्गचुकाअू सभासद ! यमुना आपल्या वडिलांची अेकुलती अेक मुलगी व राहत्या घराची अेकटी मालकीण. तिच्या भावी पतीला वाटलं, आपल्या पोटापाण्याचा, राहण्याचा प्रश्न चटकन् सुटेल. कायदेशीर वयांत येतांच दोघांनीहि लग्न रजिस्टर करून घेतलं. यमुनेचे वडील होते व्यवहारी. त्यांनी जावअीबापूंना आपल्या पत्नीची काळजी घेण्यास सांगि-तलं. यमुनेला आपल्या सत्तेच्या घरांतून लग्नाच्या रात्रीं घराबाहेर पडावं लागलं. कुठं जाणार ? काय खाणार ? राहणार कुठं ? हॉटेलांतील बटाटेवडे खाअून दिवस तर निभावला. यमुनेच्या मैत्रिणीच्या घराच्या गच्चीवर आकाशाच्या छताखाली व सतरं-जीच्या बैठकीवर कांही दिवस तीं राहात असत. लग्नाची वास्तव बाजू आतां दोघांच्या डोळ्यांपुढं अुभी राहिली. नोकरी करण्याअितपत दोघांचंहि शिक्षण न झाल्यानं त्यांना स्वतंत्र जीवन जगतांच आलं नाही. मित्र-मैत्रिणींच्या सहानुभूतीवर किती जगणार ?

लग्न होण्यापूर्वी प्रत्येक मुलामुलीनं यासाठीच प्रथम स्वावलंबी होण्यास शिकलं पाहिजे. तुम्ही जेव्हा विद्यार्थीदशेंत असतां तेव्हा आओीवडिलांवर अवलंबून असतां; पण विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर स्वतःचं व आपल्या वृद्ध आओीबापांचं, लहान बहीण-भावंडांचं पोषण करण्याची धमक तुमच्यांत असली पाहिजे. जोंपर्यंत स्वतःचं पोषण स्वतःला करतां येत नाही, तोंपर्यंत कुणीहि लग्न करायची घाओी करतां कामा नये. 'अुतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग ' ही म्हण माहीत आहे ना, तशी स्थिति व्हायची ! तुम्ही म्हणाल, मुलीच्या बाबतींत हा नियम लागू पडत नाही; कारण तिच्या पोषणाची जबाबदारी पतीवर पडते. हें थोडंसं खरंहि आहे; पण आपल्या समाजांत ही जबाबदारी पाळतां येण्यापूर्वीच मुलगे पति व पिते होतात.

चालू परिस्थितींत मुलांप्रमाणं मुलींनीहि स्वावलंबी बनून आपली स्वतःची अुपजीविका चालविण्याची पात्रता अंगीं आल्याखेरीज लग्नाचा नुसता विचारहि करूं नये. पैसा मिळविण्याचं काम पुरुषाचं व त्याचा विनिमय करण्याचं काम, गृहसंसार चालविण्याचं काम, अपत्यसंगोपनाचं काम स्त्रीचं. ही कुटुंबव्यवस्था आपल्या पूर्वजांनी विचारपूर्वक केली आहे व ती स्वाभाविकहि आहे. पण याचा अर्थ असा नाही, की पुरुषाला घरसंसार चालवितां येअू नये, त्यानं तो चालविण्याचं नाकारावं व स्त्रीला पुरुषाच्या साहाय्याच्या अभावीं असाहाय्य व अनाथ वाटावं. अनाहूत संकटांनी भांबावून न जातां निश्चयानं व स्वतंत्रपणें तिला स्वतःची अुपजीविका चालवितां आली पाहिजे आणि अितकी शक्ति मिळविल्याखेरीज मुलीनं लग्न करण्याचं नाकारावं.

पुष्कळ मुलींच्या बाबतींत शाळेंतलं शेवटचं वर्ष — अेस. अेस. सी. परीक्षेचं वर्ष — अपघाताचं ठरतं. परीक्षा की लग्न हा प्रश्न त्यांचीं वडील माणसंच सोडवितात. हातचा नवरा मुलगा जाओील, परीक्षा काय, केव्हाहि देता येतील अशी त्यांची वेडी समजूत असते. मुलीच्या भावना तीं ओळखत नाहीत. लग्न होतं, पण परीक्षा हातची जाते. परीक्षेबरोबर चरितार्थाच्या पात्रतेचे मार्गहि बंद होतात. अशा वेळीं नम्रतापूर्वक, आपलं प्रथम शिक्षण संपवून लग्न करण्याचा निश्चय वडील माणसांच्या कानांवर घालावा. सर्वच वडील माणसं हट्टी नसतात, आग्रही नसतात. पण तुमची या बाबतींत मुग्धता पाहून त्यांना वाटतं, यांना परीक्षेपेक्षा लग्नाचं महत्त्व पटलं आहे. अेस. अेस. सी. ही शालेय जीवनांतील शेवटची परीक्षा, तेवढी तरी लग्नाआधी पदरांत पाडून घेण्याचा निश्चय प्रत्येक मुलीनं केला पाहिजे.

वरील सर्व गोष्टी जर विचारांत घेतल्या तर मुलींनी विसाव्या अगर अेकविसाव्या वर्षी लग्न करून घेणंच योग्य ठरेल. पण तोंपर्यंत कांहीतरी अुपयुक्त कृत्यांत, कोणत्या-तरी आपल्याला आवडणाऱ्या कलेचं शिक्षण घेण्यांत तुम्हीं मन गुंतविण्याचा प्रयत्न करावयास हवा. आपल्या देशाचं हवामान अूष्ण म्हणजे आळसाला आमंत्रण देणारं. आळशी माणसाच्या मनांत अनेक विकार अुत्पन्न होतात. हवामान जरी अूष्ण असलं तरी निरभ्र आकाशाची नीलिमा व झगझगीत सूर्यप्रकाशाचा लाभ आपल्या देशाला झाला आहे. अशा खुल्या वातावरणांत फिरण्याहिंडण्याचा व्यायाम घेणं हें वाअीट विचारांवर अुत्तम औषध आहे. निसर्गाच्या सान्निध्यांत सात्त्विक विचारांचा अुदय होतो. पोलादी प्रकृतीच्या मुलींचं वैवाहिक जीवन सुखासमाधानाचं होतं, नाहीतर अेकाच बाळंतपणांत वृद्धावस्थेला पोचलेल्या तरुण म्हाताऱ्यांची संख्या कांही कमी नाही.

वयांत येतांना, मासिक पाळी सुरू होतांना मुलीची प्रकृति बिघडल्यासारखी दिसते; पण खाण्यांत, खेळण्यांत नियमबद्धता ठेवल्यास प्रकृतीची कुरकूर राहणार नाही. विद्या असली, नोकरी करण्याची पात्रता अंगीं असली तरी प्रकृति तोळामासा असल्यास स्वावलंबनाचा मार्गच बंद होण्याचा संभव अधिक. शरीराच्या लवचीक-पणामुळं व सुटसुटीतपणामुळं स्त्रियांना वेलीची अुपमा देण्याचा कविसंकेत आहे. पण वेली बनण्यापेक्षा झाडाच्या ढोली बनण्याकडेच तुमची प्रवृत्ति अधिक. शाळेंत खोट्या अडचणी भासवून कवायतीचे वर्ग चुकविण्याकडे तुमचा अधिक कल असतो. घरीं बैठकीचीं कामं तुम्हाला आवडतात. शिवण-टिपण, स्वयंपाकपाणी, गप्पाष्टकं करणं, पत्ते, कॅरम खेळणं अशा बैठकीच्या कामांनी व करमणुकीनं स्नायूंना व्यायाम मिळत नाही, दीर्घ श्वास घेण्याची सवय लागत नाही, रक्ताभिसरण होत नाही व स्नायूंना गति मिळत नाही. दररोज नियमित व मोकळ्या हवेंत व्यायाम घेणाऱ्या मुलींना भावी जीवनाला धिटाअीनं तोंड देण्याचं सामर्थ्य येतं. स्नायूंना जोर मिळतांच अेखाद्या स्प्रिंगवर चालण्यासारखी ती ताठ पण फुलांच्या पावलांनी चालूं शकते. छाती ताठ करून सूर्याकडे पाहून चालण्याची शक्ति तिच्यांत येते व जीवनांतील सुखदुःखं ती सारख्याच सामर्थ्यानं पेलूं शकते.

व्यायाम घेणं महत्त्वाचं असलं तरी शारीरिक व मानसिक चळवळींतहि समतोल-पणा राखावा लागतो. असा समतोलपणा राखण्यासाठी व शरिराची झीज भरून काढण्यासाठी तुम्हाला अितर मोठ्या माणसांपेक्षा अधिक तास झोप घेणं आवश्यक

आहे. कमींत कमी आठ तास झोपेची तुम्हाला आवश्यकता आहे. कमी झोप मिळाली की अभ्यास होत नाही, हा अनुभव तुम्हाला आहेच. अेकचित्तता मिळत नाही, स्मरणशक्ति कमी होते. अशा वेळीं अभ्यासाचा वेळ न वाढवितां झोपेचा वेळ वाढवायचा असतो. अपुऱ्या झोपेमुळं मानसिक दुर्बलता जशी वाढते, तशीच रोगांना प्रतिकार करण्याची शक्तीहि कमी होते.

शरीर सुदृढ ठेवण्याच्या कामीं व्यायाम व झोपेप्रमाणं समतोल आहाराचीहि अत्यंत जरूर आहे. प्रकृतीच्या निकोपपणासाठी तुम्ही काय खातां, कसं खातां व केव्हा खातां या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. जें अन्न तुमच्या शरीराला पोषक असतं — पण जिभेला जरी तें रोचक नसलं तरी तेंच अन्न खावं. जें आपल्याला आवडतं तेंच अन्न असं समजूं नये. आवड व अुपयुक्तता यांत दुसरीलाच अधिक महत्त्व आहे. सणसणीत भूक लागेल तीच खाण्याची वेळ. दिवसभर तोंड चालवून भूक मंदावणं म्हणजे अपचनाला आमंत्रण देण्यासारखंच आहे. तुम्हां मुलींचा आहार वास्तविक कमीच असतो. खाल्ल्यानं आपण लठ्ठ होअूं अशी वृथा भीति तुम्हांला वाटत असते; पण असा अपुरा आहार घेअून काल्पनिक लठ्ठपणा कमी करण्याच्या प्रयत्नांत पुष्कळद वजन घटत राहतं, अशक्तता वाढते व अेकंदर प्रकृतिमानच खालावतं. असं प्रकृतिमान खालावलेल्या मुलीच्या लग्नाचा संभव कमीच.

नोकरी करून पैसा मिळविण्याची पात्रता विद्यार्जनानं जरी येत असली तरी प्रत्येक मुलीनं नोकरी केलीच पाहिजे ही विचारसरणी सदोष आहे. गृहकृत्यं, बालसंगोपन हीं कामं मुलींना करायचींच असतात. तीं संभाळून नोकरी करतांना शारीरिक झीज होते. ती भरून काढतां आली नाही तर सारा संसारच विस्कळित होण्याची पाळी येते. तेव्हा नियमित व्यायाम, विश्रांति, झोप व समतोल आहार या गोष्टींची सवय लावल्याखेरीज शरीरयंत्र सुव्यवस्थित राहणार नाही व अितरांना भारभूत होण्याची तुमच्यावर पाळी येणार नाही.

वैवाहिक जीवन ही अेक आयुष्यांतली परीक्षाच आहे त्या परीक्षेची पूर्वतयारी झाल्यानंतरच लग्न करण्याच्या विचारांना मनांत प्रवेश द्यावा. संसारपरीक्षेचा हा कार्यक्रम व त्या परीक्षेला लागणारे पाठ्यविषय कळल्यावर तुम्हीं लग्न करण्याचं निश्चित केलंत तर योग्य वेळींच तुमच्या लग्नाचे चौघडे वाजूं द्या.

• • •

प्रकरण १८ वें

अविवाहित म्हातारी

अविवाहित म्हातारे आपण पुष्कळदा पाहतों, पण आपल्या समाजाला अविवाहित म्हातारी हा शब्दप्रयोग फारसा मान्य नाही. कारण विवाह हा आपल्या धर्मात संस्कार समजला जातो व ज्याला संस्कार नाही तो मानव अपूर्ण समजला जातो, म्हणून जो तो आपला जोडीदार शोधून वैवाहिक जीवनांत पूर्णत्व गाठूं अिच्छितो. अविवाहित राहून स्वतंत्र जीवन स्त्रीला जगतांच येणार नाही असं जें आपल्या समाजाला वाटत असे तें स्त्रियांबद्दल त्या काळीं विश्वास वाटत नव्हता म्हणून. स्त्रियांचं चारित्र्य जपण्याबद्दल आपल्या संस्कृतीचा व धर्माचा रोख आहे. त्या पुराण्या काळीं स्त्रियांचा रक्षक पुरुष असे. आता स्त्रिया सज्ञान होत आहेत, स्वावलंबी होत आहेत, कर्तृत्व दाखवीत आहेत. ध्येयवादी कुमारिकांना कधीकधी अविवाहित राहावं लागलं तर त्यांत हसण्यासारखं, कुचेष्टा करण्यासारखं काय आहे, किशोरी ?

आपण अनेक बाबतींत पाश्चात्यांचं अनुकरण करतोंच की नाही ? जो परदेशाहून येतो तो तिकडल्या मोहक जीवनाचा आदर्श आपल्या गरीब बांधवांपुढं ठेवतो. आपल्या देशाच्या सद्यःस्थितींत समाधानानं व शांतीनं कसं राहावं हें मार्गदर्शन कुणी करीत नाही. मग आपल्याच देशांत आपल्याला खाली मान घालून बसण्याची पाळी येते व आपलं सर्वच वाअीट ही न्यूनगंडाची म्हणजे कमीपणाची भावना आपल्यांत अुत्पन्न होते. पण पाश्चात्यांचे कांही राष्ट्रीय गुण आपण अुचलले पाहिजेत. प्रत्येक बाबतींत पुरुषांशीं स्पर्धा करणाऱ्या तेथील स्त्रियांचीं आपण कौतुकगीतं गात असतों ; पण

अविवाहित राहून आपल्या ध्येयाप्रीत्यर्थ झटणाऱ्या तिकडल्या मिशनरी स्त्री-पुरुषांचा वर्ग आपल्याकडे आहे का? पुरुषांबद्दल मी तुला काय सांगणार? पण स्त्री-मिशनरी आपल्याकडे आहेत काय – ध्येयासाठी आजन्म अविवाहित राहणाऱ्या? बुद्धकालांत तरुण भिक्षु-भिक्षुणींचा धर्मप्रसाराच्या व समाजसेवेच्या कामांत केवढा अुपयोग भगवान् बुद्धानं करून घेतला होता!

हजारो वर्षांपूर्वीचा बौद्ध काल सोडला तरी पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वीचा स्वामी विवेकानंदांचा काळ घ्या.

आजच्या काळांत महर्षि कर्वे यांनीहि महाराष्ट्राला संदेश देतांना म्हटलं आहे, "स्त्रियांची योग्यता वाढेल आणि कुटुंबांत व समाजांत त्यांना योग्य मान मिळेल अशा प्रकारचं मनावर सुसंस्कार करणारं शिक्षण मातापितरांनी आपल्या मुलींना दिलं पाहिजे. थोड्याशा स्त्रियांनी कौमार्यव्रत पत्करून किंवा दुर्दैवानं वैधव्यांत पडलेल्या स्त्रियांनी त्याच अवस्थेंत राहून लोकसेवेला आपलं आयुष्य अर्पण केलं तर तें अिष्टच आहे."

'अविवाहित मिशनरी' या संस्थेला आपल्याकडे अुत्तेजन नाही. मुलींना संस्कार-क्षम असं खरं शिक्षण देण्यापेक्षा लग्नाच्या बाजारांत तिची किंमत वाढविणं हें पुष्कळ आओबापांचं व पालकांचं ध्येय असल्यावर तुम्हा मुलींच्या ध्येयाची – तें बहुतेक असतच नाही म्हणा – जोपासना कशी होणार? साधारणतः आठव्या अियत्तेंत तुमच्यापैकी कित्येकांना तुमच्या लग्नाची कुणकूण अैकू येते. नववींत वरसंशोधनाला सुरवात होते. दहावींत हुंड्याची जुळवाजुळव होत असतांना अकरावींत गेल्यावर तुम्ही अस्. अेस्. सी. परीक्षा पास होणारच अशी ग्वाही वरपक्षाला दिल्यावर निकालाची वाट न पाहतांच तुमचा विवाह होतो. संपलं शालेय जीवन नि ध्येयाची समाप्ति! अशा प्रकारें कित्येक दुर्दैवी मुलींचीं सुखस्वप्नं विरून जात असतील.

रिकामपणचं अविवाहित व्रत निरर्थक आहे. अविवाहित राहायचं तर त्यामागं कांहीतरी अुच्च अुद्देश असावा लागतो. कित्येक पाश्चात्य स्त्रियांनी आपले देह व आपलीं मनं देशकार्याला वाहून घेतलीं आहेत. जगाच्या ज्ञानांत भर घालणाऱ्या पाश्चात्य स्त्रियांची अमित यादी पाहिली की आपलं मस्तक त्याच्यापुढं आपोआप नम्र होतं. झाशीच्या राणीसाहेबांपुढं आपली यादी कांही फारशी सरकत नाही. नांवं घ्यायचींच तर हीं पाहा – अलिझाबेथ फ्राय, फ्लॉरेन्स नाअिटिंगेल, मॅडम क्युरी, मेरी किंग्सली,

मॅडम नील, अिसाबेल हचिन्सन, ग्लोरिया हेलिस्टर, हेलन केलर—अेक की दोन नांवं सांगूं ?

अिंग्लंडमधील तुरुंगाची अवस्था १९१३ पर्यंत भयंकर होती. अेकाच खोलींत दोन–तीनशे स्त्री-कैदी अर्धनग्न स्थितींत झोपत. आसपास गवताच्या पेंढ्यांचा, कचऱ्याचा ढिगारा ! फ्रायबाअींना हें पाहवेना. ही परिस्थिति सुधारण्याचं ध्येय तिनं आपल्यापुढं ठेवलं व तें शेवटासहि नेलं. दलित स्त्रियांचा अुद्धार तिनं केला. कैदी स्त्रियांना तिनं शिक्षण दिलं. त्यांच्यांतील मानवतेला प्रकट करण्याचं सामर्थ्य त्यांच्यांत तिनं अुत्पन्न केलं. कैदी हा अेक माणूस आहे, त्याला सुधारण्याची व माणुसकींत भाग घेण्याची शक्यता आहे हें तिनं सिद्ध केलं.

—आणि फ्लॉरेन्स नाअिटिंगेल तर लहानपणापासून कुत्र्या-मांजरांच्या व शेजारपाजाऱ्यांच्या सेवेंत रमूं लागली होती. अितर मुली जेव्हा कादंबऱ्यांचं वाचन करण्यांत रममाण होत असत, त्या वेळीं ही तुमच्या वयाची मुलगी परिचारिकेच्या धंद्यावरील पुस्तकांचं वाचन करीत होती. आजूबाजूचे लोक काय म्हणतील, आअीबापांचा विरोध होअील की काय, याविषयी तिनं विचारच आणला नाही मनांत. चांगल्या गोष्टीला कुणाकडूनहि विरोध होणार नाही हें तिला पक्कं माहीत होतं. ध्येयानं अुजळलेल्या ह्या मुलीनं क्रिमियन युद्धांत लष्करी रुग्णालयांत बेसुमार कष्ट करून सुधारणा केली व ती करीतकरीत आजच्या भव्य रुग्णालयांना जन्म दिला. सेवा, शिस्त व स्वच्छता हें आजच्या रुग्णालयांचं नाअिटिंगेलनिर्मित ध्येय आहे. अेवढ्याशा ध्येयवादी मुलीचं केवढं हें कर्तृत्व ! चंदनाचं जीवन जगण्याची केवढी ही तिची धडपड !

मेरी किंग्सली हिचं नांवहि कदाचित् तुम्हीं अैकलं नसेल ! शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी मुलींना कसलं शिक्षण नि कुठल्या शाळा ! मेरीच सारं बालपण नेहमीच आजारी असलेल्या आअीबापांच्या सेवेंत गेलं. मेरीचा बाप शास्त्रज्ञ होता म्हणून अनेक ग्रंथांचं वाचन तिनं आवडीनं बालपणापासूनच सुरू केलं. या लहान मुलीला कुत्र्याची, सशाची आवड नव्हती. ती कोंबडे बाळगी, त्यांची झुंज पाहण्यांत तिला मौज वाटे. अशी ही विचित्र मुलगी आअीबापांच्या मृत्यूनंतर अेकाकी जीवन जगत होती. आफ्रिकेंतील रानटी जातींबद्दल तिथं वाचलं होतं. त्यांच्याविषयी प्रत्यक्ष माहिती मिळविण्याचं तिनं ठरविलं. तिनं खूप ठरविलं पण तिला तिथं जाण्याची

परवानगी बोटीवरच्या अधिकाऱ्यांनी खचित दिली नसती. कांगोमधील नरभक्षक जातींतून हिंडण्याचं धाडस पुरुषालाहि करतां आलं नसतं; मग मेरीसारख्या तरुण मुलीला तें कसं शक्य होतं, याचा विचार बोटींवरील अधिकाऱ्यांनी खचित केला असता. म्हणूनच तिच्या वडिलांच्या शास्त्रज्ञ मित्रांनी तिला पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील व कांगो नदीमधील माशांचे नमुने गोळा करायचं निमित्त करून आफ्रिकेला जाण्याचा सल्ला दिला. कल्पना करा, भाषा माहीत नाही, चालीरीति माहीत नाहीत, हवामान अनुकूल नाही — अशा परिस्थितींत नरभक्षक टोळ्यांच्यासमवेत लहानशा कॅनो बोटींतून मेरी कांगो नदींतून कशी हिंडली असेल!

मॅडम नील ह्या बाअीनं गुप्त वेषानं ल्हासा-तिबेट येथे राहून त्या देशाची बरीच भौगोलिक माहिती गोळा केली. अिसाबेल हचिन्सन ह्या नांवाच्या बाअीनं अुत्तर ध्रुवालगतचे अलास्का, आयर्लंड, ग्रीनलंड वगैरे बर्फाळ प्रदेशांतील वनस्पतींचे नमुने गोळा केले. हें करीत असतांना तिला केवढ्या धाडसाच्या प्रसंगांना तोंड द्यावं लागलं असेल! ग्लोरिया हेलिस्टर या अमेरिकन बाअीनं तर समुद्रांतील अनेक वनस्पती व प्राणी यांचे नमुने गोळा केले आहेत. असंख्य नमुने! शास्त्राची विलक्षण आवड असणारी पोलंडची मेरी स्लोडोव्हस्का पॅरिसमधे शास्त्राध्ययनांत काल घालवीत असतां आपलं ध्येय विवाहानंच साध्य होणार आहे हें समजतांच तिनं पेरी क्युरी या शास्त्रज्ञाशीं विवाह केला व रेडियमच्या शोधाचा अर्धा वांटा अुचलला. स्वतः अंध असलेली हेलन केलर अविवाहित राहूनहि जगांतील अंधांची सेवा अद्यापहि करीत आहे.

पाश्चात्य देशांतील सेवाव्रत घेतलेल्या स्त्रियांची ही अशी अखंड परंपरा आहे. भारतांतील अनाथ, अपंग, दीनदुबळ्यांची सेवा, मुलींचं शिक्षण यांसाठी कितीतरी खिस्ती मिशनरी स्त्रिया अविवाहित राहून त्यागवृत्तीनं आपापल्या मिशननं सोपविलेलीं कार्यं करीत असतात. किशोरी, आता भारतांत तुमच्यासाठी अशा प्रकारचीं कांहीच का कार्यक्षेत्रं अुरलीं नाहीत? अुलट, केव्हाहि नव्हती अेवढी आता कार्यकर्त्यांची जरूर आहे आपल्या देशाला. अज्ञान, दैन्य, दारिद्र्य हीं देशाला पोखरीत आहेत. त्यांचं अुच्चाटन करण्यासाठी तुम्हांला फ्राय बनलं पाहिजे, नाअिटिंगेल बनलं पाहिजे, मेरी क्यूरी बनलं पाहिजे.

किशोरी, तूं म्हणशील, हे मोठाले प्रश्न आम्ही मुली कसे सोडविणार! — नाही, या वयांत तुम्हाला ते सोडवितां येणार नाहीत खरं, पण अशा ध्येयांचीं बीजं ह्या

वयांत पेरावयास तुम्हीं शिकलं पाहिजे. प्रेमानं त्यांची जोपासना केली पाहिजे, म्हणजे तीं मूळ धरतील, तारुण्यांत त्यांचा वृक्ष होईल. होकायंत्र पाहिलं आहेस ना? त्याचा काटा फिरत असतो. पण अेकाच दिशेला तो स्थिर होतो – अुत्तर ध्रुवाकडे! अेवढी ती सुअी ती, पण तुफानांना, वादळांना ती दाद देत नाही. आपल्या ध्येयाला अेकनिष्ठ राहणं तेवढं तिला माहीत असतं. त्या सुअीची भूमिका तुम्हीं घ्या.

किशोरी, ध्येय ह्या प्रचंड शब्दानं घाबरून जाअू नकोस. तुम्हां मुलांमुलींचा शिक्षणक्रम आता अेकच आहे. स्त्रीपुरुषांच्या समतेच्या या युगांत तुमच्यापुढं अुद्योगधंद्यांचीं, नोकरीचाकरीचीं ध्येयंहि समान आहेत; पण विषमता दूर करण्याचा प्रयत्न करताना तुमचे स्त्रियांचे खास विषय तुम्ही दृष्टीआड करतां. किशोरी, तुला दररोज केसांचे नवेनवे प्रकार हवे असतात. मग आज कुसुमसारखे कानांवर फुगे काढ, शेवंतीसारख्या पांचपेडी शेपट्या मोड, तर भानुमतीसारखा झुलता आंबाडा घाल – असं तुझं सारखं चालतं. पण कलेचं अनुकरण करण्यापेक्षा कलेची निर्मीती होण्याचा तूं प्रयत्न केला पाहिजे. अितर अनेक शास्त्रांप्रमाणं केशभूषेचंहि शास्त्र आहे. तुला केशकलाविशारद होअून स्वतःचं केशसौंदर्य वाढवितां येअीलच; परंतु त्या विद्येनं तुझा पोटपाण्याचा प्रश्नहि सुटण्याची शक्यता आहे. चित्रपटसंस्थांतून अशा स्त्रीकेश-कलाविशारदांना खात्रीनं वाव मिळण्यासारखा आहे आजच्या काळांत.

शिवण-भरतकाम हा तर तुम्हां स्त्रियांचा खास विषय! त्यांत तरबेज होण्याचं ध्येय तुम्हां मुलींत फारसं दिसून येत नाही. खास स्त्रियांनी चालविलेलीं शिवणकामाचीं भव्य दुकानं मुळीच पाहावयास मिळत नाहीत. अितकी ह्या धंद्याबद्दल तुमच्यांत अुदासीनता आहे.

ह्या व अशा प्रकारच्या अनेक धंद्यांचं ध्येय आतापासूनच तुम्हांला मनांत बाळगतां येअील. हे झाले पोटापाण्याचे अुद्योग! त्यांच्या मागंहि ध्येय असावं लागतं. पण मिशनरी जीवनामागं त्यागवृत्ति लागते. अशा त्यागी स्त्रीपुरुषांची आपल्या देशाला जरूर आहे. अर्थात् तुमच्यासारख्या मुलांमुलींतूनच असे स्त्रीपुरुष अंकुरित व्हायचे. पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी लग्न करण्यापेक्षा ध्येय गाठण्यासाठी अविवाहित राहणं चांगलं नव्हे का? भारतांत शेकडो आदिवासी जाति आहेत. रानावनांत, डोंगरकपारींत त्यांच्या वसाहती असतात. त्यांच्या अनेक भाषा, चालीरीति. त्यांचं जीवन कसं समृद्ध होईल, आपलींच भावंडं म्हणायला तीं कशीं समर्थ होतील

याचा विचार करणं, त्यांच्याविषयी माहिती गोळा करणं, ही गोष्ट अशक्य नाही. परदेशी-परधर्मी मिशनरी लोकांनी भारतीय दीनदुबळ्यांची सेवा केली आहे. अशा प्रकारचं सेवाव्रत तुम्हीं स्वेच्छेनं पत्करलं पाहिजे – मग तुम्ही अविवाहित राहा की राहूं नका. अशाच लोकांची, स्त्रीपुरुष व्यक्तींची संघटना आपल्या राष्ट्राच्या अभ्युदयासाठी आपण अुभी केली पाहिजे. मातींतून निर्माण झालेल्या शालिवाहनाच्या सेनेप्रमाणं ती मग आपल्या राष्ट्राचं सतत रक्षण करील !

• • •

प्रकरण १९ वें

अिंद्रधनूच्या टोकाशीं

" **कि**शोरी, तें पाहा!"

" काय?"

" अिंद्रधनूचं टोक."

" कुठं आहे? तिथं तर प्रकाशाचाच झोत दिसतो."

" होय, गुप्त धनाचा झगझगीत प्रकाश आहे तो."

" गुप्त धन म्हणतेस?"

" होय, गुप्त धन! अिंद्रधनूच्या टोकाशीं गुप्त धन असतं असं सांगतात."

" कुणी नेत नाही तें?"

" कसं नेतां येअील वाटेल त्याला? ह्या अिंद्रधनूच्या पुलावरून ज्यांना सुरक्षितपणें त्या टोकाशीं पोचतां येअील त्यांनाच तें दिसणार. दुरुन सुंदर, सप्तरंगी दिसणारा हा पूल ओलांडणं फार अवघड आहे! आतापर्यंत त्याच्या अवघड व निसरड्या चढाची कल्पना दिली आहे मीं तुम्हांला. तो पार व्हायला तुमच्या आयुष्यांतलीं सात वर्षं—तेरा ते अेकोणीस वर्षं तुम्हांला खर्च करावीं लागतात; पण पुढच्या सत्तर वर्षांची तयारी या काळांतच तुम्हाला करतां येते. दिसायला मोहक पण तोल संभाळायला कठीण असा हा पूल आहे. जरा अिथंतिथं पाहायचा प्रयत्न केलांत, पाअूल वाकडं पडलं की कपाळमोक्ष ठरलेला! कुठची धन नि कुठची दौलत!"

सूर्यानं अिंद्रधनूला सप्तरंगांची देणगी दिली आहे, त्यांतून घेणाऱ्यानं कोणता रंग घ्यायचा हें ठरवावं लागतं. तूं विचारशील, की सूर्य जर अितके सुंदरसुंदर रंग देतो तर कावळा काळाच कां? पोपट हिरवाच कां? फुलं नानारंगी कां? काय अुत्तर देणार? अेकेकाची आवड झालं! तुमच्या वयाच्या ह्या सात वर्षांत – तेरा ते अेकोणीस वर्षांत– जीवन तुम्हांला हें सप्तरंगांचं अिंद्रधनु बहाल करतं. कोणत्या रंगानं दिपून जायचं, कोणत्या रंगानं जगताला अुजळायचं हें तुम्हींच ठरवायला पाहिजे.

मानवी जीवनांतला सर्वांत महत्त्वाचा काळ असतो हा! बाल्य व तारुण्याला सांधणारा हा पूल! अिंद्रधनूचा पूल! तुम्ही विचाराल, साऱ्या जीवनाचा भार ह्याच काळवर कां? आम्ही तर अिवल्याशा कन्यका! कां?– नदीचा अुगम लहान असतो; पण ती जेव्हा मोटी होते तेव्हा तिच्या प्रवाहांत मोठालीं जहाजं फिरतात. दोन्ही तीरांना समृद्ध करीत करीत विशाल सागरांत समरस होणं हेंच ती आपलं ध्येय समजते. तिच्या अुगमाकडे का दुर्लक्ष करायचं असतं?

लहान कळी जर म्हणेल, 'मी अिवलीशी, मी काय मोठं सत्कृत्य करणार?' पण अशी साशंक होतहोतच ती फुलते, सर्वत्र सुगंध पसरविते व पटकन् देवाच्या डोक्यावरहि बसते.

आणि आपला बटु वामन माहीत आहे ना? बळीसारख्या समर्थ दात्याकडून मिळालेली पृथ्वी तो आपल्या तीन चिमुकल्या पावलांनी व्यापून टाकतो. विश्वांत लहान मुलांनाहि कसं समरस होतां येअील याचा सक्रिय पाठ त्यानं तुम्हांला दिला आहे.

स्वामी रामदास मोठेपणीं समर्थ झाले. बालपणीं ते अेकदा घरच्या कोपऱ्यांत बसून राहिले. त्यांची आअी घरभर त्यांना शोधूं लागली. कुठंहि सापडेना तिचा बाळ! अेका कोपऱ्यांतून रडण्याचा हुंदका मात्र आला. ती धावतच तिथं गेली. अंधारांत कांही दिसेना. हुंदक्यांवर हुंदके तेवढे अैकूं येत होते. तिनं हाक मारली, "बाळ, कुठं आहेस?" बाळ आअीला बिलगला. त्याच्या अश्रूंनी आअीचा पदर भिजून गेला.

"कां रे रडतोस? विंचू चावला?" तिनं विचारलं.

"नाही! चिंता वाटते ग आअी!"

"कुणाची?"

"विश्वाची!"

आअी फसकन् हसली. जगाच्या काळजीनं व्याप्त होणारा तो बाळ तुमच्याच वयाचा होता. त्या वेळचं भारतीय जग त्यानं पाहिलं होतं. भारत दीन झाला होता. धर्म नाहीसा झाला होता. मुसलमानांच्या स्वाऱ्यांनी राष्ट्र खिळखिळं होत होतं. अवर्षण, दुष्काळ या निसर्गाच्या कोपानं लोकांची अन्नान्नदशा झाली होती. त्या लहान बाळाच्या हातीं ही स्थिति सावरण्यासारखं काय होतं त्या वेळीं ? नुसतं चिंतन ! पण चिंतनांतूनच कृति निर्माण होते. रामदास राष्ट्रसंत झाले; समर्थ झाले ! मराठी राज्य निर्माण करण्यांत शिवाजीमहाराजांना त्यांनी मदत केली.

– आणि ते बालयोगी – श्रीज्ञानदेव ! मराठी भाषेंतल्या अपूर्व ग्रंथरत्नाला त्यांनी जन्म दिला त्या वेळीं ते तुमच्याच वयाचे होते, केवळ पंधरा-सोळा वर्षांचे !

अीश्वराच्या चराचरांतील वास्तव्याचा साक्षात्कार घडवून आणणारा प्रल्हाद बाळच होता ! विश्वरूप परमेश्वराच्या दर्शनाचा हट्ट घेणारा ध्रुव बाळच होता. किशोरी, ही बालरत्नांची मालिका भारताचं भूषण आहे. भारताच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक व साहित्यिक क्रान्तीचे नेते ही बालमंडळीच होती, म्हणून तुम्हीच आजच्या बालबालिका जगाचीं आशास्थानं आहांत. तुम्ही म्हणाल, "हीं सारीं तर मुलं," हो, मुलंच. पण आता मुलांमुलींचा काळ वेगळा, कर्तृत्व वेगळं असं राहिलं नाही. "आम्ही लहान; आम्ही काय करणार ?" अशी लघुवृत्ति भारतीय बालबालिकांनी मनांतहि बाळगू नये.

चांगल्या विचारांचे संस्कार, शिक्षण घेत असतांना याच वयांत तुमच्यावर व्हायला पाहिजेत. शिक्षणाचा हेतु म्हणजे मनोभूमिकेची वाढ; पाठ्य पुस्तकांची वांती नव्हे ! मोठेपणीं समाजाच्या सुखदुःखांशीं अेकरूप व्हायला जें मदत करतं तें खरं शिक्षण ! अंतर्मन जेव्हा जागृत होतं तेव्हा तें नुसत्या पुस्तकी शिक्षणानं समाधान पावत नाही. समाजाच्या सुखदुःखाची ओळख करून घेअून मनाला शमवावं लागतं.

किशोरी, तुझ्या वर्गांतील सुमति नेहमी गैरहजर कां राहते ? वत्सलेला फी विचारली की ती कां रडते ? वर्गांतलीं पुस्तकं चोरीला गेलीं की जया नेहमी तोंड कां लपविते ? कृष्णी शाळेंत कां जात नाही ? घरींच कां राहते ? मधुगंधेला सहली कां आवडत नाहीत ? याचा विचार तुझ्या मनाला केव्हातरी चाटून गेला आहे काय ? हें झालं शाळेच्या समाजाविषयी. पण बाहेर पसरलेल्या समाजाच्या विकृतीचीं कारणं तुम्हांला या छोट्या समाजांतच सापडतील. सुमति गैरहजर राहते – ती आपल्या आअीबापांची सर्वांत वडील

मुलगी—धाकट्या भावंडांवर देखरेख, आअीचीं बाळंतपणं, घरकामं कदाचित् तिलाच करावीं लागत असतील! वत्सलेला चार भाअू. भावांच्या शिक्षणाची सोय वडील आधी करणार. मग वत्सलेची फी वेळेवर देण्याची शक्यता नसते तिच्या वडिलांना! बिचारी वत्सला रडणार नाही तर काय करील?

नवीन वर्ष सुरू झालं. वर्गाचा अभ्यासहि सुरू झाला, पण वडील कांही पुस्तकं घेअून देत नाहीत—दुर्लक्ष करतात. सर्व भावंडांना पुस्तकं घेअून द्यायला पैसे नसतात त्यांच्याकडे. वर्गात बाअी बसूं देत नाहीत पुस्तकांवांचून. मग जया पुस्तकं मिळविण्याचा चोरीचा जवळचा मार्ग पसंत करते.

सामाजिक विषमतेची—आर्थिक निकृष्टतेची अशी ओळख तुम्हांला याच काळांत झाली की मग पुढील जीवनांत ती दूर करण्याचे अुपाय तुम्हाला शोधून काढणं सोपं जातं. जीवनसागरांत शिरायचं असतं ना तुम्हाला? मग समुद्रांत पाय भिजविलेच पाहिजेत. पायांखालची घट्ट वाळू कशी भुळभुळ करीत निसटते, पायाला गुदगुल्या कशा होतात, लाट 'आली आली' म्हणतांच कशी विरून जाते, याची थोडीशी कल्पना तुम्हांला या काळांत येते. समाजांत कित्येक मुली ज्ञानाची भूक असूनहि तडफडतात. भुकेलेल्यांना चतकोर भाकर देण्याची दया भारतांतील अत्यंत दरिद्री माणूसहि दाखवितो. मग आपल्या अज्ञ बहिणींची ज्ञानाची भूक शमविण्याचं सामर्थ्य निर्माण करणं तुम्हांला शक्यहि होतं. ज्ञान हीच जीवनाची खरी भाकर आहे.

तुमचं जीवन सर्वस्वीं तुमच्याकरिता नसतं, अनेकांचा त्यांत वांटा असतो. पण त्यांतल्या त्यांत आपल्या देशाचा वांटा फार मोठा असतो. शिस्त, आज्ञाधारकपणा व अैक्य या सद्गुणांची आज आपल्या देशालाच नव्हे, तर सर्वच जगाला गरज आहे. कोणत्याहि गुणांची वाढ अभ्यासानं होते. तुमचं हें वय अभ्यासाचं आहे. ज्या नियमांनी तुम्ही अभ्यास पक्का करतां त्याच नियमांनी या सद्गुणांची वाढ करावयास तुम्हीं शिकलं पाहिजे. प्रेमावांचून अैक्य संभवत नाही. प्रेमाचा अंकुर जन्मापासूनच प्रत्येकांत असतो. लहान बालकं पाहा! कुणाशींहि तीं हसतात, कुणावरहि झेप टाकतात, सर्पाला धरायला धावतात, क्रूर जनावराशींहि खेळायला पाहतात. पशूहि त्यांच्या वाटेला जात नाहीत. प्रेमानं प्रेम जिंकतां येतं. पण वाढत्या वयाबरोबर स्वार्थ, मोह, अीर्षा, द्वेष अित्यादि विकार मनांत अुत्पन्न होतात व मूळ प्रेमाचा निर्मळ झरा गढूळ होतो; म्हणून चिरकाल टिकणारं, अविकृत प्रेम करायला शिकलं पाहिजे तुम्हीं. मग तें अभ्यासांतील

विषयांवर असो, कलेवर असो, पशुपक्ष्यांवर असो, गुरुमाअुलीवर असो की देवावर असो – पण प्रेमाचा झरा सतत वाहता ठेवावा लागतो.

खरं प्रेम म्हणजेच खरं ज्ञान ! ज्या विषयावर तुमचं नितांत प्रेम असतं त्या विषयाचा अभ्यास तुम्हांला सुलभ जातो, नाही का ? तुम्ही सारे विषय शिकलांत, परीक्षेंत वरचा क्रमांक मिळविलांत ; पण आढ्यता, अहंकार व वरचढपणानं अितरांशीं वागूं लागलांत तर तुमच्या विद्वत्तेचा काय अुपयोग ? पिकल्या केळाच्या सालपटा-प्रमाणं वाटेल तिकडे फेकल्या जाल ! आजच्या जगाला जर कशाची जरूर असेल तर प्रेमाची. अेखाद्या जपानी मुलीनं अमेरिकन तरुणाशीं लग्न केलं किंवा अेखाद्या हिंदी मुलीनं आफ्रिकेंतील निग्रोशीं लग्न केलं म्हणजे विश्वप्रेम नव्हे ! तुम्ही मोठ्या होअून ज्या विशाल जीवनांत प्रवेश करणार आहांत त्याची रम्यता वाढविण्याचं कार्य तुम्हांला करावयाचं आहे, तें प्रेमावांचून कसं साधणार ? प्रेम करावयाचं म्हणजे त्या जगाची माहिती तुम्हीं करून घेतली पाहिजे. विज्ञानामुळं जगाची मर्यादा संकुचित होत आहे. आज अुत्तर ध्रुवाकडील अेस्कीमो मुलीला तुम्ही येथून विचारूं शकतां, " काय ग नोगाक, येशील का आमच्याकडे हळदीकुंकवाला ? " अुलट अेखादी रेडाअिंडियन मुलगी विनोना तुम्हाला विचारूं शकते, " काय ग रंभा, तुझ्या वाढदिवसासाठी पाठविलेली रंगीत पिसांची शाल तुला आवडली का ? "

जगाची मर्यादा जरी संकुचित होत असली तरी ज्या जगांत तुम्हांला वावरावयाचं आहे, त्याचं रूप तितकंसं मोहक नाही. साऱ्या जगाची मोडतोड होते आहे असं वाटतं. जिथं पाहावं तिथं वर्णद्वेष, कलह, असमाधान, चढाओढ, अशांति ! हें पाहून जग विनाशाकडे तर घरंगळत चाललं नाही ना, असं वाटतं. तोंच तुमच्यासारख्या वयांत येणाऱ्या निष्पाप पिढीकडे आशेनं नजर लागते – कारण तुमचीं मनं संस्कारक्षम आहेत, शरीरं आकार धरणारीं आहेत.

किशोरी, त्या दिवशीं तुला शाळेंत मुलींनी रडूबाअी म्हटलं म्हणून तूं खट्टू झालीस, शाळेंत जाणार नाही म्हणून हट्ट घेअून बसलीस; पण तुझं रडूं भेकडपणाचं नव्हतं. कुत्र्याच्या पिलाला कुणींतरी खट्याळ मुलीनं दगड मारल्यानं तें कसं विवळत होतं म्हणून तुझं अंतःकरण पिळवटून निघालं होतं. अुत्कट भावनेनं हृदयसरोवराचा बांध फुटून डोळ्यांतून अश्रुबिंदु सहजासहजीं ठिपकत नाहीत. अंतःकरणांत करुणा अुत्पन्न होअून हृदय विरघळतं तें मैत्री, प्रेम, वात्सल्य यांमुळंच ! स्त्रियांमधे हा गुण अधिक

प्रमाणांत असतो. असे सहानुभूतीचे अश्रु अुभे राहात नाहीत त्या नेत्रांना अंजनं फासलीं, भुवया कातरल्या, कानांपर्यंत रंगविल्या नि पापण्यांना कृत्रिम झालरी लावल्या तरी त्या नेत्रांचं महत्त्व नाही – त्यांना सौंदर्य नाही. प्रेमाश्रूंनी जे ओले होतात तेंच नेत्रांचं सौंदर्य – तो रडवेपणा नाही. आणि या अर्थानं तुम्हीं रडूबाअीच व्हायला पाहिजे; मग तुमच्या अश्रूंना कुणी मोत्यांची माला म्हणोत किंवा दवबिंदु म्हणोत !

कुणावरील अन्याय, कुणाचं कष्टी जीवन, कुणावरील संकट पाहतांना दुःखाची आच जेव्हा अंतःकरणांना तापविते व हृदय फोडून अश्रुरूपानं बाहेर पडते त्या अश्रूंना कशाचीहि अुपमा अपुरी ठरेल ! यासाठी कशावर तरी अुत्कट प्रेम करून अेकरूप झालं पाहिजे.

प्रभु रामचंद्रावर अेकभाव दाखवितांना भक्त आपल्याला: प्रिय असलेल्या व्यक्ति त्यांच्यांत अेकरूप झालेल्या पाहतो. भक्त म्हणतो –

माता रामो मत्पिता रामचंद्रः
स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुः
नान्यं जाने नैव जाने न जाने ॥

रामामध्ये सर्व नातेवाअीकांना पाहिल्यावर हा माझा, हा परका असा भेद अुरत नाही. श्रीराम म्हणजेच विश्व ! विश्वप्रेम बाणण्यासाठी असं अेका विभूतीवर, अेका विषयावर किंवा ध्येयावर अकृत्रिम प्रेम करावयास शिकलं पाहिजे.

असंच स्वदेशप्रेमांतून विश्वप्रेम प्रकट होत असतं. दीन, दुबळी, दरिद्री माता असली तरी सत्पुत्र, सुकन्या तिच्यावर अतिशय प्रेम करतात. आपल्या देशावरहि असंच प्रेम करायला शिकलं पाहिजे. पण साध्या 'वंदे मातरम्' गीतांतहि मायदेशा-बद्दलच्या आपल्या प्रेमभावना अनेक मुली व्यक्त करूं शकत नाहीत. सूत्रधाराप्रमाणं कांही मुलींचा थवा वंदनगीत गातो. बाकीच्या मुखस्तंभ राहतात किंवा टिवल्या-बावल्या करतात. सार्वजनिक समारंभांतून, शाळाशाळांतून हीं दृश्य पुष्कळदा पाहावयास सापडतात. अिंग्लिश, अमेरिकन मुलींच्या तोंडून त्यांचींत्यांचीं राष्ट्रगीतं अैका शक्य असल्यास ! – म्हणजे देशाभिमानानं हृदय कसं कंपायमान होतं याची कल्पना येअील.

भारताचे अेक सुपुत्र स्वामी रामतीर्थ स्वतःला भारतच समजत. ते म्हणत – " मी सदैव भारत आहें. अखिल भारतवर्ष हें माझं शरीर आहे. कन्याकुमारी हे माझे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 39८५३ वि: निबंध १२५
क्रमांक 9309 नों. दि. ५/११/६२

चरण असून हिमालय हें माझं मस्तक आहे. या माझ्या मस्तकांतून [illegible] अुगम पावली आहे. विंध्याचल हें माझं कटिवस्त्र आहे. कारोमांडल हा माझा अुजवा व मलबार हा माझा डावा पाय आहे. मी संपूर्ण भारत आहें. पूर्व व पश्चिम हे माझे बाहू आहेत. ते पसरून माझ्या बांधवांना मी प्रेमानं आलिंगन देतों. हिंदुस्थान हा माझ्या शरीराचा सांगाडा आहे व माझा आत्मा हा साऱ्या भारताचा आत्मा आहे. मी चालतांना सर्व आर्यावर्त चालत आहे व मी बोलतांना सर्व आर्यावर्त बोलत आहे असं मला वाटतं ! ”

केवढी विशाल अेकरूपता ही ! अशी अेकरूपता साधायचा अभ्यास केला पाहिजे. हातीं घेतलेल्या कामाशीं अेकरूप होतांहोतांच अशी विश्वव्यापी अेकरूपता साधतां येते.

तुमच्या जीवनांतील चालू काळ जरी अिंद्रधनूंतून जात असला तरी पुढल्या काळांतहि तुम्हांला तारेवरची कसरत करायची सवय ठेवावी लागेल ! स्वतंत्र भारतांतसुद्धा अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी अर्धी भाकर खाणारांची संख्या अधिक आहे. भारताच्या विशाल भूमीवर आश्रयासाठी माणसं वणवण फिरतात व शेवटीं कबुतरांची वसाहत शोभेल अशा काडेपेटीवजा घरांचा कसाबसा आश्रय घेतात. अन्नासाठी, वस्त्रासाठी वखवखलेल्या मुलांबाळांची समजूत घालतांना रडायची पाळी येते मातांपितरांवर ! ‘ अे बॉंब, ’ ‘ अेच् बॉंब ’ या नवीन अस्त्रांच्या प्रयोगांनी आपल्या मुलांबाळांची राखरांगोळी होअू नये म्हणून साऱ्या जगांतील माता अस्वस्थ झाल्या आहेत. राखरांगोळी पतकरली पण शारीरिक विकृति नको. अशा प्रयोगांनी कुणी आंधळे झाले आहेत; कुणाचा अेक पाय तर कुणाचा अेक हातच गायब झाला आहे ; तर कुणाच्या नाकाचीं नुसतीं भोकंच अुरलीं आहेत ; कुणाचा चेहरा विद्रूप झाला आहे तर कुणी वेडे झाले आहेत ! अशा प्रजेवर राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा तरी कोण शहाणा बाळगील ? मृत्यूवांचून भुतं निर्माण करणारीं हीं आधुनिक अस्त्रं आहेत !

या सवालाला अुत्तर देण्याची तुमच्या पिढीनं तयारी केली पाहिजे. तुम्हीं म्हटलं पाहिजे – जग मानवांसाठी आहे ; भुतांसाठी नाही ! जगाला आम्ही सौंदर्य देअू ; निर्भय करूं ! सारं विश्व आमचं क्रीडांगण करूं ! आमची विद्या, आमचं तत्त्वज्ञान सर्वांसाठी खुलीं राहतील. तासातासांनी, दिवसांदिवसांनी व फुकट गेलेलीं वर्षं न मोजतां नवीन जगाची रचना आम्ही करूं ! – ज्या जगांत सारीं माणसं स्वतंत्र राहतील, अेकमेकां-विषयी साशंक होणार नाहीत व सन्मानानं जीवन जगतील असं जग !

—आणि स्पुटनिकच्या या युगांत चंद्रावर जाण्याची तुम्हीं अिच्छा केलीत तरी वावगं होणार नाही. स्पुटनिकची भाषा तुम्हांला या वयांत चांगली समजते हें तुमचं केवढं भाग्य !

तुमच्याचसारखी — तुमच्याच वयाची जेन नांवाची मुलगी आपल्या मावशीला सांगत होती, " मावशी, मी मोठी झालें म्हणजे चंद्रावर जाअीन ! "

" कधी म्हणालीस ? "

" मोठी झाल्यावर — लवकरच ! "

" कां ? तिथं तुला कांऽही मिळणार नाही. नुसते डोंगर नि वाळवंट — मैदान ! माणसं नाहीत नि कांही नाही तिथं ! "

" माणसं नाहीत ? — कां ? "

" तिथं वातावरण नाही. माणसांना जगायला प्राणवायु लागतो, तो तिथं नाही म्हणतात — म्हणून माणसं तिथं राहूं शकत नाहीत. "

जेन थोडा वेळ विचार करूं लागली व म्हणाली, " त्यांत काय मोठंसं ? — देव अशींच माणसं निर्माण करील तिकडे की ज्यांना प्राणावायु लागणारच नाही ! "

केवढा आशावाद ह्या मुलीनं व्यक्त केला आहे ! पाश्चात्य मुली स्पुटनिकची भाषा समजूं लागल्या आहेत. तुम्हीहि त्यांच्यामागं राहतां कामा नये. मग तुम्हांलाहि वज्रेश्वरीची सहल चंद्रावर नेण्याची अिच्छा झाली तर नवल नाही. याचा अर्थ हाच, की तुम्हीं आधुनिक बनलं पाहिजे. पोषाखांतील, सौंदर्यसाधनं वापरण्यांतील आधुनिकपणा हा खरा आधुनिकपणा नाही. 'अमूक अेक कार्याकरिताच मी जगलें आहें — माझा देह झिजविला आहे' असं जेव्हा छातीठोकपणें तुम्हांला सांगतां येअील तेव्हाच तुम्ही आधुनिक आहां असं म्हणतां येअील; नाहीतर निर्हेतुक विद्या, निरर्थक सुख, भ्रामक समारंभ, असंबद्ध भाषण यांपेक्षा कुणावर तरी अवलंबून असणारं पण सचोटीचं, दयाबुद्धीचं, अकृत्रिमतेचं, साधेपणाचं जुनं जीवन काय वाअीट ?

साधेपणा ही भारतीय जीवनाची गुरुकिल्ली आहे. ती गेली म्हणजे 'आपण खरे दरिद्री होअूं. जेव्हा माणूस झोपेंतूत जागा होतो तेव्हा त्याला प्रकाशाची अपेक्षा असते ; अंधाराची नाही. व्यक्तीप्रमाणं देशाच्या बाबतींतहि हाच न्याय लागूं करतां येअील. आपला देश दीर्घ निद्रेनंतर जागा झाला आहे. त्याला प्रकाशाची अपेक्षा

११५१५

आहे. वाऱ्यालाहि दाद न देणाऱ्या ज्योतीचं जीवन जगण्याचं ध्येय कुशीं बाळगलं पाहिजे. तुमच्यांतूनच भारतीय स्त्री निर्माण होणार आहे. भारतीय स्त्रीची योग्यता तिनं किती विद्यापीठांच्या परीक्षा दिल्या यावर नसून ती आपल्या देशाच्या रचनेंत, अुभारणींत, त्याच्या नियमनांत, संरक्षणांत व त्याला बलशाली करण्यांत किती भाग घेते — की पुरुषांबरोबरीच्या हक्कांसाठी नुसती रडतच असते यावर अवलंबून राहील.

किशोरी, तुमच्याकडे आम्ही आशेनं पाहतों. कारण तुमच्यांतूनच ध्येयवादी कन्या-कुमारी, सती अुमा, भगवंताशींहि भगिनीचं नातं जोडणारी कृष्णा, अग्निदिव्यालाहि तोंड देणारी वैदेही, विदुला मातोश्री, ब्रह्मवादिनी विश्वावरा अशा स्त्रीरत्नांचा संभव. महाभारतांत तुमचाच गौरव केला आहे.

‘नित्यं निवसते लक्ष्मीः कन्यकासु प्रतिष्ठिता’ – मुलींमध्येच लक्ष्मी वास करते, असं सुचविलं आहे. कविश्रेष्ठ कालिदाससुद्धा कुटुंबाचं जीवित म्हणजे कन्या समजतात. – ‘कन्यायाम् कुलजीवितम्’ ते म्हणतात. किती अुंचावर तुमचं स्थान आहे! – आणि या स्थानापर्यंत पोचायला हा अिंद्रधनूचा रमणीय पूल तुम्हांला मिळालेला आहे. पाहा त्याच्या टोकाशीं साठविलेल्या ह्या धनाच्या राशी —

जागतिक शांतीचा हा भव्य रांजण! त्याच्या आसपास विखुरलेल्या ह्या अलंकारांच्या राशी पाहा! गृहसौख्याच्या चमचमणाऱ्या ह्या रत्नमाला, कर्तृत्वाचीं सुवर्णकंकणं सुकीर्तीचे मौक्तिकहार, ज्ञानाचीं कर्णफुलं, सुपुत्रांच्या अंगुलिका – किती घेशील यांतून, किशोरी?

“अनंत हस्तें कमलावराने। देतां किती घेशिल दो कराने॥” परमेश्वरानं तुमच्यासाठी अुघड्यावर मांडलेलं हें धन! सारं तुमचंच आहे!– पण, “पदे पदे च रत्नानि। योजने रस कूपिका। भाग्यहीना न पश्यन्ति। बहुरत्ना वसुंधरा॥” हें सुभाषित माहीत आहे ना?

पृथ्वीमधे पावलापावलावर रत्नं विखुरलीं आहेत, पण भाग्यहीनांना तीं दिसत नाहीत. अपराध कुणाचा? आणि आता किशोरी, सिंधुकन्यकेचं वैभव, वाग्देवीची रसना व आदिमायेची शक्ति या त्रिगुणांचं प्रतीक असलेल्या तुम्हां सर्व किशोरींना माझे त्रिवार प्रणाम!!!

मराठी ग्रंथ ..., ठाणे. स्थळ
अनुक्रम ३१८५३. वि:
क्रमांक ..२१.८२.१........ नों दि ....

REFBK-0011515

पिरोज आनंदकर

प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिका श्रीमती पिरोज आनंदकर यांनी सारें जीवन कन्याविश्रांत घालविलें. १९३५ मध्ये त्या शिक्षणशास्त्रांतील उच्च पदवी घेऊन इंग्लंडहून परत आल्या व लवकरच " सरस्वती " ही आपली वैशिष्ट्यपूर्ण शाळा त्यांनी सुरू केली. त्यांच्या विद्यार्थिनींना त्यांच्या अध्यापन-कौशल्याचाच नव्हे तर मित्रभावाचा लाभ झाला आहे.

कोवळ्या युवतींच्या जीवनांतले अवघड वाटणारे प्रश्न सतत डोळ्यांसमोर असल्यानें त्यांना या पुस्तकाची प्रेरणा झाली व त्यांच्या अनुभवानें व अभ्यासानें त्यांनी हें काम परिश्रमपूर्वक पूर्ण केलें.

" गृहलक्ष्मी " या स्त्रियांच्या मासिकाच्या त्या १९२७ ते १९२९ संपादिका होत्या. स्त्री जीवनाच्या अनेक प्रश्नांवर त्यांनी पुष्कळ लेखन केलें आहे. गृहजीवन-शास्त्र व भाषा या विषयांवर त्यांनी पाठ्यपुस्तकें लिहिलीं असून त्याखेरीज शैक्षणिक प्रश्नांवर स्फुट लेखन केलें आहे. लहान मुलांसाठीं चटकदार कथा व माहितीपूर्ण लेख लिहिण्यास पिरोजबाई तत्पर असत. ' खेळगडी ', ' बालमित्र ' या मासिकांचे खंड अजून याची साक्ष देतील. " स्त्री " मासिकाचा व त्यांचा ३० वर्षांचा ऋणानुबंध होता. याच " स्त्री " मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झालेली कुमारी-जीवनावरील ही लेखमाला आता पुस्तकरूपांत प्रसिद्ध होत आहे.